नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ९३ * * नागपूर * | मंगळवार, दिनांक १ जुलै २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हिमाचलमध्ये अतिवृष्टी, १२९ मार्ग बंद

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. ३० :
हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ रस्त्यांवरील वाहनांची वाहतूक थांबली आहे. आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत. बिहारमध्ये वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## भाग्य हे आमुचे बोलतो मराठी

काल मराठीचा पाया मजबूत करण्यासाठी आम्ही आवाहन केले होते. सध्या तरी मराठी आणि महाराष्ट्र गौरवासाठी अनेक कवींनी वर्णलेल्या, 'सुंदर देशा पवित्र देशा' किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा किंवा दगडांच्या देशा वगैरे सारखे वर्णन वाचून आपल्याला आपल्याच मराठी भाषेचा अभिमान तार स्वराने दिसत असला. तरी अभिजात झालेली किंवा तसा दर्जा मिळालेली आपली मराठी भाषा दिवसेंदिवस आपला झेंडा इंच इंच फडकवित ठेवणार आहे का, हाच खरा प्रश्न आहे. संपूर्ण भारतात मोगलांच्या विरुद्ध किंवा इतर परकीयाच्या विरोधात लढणारे फक्त मराठीच होते आणि ते महाराष्ट्रातील होते. हे सत्य कधीच नाकारता येणार नाही. देशाच्या अनेक भागात आजही मराठ्यांच्या विजयोत्सवाच्या खुणा दिसून येतात. ग्वाल्हेरचे सिंदिया हे महाराष्ट्राचे शिंदे आहेत. बडोद्याचे गायकवाड गुजराती नसून मराठीच आहेत. इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाला संपूर्ण देश नमन करतो. देशातील इतर अनेक प्रांतात आपल्या मराठीची आणि मराठ्यांची तलवार तळपत होती. ही सर्व मराठी असलेल्या आणि महाराष्ट्रातील लढाऊ असणाऱ्या मराठ्यांची एका प्रकारची अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या भारताची निशाणी होती. मराठी सत्तेचे पाऊल दरम्यानच्या काळात कधीतरी थोडेसे वाकडे पडले. त्यानंतर इंग्रजांनी पुण्यावर आपला युनियन जॅक फडकवला आणि मग देशावर इंग्रजी अंमल सुरू झाला. १८१८ सालापूर्वी दुसऱ्या बाजीरावांनी हाराकिरी केली नसती. त्याउलट आपल्या पूर्वजांच्या पावलावर पाऊल टाकून मराठी बाणा दाखवून दिला असता. तलवार गाजवली असती. तर इंग्रजांचे राज्य अजिबात आल्याचे दिसले नसते. सध्याच्या युगात जर तरला काही अर्थ नाही. त्यामुळे ते जाऊ द्या. इंग्रज आले आणि इंग्रज गेले. इंग्रज गेल्यावर दिल्लीत जी सत्ता स्थापन झाली. त्यात मराठी जनांचा अजिबात बोलबाला नव्हता. हे मान्य केलेच पाहिजे. किंबहुना महाराष्ट्राकडे सातत्याने सावत्रपणाने पाहणे सुरू होते. त्यातच भाषिक राज्य स्थापन व्हावीत. असे ठरल्यावर आंध्र प्रदेशच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामलू यांनी आपले प्राण अर्पित केले. त्यामुळेच मग तत्कालीन मद्रास पासून आंध्र प्रदेश वेगळा झाला. त्यानंतर सुद्धा तत्कालीन सरकारने महाराष्ट्र आणि गुजरात यांना मुंबई राज्यात समाविष्ट केले होते. 1956 सालात मध्य प्रदेशची राजधानी असलेले नागपूर संपूर्ण विदर्भासह मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये सामील झाले. नागपूरची राजधानी गेली. स्वातंत्र्योत्तर काळात राजधानी गेल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. अनेक नवनवीन राजधान्या नागपूरला वाकुल्या दाखवीत आहेत. १९६० साली अखेर महाराष्ट्रातील सर्व पक्ष नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. यासाठी आंदोलन उभे केले. कॉम्रेड भाई डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, एसेम जोशी आणि इतर अनेक मराठी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी जोरदार रणशिंग फुंकले होते. अखेर मराठी जनांच्या एकजुटीला वंदन करून महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये एक मे १९६० रोजी स्थापन झाली. पण त्यानंतरही महाराष्ट्र सारख्या श्रीमंत राज्यात मराठीला हवे ते महत्त्व मिळाले नाही. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत काँग्रेस विरुद्ध सर्वपक्षीय तरीही पक्षनिरपेक्ष मराठी प्रेमी पक्षांची आघाडी स्थापन झाली होती. तसाच सध्याच्या परिस्थितीमध्ये मराठी जनांच्या मनाचा आवाज गेल्या काही दिवसापासून हिंदी भाषा विरोधात दुमदुमू लागला होता. मध्यंतरी अगदी प्राथमिक शाळेतील बालकांनी हिंदी गीत गावे म्हणून फतवा निघाला होता. काल मराठी मनांचा आणि जनांचा आवाज ऐकून आपल्या समंजस मुख्यमंत्र्यांनी हिंदी सक्तीचे दोन्ही जीआर रद्द केले. त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे त्रिवार अभिनंदन करून त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. मराठी जनांमध्ये हिंदी भाषेबद्दल आकस नाही. पण हिंदी मावशीच्या प्रेमापोटी मराठी आईला घराबाहेर काढण्याचे पाऊल कोणत्याही मराठी प्रेमीला धोकादायक वाटले. मुख्यमंत्र्यांनी नेमक्या याच जनतेच्या भावना ओळखलेल्या आहेत. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या जीआर चे म्हणजेच अध्यादेशाचे फाडून फाडून बरेच तुकडे केले. त्यामुळे मराठी मन आणि मराठी जन सुखावलेले आहेत. या निर्णयाबद्दल आपले मुख्यमंत्री अभिनंदनास पात्र आहेत. त्यांना धन्यवाद. जय मराठी! जय महाराष्ट्र!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# सरकार झुकणार नाही!

### ठाकरे बंधूंनी एकत्र क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी, आम्हाला अडचण नाही : फडणवीसांचा टोला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार कुणाच्याही दबावापुढे झुकणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे.

सरकारने हिंदीच्या मुद्यावर एक समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य तो निर्णय घेईल. सरकार केवळ कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही, केवळ महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे लक्ष पाहील. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असे ते म्हणालेत. ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी आम्हाला काही अडचण नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी ठाकरे बंधूंना हाणला.

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी भाजप प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज भरला. त्यांची या पदासाठी निवड जवळपास निश्चित आहे. त्याची औपचारिक घोषणा उद्या होण्याची शक्यता आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीच्या कथित सक्तीच्या मुद्यावर सरकार कुणापुढेही न झुकता विद्यार्थी हिताचा निर्णय घेईल असे स्पष्ट केले.

ठाकरेंच्या उपनेत्याने हिंदीची सक्ती असे लिहिले

फडणवीस म्हणाले, मी काय दोन भावांनी एकत्रित न येण्याचा जीआर काढला आहे काय? मी असा कोणताही जीआर काढला नाही. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात जो अहवाल आला होता, त्या अहवालात त्यांचा उजवा हात मानला जाणाऱ्या उपनेत्याने पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा असे लिहिले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारला. त्यानंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे घुमजाव केले. त्यानंतरही आम्ही कोणताही इगो न मानता निर्णय केला आहे.

मी पुन्हा एकदा सांगतो. आम्ही निर्णय केला, आता समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य ते ठरवेल. आम्ही कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे पाहू, सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचाच निर्णय घेईल. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.

फडणवीस यांनी यावेळी ठाकरे बंधूंच्या विजयी मोर्चावरही भाष्य केले. ते म्हणाले, ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर मला त्याचा अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्र यावे. फक्त राज ठाकरे यांनी पहिली ते बारावीपर्यंत हिंदी सक्तीची सक्ती करण्याचा निर्णय तुमच्या काळात का घेण्यात आला? हा प्रश्न मला विचारण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांना विचारला पाहिजे. बाकी त्यांनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, हॉकी खेळावी, असा टोला त्यांनी हाणला.

## रासायनिक कारखान्यात स्फोट
## १२ जणांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. ३० :
तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका रासायनिक कारखान्यात सोमवारी झालेल्या रिॲक्टर स्फोटात किमान १२ जणांचा मृत्यू झाला आणि ३६ जण जखमी झाले.
पशामिलाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची केमिकल्समध्ये ड्युटी वेळेच्या दरम्यान ही घटना घडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोट झाला तेव्हा इमारतीत एकूण ६१ लोक होते आणि अजूनही अनेक लोक आत अडकले आहेत.

सुटका करण्यात आलेल्यांपैकी काही जण गंभीर जखमी आहेत. आत किती लोक अडकले आहेत याची खात्री झालेली नाही, असे एका पोलिस सूत्राने सांगितले.

## काँग्रेसी नेत्यांची दिल्लीत बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
महापालिका निवडणुका जवळ येत असताना, महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज, ३० जून रोजी राजधानी दिल्लीत काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीसाठी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नेते विजय वड्डेटीवार, माजी मुंबई अध्यक्ष भाई जगताप, सध्याच्या मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड, नेत्या यशोमती ठाकूर आणि वरिष्ठ नेते माणिकराव ठाकरे हे दिल्लीमध्ये दाखल झाले होते.

या बैठकीत आगामी महापालिका निवडणुका, पक्ष संघटनात्मक मजबूती आणि राज्यातील सद्य घडामोडी या संदर्भात महत्वपूर्ण चर्चा झाल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या नेतृत्वात ही बैठक राजधानी दिल्ली येथील काँग्रेस मुख्यालयात पार पडली. तत्पूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## विरोधकांना एक्स्पोज करताना स्वत: एक्स्पोज होऊ नका

एकनाथ शिंदेंच्या मंत्र्यांना कानपिचक्या



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
मराठी भाषेबाबत आम्ही कधीही तडजोड करणार नाही, मराठी माणसाच्या हक्कांवर गदा आली तर ती सहन केली जाणार नाही, असे विधान राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

मुंबईत पार पडलेल्या शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पक्षातील मंत्र्यांना आणि आमदारांना देखील कानपिचक्या दिल्या. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एक्स्पोज होऊ नका, असे एकनाथ शिंदे मंत्र्यांना म्हणाले.

शिवसेनेच्या कार्यकारिणीची बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी निवड करण्यात आली. तसेच शिवसेना नेहमीच मराठी माणसाच्या हक्कासाठी आग्रही असल्याचा ठरावही या बैठकीत संमत करण्यात आला.

आपण मराठी भाषेबाबत कधीही तडजोड सहन करणार नाही, मराठीची गळचेपी सहन करणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मराठी माणसाच्या उद्धारासाठी जे काही करायचे ते आपण करणार, दिलेला शब्द आपण पाळतो त्यामुळे मराठी माणूस आपल्यासोबत आहे असेही शिंदे म्हणाले.

## मराठी जनतेच्या रेट्यामुळेच निर्णय मागे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय महायुतीसरकारने रद्द केले आहेत.



यावरून विरोधकांनी प्रतिक्रिया देणे सुरू केले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली, असे म्हटले आहे. राज ठाकरे म्हणाले, इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले.

याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली.

## पावसाळी अधिवेशनाला सुरूवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या.
आज सत्ताधारी आणि विरोधकांनीही आंदोलन केले. विधान परिषदेत आज ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्यासह इतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

## भाजपच्या प्रदेशाध्यक्ष निवड प्रक्रियेला वेग


### महाराष्ट्रात रवींद्र चव्हाण, हिमाचलमध्ये डॉ. राजीव बिंदल यांची वर्णी


■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
भारतीय जनता पक्षाने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक पातळीवर जोरदार हालचाली सुरू केल्या असून देशभरात प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी प्रक्रिया गतिमान झाली आहे. महाराष्ट्रासह सहा राज्यांमध्ये भाजप प्रदेशाध्यक्षांच्या निवडणुका झाल्या.

महाराष्ट्र भाजपमध्येही आज नवे पर्व सुरू झाले. विद्यमान कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी औपचारिकपणे प्रदेशाध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. चव्हाण हे आता पूर्णवेळ प्रदेशाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारतील.

हिमाचल प्रदेशात डॉ. राजीव बिंदल यांनी पुन्हा एकदा प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे हातात घेतली आहेत. विरोधी पक्षनेते जयराम ठाकूर, खासदार अनुराग ठाकूर आणि गोविंद ठाकूर यांनी प्रस्ताव दिले होते. उत्तराखंडमध्ये विद्यमान अध्यक्ष महेंद्र भट्ट यांची पुन्हा एकदा निवड झाली असून मिझोराममध्ये माजी मंत्री आणि आमदार के. बेचुआ यांच्याकडे पक्षाच्या सूत्रांची धुरा सोपवण्यात आली आहे.

## एसटी तिकीट बुक करणाऱ्यांसाठी आनंदावार्ता
## तिकीट दरात १५ टक्के सूट





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
लांब आणि मध्यम अंतराच्या एसटी प्रवासासाठी आता प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. एसटी महामंडळाने १५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना १ जुलैपासून सर्वसामान्यांसाठी लागू होणार असून, दिवाळी व उन्हाळी सुट्टीच्या गर्दीच्या काळात मात्र ती लागू राहणार नाही. ही सवलत फक्त पूर्ण तिकीट धारक प्रवाशांनाच मिळणार असून सवलत धारक योजनेच्या प्रवाशांना ती लागू होणार नाही.

परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. एसटी महामंडळाच्या या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ भाविक व चाकरमान्यांना मिळणार आहे. येत्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या नियमित बस गाड्यांचे आगाऊ आरक्षण करणाऱ्या भाविकांना तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळेल. मात्र, सणासुदीच्या काळात चालवण्यात येणाऱ्या अतिरिक्त (जादा) गाड्यांना ही सवलत लागू असणार नाही. गणपती उत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनाही ही सवलत लागू होणार आहे, त्यासाठी आगाऊ आरक्षण अनिवार्य आहे.



# ५ तारखेला जल्लोषाचा मोर्चा
## भाजप म्हणजे अफवांची फॅक्टरी : उद्धव ठाकरे



**मुंबई :** हिंदी सक्तीच्या निर्णयावरून सरकारला नमविल्यानंतर आता ५ जुलैला जल्लोषाचा मोर्चा काढणार असल्याची घोषणा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. मातोश्री येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारवर आणि भाजपवर जोरदार टीका केली. मराठी माणूस एकवटल्यावर काय होते, ते सरकारने पाहिलं. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली. मात्र, मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणूनच हा निर्णय अचानक घेतला गेला. पण आता ५ तारखेला जल्लोषाचा मोर्चा किंवा सभा होईल. आंदोलनात सहभागी सर्वांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेऊ, असे ठाकरे म्हणाले. भाजपवर हल्लाबोल करताना उद्धव ठाकरे म्हणाले, हरिश्चंद्राची फॅक्टरी हा चित्रपट आला होता, तशीच भाजप अफवांची फॅक्टरी आहे. या फॅक्टरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचेच चित्र लावा. हिंदी सक्तीच्या निर्णयामागे आपला सहभाग असल्याच्या भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना ठाकरे म्हणाले, माशेलकर समितीचा अहवाल मी कधीच उघडून पाहिला नाही. तो उच्च शिक्षणाशी संबंधित होता. मी फक्त स्वीकारला, अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासगट नेमला, पण त्यानंतर सरकारच पडलं. आणि समजा मी जीआर काढलाही असेल, तरी तीन वर्षे हे झोपले होते का? नवीन समिती आली तरी आम्ही हिंदी सक्ती कधीच होऊ देणार नाही, असा निर्धार व्यक्त करत उद्धव ठाकरेंनी मराठी भाषेच्या प्रश्नावर पुन्हा आंदोलनाची चेतावणी दिली.

# जयघोषात निघाली श्री श्री जगन्नाथ रथयात्रा

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

हरे राम हरे कृष्णा, जय जगन्नाथ, जय बलराम, जय सुभद्राचा अखंड जयघोष, पावसाच्या सरी अन भाविकांमध्ये संचारलेला उत्साह, अशा भक्तिपूर्ण वातावरणात पुण्यात श्री जगन्नाथ रथयात्रा सोहळा रविवारी (दि. 29) जल्लोषात साजरा झाला. ओडिशा मधील जगन्नाथपुरीमधील रथयात्रेच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) पुणेतर्फे आयोजित रथयात्रेत हजारो भाविक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले अन् पुष्पवृष्टी करीत पुणेकरांनी या यात्रेचे ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

इस्कॉनतर्फे टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयातून जगन्नाथ रथयात्रा सोहळ्याला सुरुवात झाली. इस्कॉन कात्रज-कोंढवा रस्ता, पुणे मंदिरातील भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्तीचे दर्शन भाविकांना घेता आले. इस्कॉन संस्थेचे लोकनाथ स्वामी, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मत्स्य आणि बंदर विकासमंत्री नितेश राणे, आमदार हेमंत रासने, भीमराव तापकीर, योगेश टिळेकर, सुनील कांबळे आदी उपस्थित होते.



भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांची आरती करून रथयात्रेला सुरुवात झाली. या वेळी इस्कॉन मंदिराचे उपाध्यक्ष संजय भोसले, मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे, रथयात्रेचे समन्वयक अनंतगोप प्रभू, जनसंपर्कप्रमुख प्रसाद कारखानीस हेही कार्यक्रमात सहभागी झाले होते. केरळमधील थैयम लोककला आणि संस्कृतीवर आधारित महाविष्णू, नृसिंह सरस्वती आदी देवतांच्या रूपातील कलाकारांचे नृत्यरथ हे यात्रेतील आकर्षण होते. रथयात्रेच्या मार्गावर रांगोळ्यांच्या गालिच्यावर रथ हजारो भाविकांतर्फे ओढला जात होता. रथयात्रा मार्गावर भगवद्गीता आणि भागवतावर आधारित पुस्तकांचे आणि प्रसादाचे वितरण चालू होते. सायंकाळी आरती, दर्शन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रथयात्रेतील रथाची उंची 20 फूट इतकी होती.

फुलांसह रंगबिरंगी कापडांनी रथावर सजावट करण्यात आली. समारोपानंतर भगवंतांना 56 भोगांचा नैवेद्य अर्पण करून आरती होईल. 20 हजार भाविकांना प्रसाद वाटप महाविद्यालयाच्या प्रांगणात रथयात्रेच्या सुरुवातीला आणि समारोपानंतर झाले, तर रथयात्रा मार्गावर एक लाख प्रसादाची पाकिटे वाटण्यात आली. आपण हिंदू म्हणून सगळ्याच देवीदेवतांचे सर्व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करणे, हे परमकर्तव्य आहे. एकीकडे वारी सुरू आहे. तसेच इथे रथयात्रा आयोजित केलेली आहे. आज याप्रमाणे सगळ्यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. आपल्यामध्ये मोठी ताकद आहे. भगवद्गीतेचे महत्त्व पोहचविण्याचे काम इस्कॉन करीत आहे. हिंदू धर्म आपल्या प्रत्येकाला विचाराने मोठे करतो. ही धर्माची विशालता आहे. हिंदू समाजापर्यंत अधिकाधिक प्रमाणात गीता पोहचावी, असे मत नितेश राणे यांनी व्यक्त केले.

# विजेच्या धक्क्याने दोन वारकऱ्यांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. ३० :

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान मोठी दुर्घटना घडली असून, दोन वारकऱ्यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. रविवारी (२९ जून) रात्री ही घटना सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील बरड येथे घडली. या घटनेमुळे पालखी सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्वच वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

वारकऱ्यांची नावे तुषार रामेश्वर बावनकुळे (वय २२, रा. खलासना, जिल्हा नागपूर) आणि मधुकरराव तुकाराम शेंडे (वय ५५, रा. मेडिकल चौक, नागपूर) अशी आहेत. याप्रकरणी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, फलटणचे पोलीस उपअधीक्षक राहुल धस यांनी या घटनेची माहिती दिली.पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, बरड येथे पालखी सोहळ्याचा रविवारी मुक्काम होता. रात्रीच्या सुमारास तुषार बावनकुळे हे कपडे वाळत घालण्यासाठी विजेच्या खांबाला दोरी बांधत होते. यावेळी त्यांना जोराचा विद्युत धक्का बसला. त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात मधुकरराव शेंडेही पुढे सरसावले आणि त्यांनाही धक्का बसला. दोघेही घटनास्थळीच बेशुद्ध पडले.

नातेपुते येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, डॉक्टर नम्रता व्होरा यांनी उपचारापूर्वीच दोघेही मृत झाल्याचे घोषित केले.ही घटना वासुदेव महाराज टापरे यांच्या दिंडीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांवर घडली असून, हे दोघेही नागपूर जिल्ह्यातील विहिर तालुक्यातील रहिवासी होते. मधुकरराव शेंडे हे अविवाहित होते आणि वारकरी संप्रदायात अतिशय सक्रिय होते. ते बावणे कुणबी समाज केंद्रीय संस्थेचे सदस्य होते आणि विविध सामाजिक संघटनांशी त्यांचे निकटचे संबंध होते.

# मराठी जनतेच्या रेट्यापुढे सरकार शरण : राज ठाकरे



**मुंबई :** हिंदी भाषा लादण्याचा निर्णय अखेर मराठी जनतेच्या प्रचंड विरोधामुळे रद्द करण्यात आला असून, हा विजय महाराष्ट्रातील तमाम जनतेचाच आहे, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठणकावले आहे. सरकारने दोन्ही जीआर मागे घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली. राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिलपासूनच या मुद्द्यावर आवाज उठवला. त्यानंतर सर्वच पक्ष रस्त्यावर उतरले. आम्ही जाहीर केलेला मोर्चा झाला असता, तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली असती. कदाचित याच एकजुटीच्या भीतीने सरकारला निर्णय मागे घ्यावा लागला. सरकारने हिंदी सक्ती रद्द केली असली तरी नवीन समिती नेमल्यावर राज ठाकरे यांनी तिखट इशारा दिला. समितीचा अहवाल काहीही असो, पुन्हा हिंदी लादण्याचा प्रयत्न झाला, तर या समितीला महाराष्ट्रात काम करू दिलं जाणार नाही. हा निर्णय कायमचा रद्द झालाय, हे सरकारने लक्षात ठेवावं, असे त्यांनी बजावले. हिंदी लादण्यामागे सरकारवर कुणाचा दबाव होता, हे अजूनही गूढ असल्याचे सांगत राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना हिंदी शिकवण्याचा जो अट्टाहास होता, तो अखेर मराठी जनतेनेच हाणून पाडला. यासाठी सर्व जनतेचं अभिनंदन.

# पुढील दोन दिवस पावसाचे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पावसाला पूरक वातावरण निर्माण झाले असून, अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. तळ कोकण आणि किनारपट्टी भागांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, तर मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय झाल्यामुळे येत्या पाच दिवसांत किनारपट्टी भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवस पावसाचा जोर वाढणार असून, त्यानंतर हळूहळू तो कमी होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्याच्या बहुतांश भागांत दमदार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे अनेक मोठे प्रकल्प, तलाव आणि नद्यांमधील जलसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत सरासरी 93 टक्के पावसाची नोंद झाली आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राच्या माहितीनुसार, पुढील तीन ते चार तास-ांत नांदेड जिल्ह्याच्या काही भागांत तुरळक पावसाची शक्यता आहे, तर छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड तसेच नाशिक, पुणे सातारा घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई व कोल्हापूर घाट परिसरात पावसाचा यलो अलर्ट आहे.

# उद्धव ठाकरे यांचे मराठी प्रेम बेगडी : नारायण राणे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हिंदी सक्ती करण्याचे शासन निर्णय मागे घेतले. पण त्यानंतरही राजकीय वतुर्ळात त्याचे पडसाद उमटत आहेत. भाजप खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी या प्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव ठाकरे यांचे मराठी प्रेम बेगडी आहे. त्यांना मराठीचा एवढाच पुळका होता, तर त्यांनी स्वतःची मुले इंग्रजी माध्यमात का शिकवली? असा सवाल त्यांनी या प्रकरणी ठाकरेंवर शरसंधान साधताना उपस्थित केला आहे.



नारायण राणे आपल्या एका पोस्टद्वारे उद्धव ठाकरे यांच्यावर हिंदी भाषेच्या वादावरून विविध प्रश्नांची सरबत्ती केली. ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे मराठीचे प्रनेम बेगडी, राजकीय व स्वाथापोटी आहे. मुख्यमंत्री असताना हे प्रेम कुठे गेले होते? मराठी माणसाच्या नोकरी, धंदा व पोटाच्या प्रश्नासाठी काय केले?

मराठीच्या नावावर त्यांनी केवळ आपले कल्याण करून घेतले. मराठी माणसाच्या व मराठी भाषिकांच्या कल्याणाचे काय? महाराष्ट्राची राजधानी मुंबईमध्ये मराठी माणसाची टक्केवारी 18 टक्क्यांपर्यंत खाली आली याला जबाबदार कोण?

मराठीबद्दल इतकेच प्रेम होते, तर स्वतःच्या मुलांना इंग्रजी माध्यमात का शिकवले? सरकारने दोन जीआर रद्द केले म्हणून विजयी मेळावा काढणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असेच म्हणावे लागेल, असे नारायण राणे यांनी म्हटले आहे.

# वारीला निघालेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३० :

विठ्ठलाच्या वारीला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर काही नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना पुण्याच्या दौंड येथे घडली आहे. या घटनेमुळे वारकऱ्यांत एकच खळबळ माजली आहे.

आषाढी वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झालेत. यात लहान - थोरांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचाच समावेश आहे. सर्वांना विठ्ठल - रुक्मिणीच्या दर्शनाची ओढ लागली आहे. त्यातच दौंड येथे एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे ही संतापजनक घटना घडली आहे. मजल दरमजल करत पंढरपूरच्या दिशेने जाणारे वारकरी चहापाण्यासाठी येथे थांबले होते.

## संपला म्हणालात, पण आता युतीसाठीच विनवण्या
# शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला



**मुंबई :** राज ठाकरेंच्या मनसेला संपलेला पक्ष म्हणून हिणवणारे उद्धव ठाकरे आता त्यांच्यासोबत युतीसाठीच विनवण्या करत आहेत, अशा खरमरीत शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर थेट तोफ डागली. नाशिकमधील ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख विलास शिंदे, सात नगरसेवक, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिंदे नाशिकमध्ये बोलत होते. आज काही जण कम ऑन किल मी म्हणतात, पण त्यांची अवस्था शोलेमधील असरानीसारखी झाली आहे. दररोजची गळती थांबत नाही, म्हणूनच आता ज्यांना संपलेला पक्ष म्हणायचे, त्यांच्यासोबत युतीसाठी विनवण्या कराव्या लागत आहेत, असा घणाघात शिंदेंनी केला. शिंदेंनी ठाकरेंना इशारा देताना म्हटले, आज विलास शिंदेंचा प्रवेश होताच, सकाळी ठाकरेंच्या लोकांनी विचारलं कोण विलास शिंदे? पण अयोध्येला जाताना, निवडणुकीला कामाला मात्र हेच शिंदे लागायचे. अशीच अहंमन्यता राहिली, तर लवकरच लोक तुम्हाला तुम्ही कोण? विचारतील. विलास शिंदे यांच्यासोबत नाशिकमधील माजी नगरसेवक संतोष गायकवाड, नयना गांगुर्डे, विष्णूपंत बेंडकुळे, प्रवीण पाळदे, पल्लवी पाटील, निलेश ठाकरे, उषाताई शेळके यांचा तसेच उपमहानगरप्रमुख निवृत्ती इंगोले, जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ फडोळ, राष्ट्रवादीचे मोहनीश दोंदे, युवासेनेचे सुनील मते, सभापती खंडू भोये, सरपंच रमेश भोये यांचा शिवसेनेत प्रवेश झाला.

# पीओपीच्या मोठ्या मूर्ती विसर्जन धोरणासाठी सरकारला मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मोठ्या आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मूर्ती विसर्जनाच्या मुद्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणखी तीन आठवड्यांची मुदत देण्याची मागणी राज्य सरकारने सोमवारी उच्च न्यायालयात केली. तथापि, गणेशोत्सव ऑगस्टअखेरीस असल्याने सरकारच्या या धोरणाची आम्हालाही पडताळणी करावी लागेल, असे स्पष्ट करून मोठ्या आणि सार्वजनिक मूर्तींच्या विसर्जनाबाबतचे धोरण २३ जुलैपर्यंत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने सरकाला दिले.

लहान मूर्ती कृत्रिम तलाव किंवा तळ्यांमध्ये विसर्जित केल्या जाऊ शकतात. मात्र मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत तोडगा काढण्यासाठी वेळ देण्याची विनंती राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयातडे केली होती. तसेच, सरकार दीर्घकालीन उपाय शोधत असून सार्वजनिक मंडळांनी एकाच मूर्तीचा कायमस्वरूपी वापर केला, तर विसर्जनाचा मुद्दा उपस्थित होणार नाही, असेही महाधिवक्त्यांनी स्पष्ट केले होते. त्यावर, समुद्रासारख्या नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये मोठ्या मूर्तींचे विसर्जन न करण्याबाबत सरकार स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आखणार आहे का, अशी विचारणा न्यायालयाने केली होती. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सोमवारी या प्रकरणी सुनावणी झाली.



तथापि, गणेशोतत्सव ऑगस्टअखेरीस असल्याचे आणि त्याधी सरकारच्या धोरणाची पडताळणी करून योग्य तो निर्णयय द्यायचा असल्याचे स्पष्ट करून न्यायालयाने धोरण लवकर सादर करण्याचे आदेश सरकारला दिले.

# नीट एमडीएस परीक्षेसाठी नोंदणी सुरू

**मुंबई :** यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी राज्य कोट्यातील जागांसाठी पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दंत अभ्यासक्रमात पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ३ जुलैपर्यंत नोंदणी करता येणार आहे. नीट एमडीएस- २०२५ परीक्षेला बसलेल्या आणि महाराष्ट्रातील सरकारी, महामंडळ आणि अल्पसंख्याक महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागांसाठी अर्ज करू करता येणार आहे.

# सरकारने ठाकरे बंधू एकत्र येण्याचा धसका घेतला : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

हिंदी भाषेसंदर्भातील शासनाचे दोन्ही आदेश रद्द करण्याचा निर्णय रविवारी महायुती सरकारने घेतला. त्यानंतर विरोधकांनी एकच जल्लोष केला. आता सरकारने घेतलेल्या या माघारीवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार याचा धसका या सरकारने घेतला असल्याची टीका राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले, गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला, वेगवेगळे तोडगे आणण्याचे प्रयत्न केले. पण शेवटी जनता काल रस्त्यावर उतरली.



महाराष्ट्रात त्या सरकारी अध्यदेशाची होळी झाली. काल स्वतः उद्धव ठाकरे आणि इतर सर्व घटक कॉंग्रेस असेल किंवा अन्य पक्ष असेल रस्त्यावर उतरले आणि होळी केली. त्यानंतर सन्माननीय राज ठाकरे आणि माननीय उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित मोर्चाचे सरकारने धसकाच घेतला होता. कारण महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यातून लाखो मराठी लोक या मोचार्साठी येणार होते. या सगळ्याचा परिणाम झाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अध्यादेश मागे घ्यावा लागला.

आता काहीतरी समिती स्थापन केली आहे. कशाला केली आहे? आम्ही त्रिभाषा सूत्री स्वीकारणारच नाही. महाराष्ट्र स्वीकारणार नाही. याबाबत उद्धव ठाकरे यांनी देखील सांगितले आहे आणि राज ठाकरेंनीही सांगितले आहे. त्यामुळे उगीच आता समिती नेमण्याचा फालतू खेळ भाजपने करू नये. आता प्रश्न असा आहे की 5 तारखेला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे एकत्रित येणे हे महाराष्ट्रासाठी फार मोठे आकर्षण होते किंवा ताकद दाखवण्याचा मार्ग होता आणि त्यामुळेच अध्यादेश रद्द केला. आता जी फोर्स तयार होणार होती 5 तारखेच्या मोचार्साठी आता त्याचे काय करायचे तर मोचार्चे रूपांतर विजयी सभेत करायचे आहे. माझे काल राज ठाकरे यांच्याशी बोलणे झाले. आमची चर्चा झाली आहे. आता ते त्यांचे मत देतील. उद्धव ठाकरे साहेबांनी सांगितले होते की विजय मेळावा होईल. जे जे घटक मोर्चात सामील होणार होते या दोन प्रमुख नेत्यांशिवाय त्या सगळ्यांसह विजय मेळावा असेल. कारण ही एकजूट मराठी माणसाची आणि महाराष्ट्राची होती.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, राज ठाकरे यांनी जी साद घातली होती एकत्र येण्यासाठी, त्यावर उद्धव ठाकरे यांनी पुढील दहा मिनिटांतच त्याला प्रतिसाद दिला होता. त्यामुळेच आम्ही हिंदीच्या मुद्द्यावर एकत्र आलो. सकारात्मक नसतो तर एकत्र आलो असतो का? असा सवालही संजय राऊत यांनी केला आहे. मराठीच्या प्रत्येक लढ्यात आम्ही एकत्र असूत. आमची भूमिका स्पष्ट आहे.

# मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
देसाईगंज, दि. ३० :

गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज,मायाश्री फुड इंडस्ट्रीज तसेच मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज या एकाच परिवारातील वेगवेगळ्या नावावर असलेल्या राईसमिल संचालकांनी पुरवठा विभागाचे अधिकारी, आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी तसेच स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांना हाताशी धरून प्रचंड गैरव्यवहार करून शासानाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे. त्यामुळे मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी व पुरवठा विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली येथील शासकीय गोदामात २४ फेब्रुवारी २०२२ मध्ये मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांचा मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली येथील नागरीकांनी पकडला होता. तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तत्कालीन पुरवठा निरीक्षक युवराज बोरकर यांना दोषी ठरवून त्यांचेकडून ६८ हजार ४६० रुपये दंडाची रक्कम वसूल केली आहे.

हंगाम २०२२ मध्ये फुड कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या पथकाने मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीजच्या राईसमिल मधुन तपासणीकरीता तांदळाचे नमुने घेतले असता या तीन मिलचा एकूण ९१.३,मेट्रिक टन तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र.खरेदी-२६२२/प्र.क्र ९९/नापु २९ दि.२० जुलै २०२२ च्या पत्राद्वारे उपरोक्त सर्व राईसमिलवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९८०/१९५५ कलम ३() व त्यामधील सुधारणा २०२० तसेच अन्य कायद्यान्वये असलेल्या तरतुदीनुसार कारवाई करून त्यांचेवर केंद्र शासनाच्या १६, जुलै २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करावी व कारवाई करून त्याबाबतचा सविस्तर कृती अहवाल स्वयंस्पष्ट अहवालासह शासनास ७ दिवसात सादर करण्याचे आदेश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे सहसचिव सुधीर तुंगार यांनी दिले होते. तसेच अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्र. खरेदी-२६२२/प्र.क्र.९९/नापु २९ दि.१० ऑगस्ट २०२३ च्या पत्रानुसार सदर तीनही मिलवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मिना व तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी राईसमिलर्स सोबत संगनमत करून त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. तत्कालीन लोकसभा सदस्य रामदास तडस यांनी दि.३० जुलै २०२२ रोजीच्या पत्राद्वारे आरमोरीच्या शासकीय गोदामातून वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा होत असल्याबाबत जिल्हाधिकारी वर्धा, जिल्हाधिकारी गडचिरोली तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव सुधीर तुंगार यांना दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या पत्रान्वये आरमोरीच्या शासकीय गोदामातून हिंगणघाट येथे निकृष्ठ दर्जाच्या तांदळाचा देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांनी शासकीय गोदाम आरमोरी येथे जमा केलेल्या तांदळाचा पुरवठा करण्यात येत असल्याने चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

# कॉंग्रेसची ३४ जणांची महापालिका समिती जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

मुंबई महापालिका निवडणुकांसाठी कॉंग्रेसने मोठी घोषणा करत 34 सदस्यांची निवडणूक व्यवस्थापन आणि समन्वय समिती जाहीर केली आहे. मात्र माजी अध्यक्ष भाई जगताप, नसीम खान आणि खासदार चंद्रकांत हंडोरे यांना समितीबाहेर ठेवण्यात आल्याने पक्षात नाराजीची लाट उसळली असून, ही नाराजी थेट दिल्ली दरबारी पोहोचली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी शहराध्यक्ष वर्षा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीत माजी मंत्री अस्लम शेख, आमदार अमीन पटेल, ज्योती गायकवाड, अमरजीत मनहास, मधू चव्हाण, अशोक जाधव, सचिन सावंत, गणेश यादव यांचा समावेश आहे. तसेच, उपेंद्र दोशी, शीतल म्हात्रे, अजंठा यादव, सुरेश कोपरकर यांसह अनेक माजी नगरसेवकांचाही समावेश आहे.

भाई जगताप आणि नसीम खान यांना डावलण्यामागची कारणमीमांसा सुरू असून, यामुळे पक्षातील गटबाजी पुन्हा उफाळण्याची चिन्हे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या निर्णयाचा फटका कॉंग्रेसला बसण्याची भीती व्यक्त होत आहे, विशेषतः मुंबई महापालिका जिंकण्यासाठी कॉंग्रेसच्या एकजुटीवरच मोठा भर असताना अशा प्रकारची नाराज की ही पक्षाला येणाऱ्या काळात अडचणीत घालू शकते असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

# राजकारणाच्या फासात अडकली आमची हिंदी



**कटाक्ष**
डॉ. प्रवीण डबली
वरिष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

कधी हिंदी हैं हम, वतन है हिन्दोस्तां हमारा गाणारे हेच लोक आता टोपी तिरकी घालून हिंदीविरोधी मोर्चा काढतायत. चेन्नईपासून महाराष्ट्रापर्यंत हिंदी हटावचे फलक अशा पद्धतीने फडकवले जातात, जणू हिंदीत प्रेमपत्र लिहिणं म्हणजे फार मोठं अपराध झालंय. हा विरोध बघून वाटतं हिंदी कुठलं कर्जवसुलीचं नोटीस घेऊन आली आहे– भाईसाहब, आता तरी बोला! पण खरं कारण हे नाही. हे सगळं जुनंच राजकारण आहे, ज्याला कुठलाही विषय मिळाला की मीठ-मिरची घालायचीच! चेन्नईत हिंदीचा विरोध असा झाला, जणू हिंदीमुळे तामिळनाडूची आत्मा संकटात पडेल. कुणीतरी त्यांना विचारा–

"मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमारा," हे गाणं कुठल्या भाषेत गायलंत हो? आणि इथं महाराष्ट्रात तर अजून गोंधळ. मुंबईत हिंदी चित्रपटाच्या कमाईवर अब्जावधी रुपये कमवायचे आणि त्या पैशांनी आपली सत्ता बळकट करायची. पण प्रचारसभेत लगेच मराठी अस्मिताचा झेंडा उंच करायचा आणि हिंदीला अपराधी ठरवायचं. हेच नेते निवडणुकीत हिंदीभाषिक लोकांना मत मागतात. तेव्हा त्यांची मराठी अस्मिता कुठं जाते हो? गुटखा चघळायला? राजकारणाचा हा खेळ असा आहे की हिंदी ही सर्वात सोप्पी शिकार बनलीये–

* इंग्रजी बोला– ग्लोबल सिटिझन म्हणा. * हिंदी बोला– लगेच दबाव टाकणारी भाषा म्हणून टिका करा.

वा रे राजकारण! तुझा तमाशा पण भारीच!

ज्या हिंदीने देशाला राष्ट्रगीत दिलं, तीच हिंदी आज फुटबॉलसारखी लाथाडली जातेय.

पण हेही तितकंच खरं– आपल्याला प्रत्येक राज्याच्या मातृभाषेचा अभिमान आहे. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, गुजराती, बंगाली, असमिया– सगळ्याच भाषांचं आम्ही स्वागत करतो. प्रत्येक बोलीत मायचं ममत्व दडलेलं असतं. प्रत्येक भाषा आपल्या संस्कृतीचा रंग आहे. "सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्तां हमारा," या मातीतल्या मातीचा सुवास प्रत्येक भाषेत मिसळलाय. कोणतीही भाषा लहान नाही, कोणतीही मोठी नाही. सगळ्यांनी मिळून आपला भारत देश सुंदर केला आहे. पण दुर्दैवाने, राजकारणाला या इंद्रधनुष्याच्या रंगावर गदा आणायला मजा वाटते.ज्या दिवशी हिंदीवरून मते खेचण्याचा खेळ संपेल, त्या दिवशी मिले सुर मेरा तुम्हारा या ओळींचं खरं महत्व समजेल. आज हिंदीवर जे राजकीय तांडव चाललंय, कधी चेन्नईत तिचा कफन घातला जातो, कधी महाराष्ट्रात तिला तुच्छ ठरवलं जातं.

पण हिंदी हसून म्हणेल– "मी इथेच आहे, तुमच्या खुर्च्यांपेक्षा मोठी आणि मजबूत!" आणि प्रत्येकाच्या मनातून एक सूर उमटेल– *"विविधतेत एकता हीच खरी शान आहे, भाषांच्या रंगांनी उजळलं हिंदुस्थान आहे!"

# नायगाव रेल्वे मोरीमध्ये पाणी साचल्याने नागरिक त्रस्त:शाळकरी मुलांनाही होतो त्रास

● महासागर प्रतिनिधी
अकोला दि. ३०:

कौलखेड गजानन नगरात पावसाचे पाणी रस्त्यावर अकोला महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या राम नगर, शिवणी परिसरात मोकाट डुकरांचा उपद्रव प्रचंड वाढला आहे. दिवसा आणि रात्रीही डुकरे मोठ्या संख्येने परिसरात वाव असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यामुळे घराबाहेर पडणे धोकादायक बनले असून, लहान मुलांचे आरोग्य आणि वृद्ध व महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. डुकरांमुळे संसर्गजन्य रोग



पसरण्याचा धोकाही वाढल्याने नागरिक चिंतेत आहेत.अकोला नायगाव परिसरात असलेल्या रेल्वे रुळाखालील अंडरपास (मोरी) पाणी साचण्याची गंभीर समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. थोडासा पाऊस पडताच ही मोरी पूर्णपणे पाण्याने भरते. त्यामुळे नागरिकांना ये-जाकरण्यात मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. ही परिस्थिती विशेषतः शाळकरी मुलांसाठी आणि वृद्धांसाठी खूप धोकादायक बनते. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, या मार्गावर पाणी साचण्याचे मुख्य कारण तार फैल परिसरातून येणारा एक मोठा नाला आहे. ₹

या नाल्याचे सर्व पाणी या रेल्वे मोरीमध्ये जमा होते. परिणामी, नायगावचा अकोला शहराशी असलेला संपर्क अनेक वेळा तुटतो. नागरिकांची मागणी आहे की, एकतर हा नाला दुसरीकडे वळवावा, किंवा नायगाव परिसराची मोरी वाढवून त्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढवावी.

ही समस्या वर्षानुवर्षे गंभीर होत चालली आहे. परंतु प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. जर प्रशासनाने या गंभीर समस्येवर लवकरच कायमस्वरूपी तोडगा काढला नाही तर त्यांना आंदोलन करावे लागेल, असा इशारा नायगाव परिसरातील रहिवाशांनी दिला आहे. अंडरपासमधील पाणी साचलेल्या या रस्त्यांवरून मुले शाळेत कशी जातील? असा सवाल होत आहे. अकोला पावसामुळे कौलखेड परिसरातील गजानन नगर पावसाळे ले-आउट भागात रस्त्यावर पाणी साचले आहे.

पाण्याचा निचरा न झाल्यामुळे रस्त्यावर नाला निर्माण झाला असून, त्यातून मार्ग काढताना नागरिक आणि दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. नागरिकांच्या दैनंदिन हालचालींसाठी अडथळा ठरत आहे.साचलेल्या पाण्यातून वाट काढताना रस्त्यावरील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने याकडे मनपाने लक्ष देण्याी मागणी होत आहे.

## हनुमान गढी येथे रामवाटिकेसह छत्री तलाव परिसरात वृक्षारोपण

**प्रत्येकाने आपल्या भविष्यासाठी एक झाड लावण्याचा संकल्प**

● महासागर प्रतिनिधी
अमरावती दि. ३०:

अमरावती मनुष्याच्या जीवनात निसर्ग हा अत्यंत महत्वाचा आहे. निसर्गाचे संगोपन करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य असल्याने निसर्गप्रेमी आ. रवी राणा यांनी स्वत: पुढाकार घेत पवित्र हनुमान गढी येथील राम वाटिका व छत्री तलाव परिसरात वन विभाग व युवा स्वाभिमान पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत झाडे लावून वृक्षारोपण केले. तसेच संपूर्ण अमरावती शहरातील चौका चौकात वृक्ष लावण्याचा संकल्पही करण्यात आला.

झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देऊन प्रत्येकाने आपल्या भविष्यासाठी एक झाड लावण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आ. रवी राणा यांनी केले आहे.

वृक्षारोपण करताना सुनील राणा, सहायक वन संरक्षक ज्ञानेश्वर देसाई, वनपरिक्षेत्र अधिकारी वडाळी वर्षा हरणे, वनपाल बाबुराव खैरकर, प्रशांत पाटील, सोनाली नवले, शैलेंद्र कस्तुरे, सुमती ढोके, आशिष गावंडे, मीनल डकरे, ॲड. किरण मिश्रा आदी उपस्थित होते.

# माजी आमदार संजय रायमूलकर यांच्याकडून नुकसानीची पाहणी:बाधित भागातील शेतकऱ्यांशी संवाद

● महासागर प्रतिनिधी
हिवरा आश्रम दि. ३०:

संततधार पावसामुळे मेहकर तालुक्यात पेरणी झालेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार संजय रायमूलकर यांनी आज, दि. २९ जून रोजी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. शेतकऱ्यांना मदतीसाठी एकही क्षण दवडू नये. एकाही शेतकऱ्याला सर्वेक्षणातून वगळले जाऊ नये, असे निर्देश त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. तसेच तातडीने पंचनामे करण्याच्या सूचनाही दिल्या.

या पाहणी दौऱ्यात सुरेशतात्या वाळूकर, दिलीप देशमुख, रामेश्वर भिसे, राजूभाऊ काटे, अमर राऊत, पत्रकार शिवप्रसाद थुट्टे, रविराज रहाटे, किशोर इंगळे मोहन पाटील धोटे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी,




नुकसानग्रस्त शेताची पाहणी करताना माजी आमदार संजय रायमूलकर.

तहसीलदार नीलेश मडके, नायब तहसीलदार अजय पिंपरकर, मंडळ अधिकारी नितीन बोरकर, तालुका कृषी अधिकारी किशोर काळे, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे आदी उपस्थित होते.

# लोणार वन्यजीव अभयारण्य देशात दहावे तर राज्यामध्ये दुसऱ्या स्थानी:पर्यटन सुविधांच्या वाढीसाठीही लोणार येथे नवे दालन

● महासागर प्रतिनिधी
लोणार दि. ३०:

केंद्र सरकारच्या विशेष समितीने केलेल्या वन्यजीव अभयारण्यांच्या गुणांकनात लोणार येथील वन्यजीव अभयारण्याने देशातून दहावे आणि महाराष्ट्रामधून दुसरे स्थान पटकावले आहे.

देशातील ४३८ राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्यांच्या कार्य प्रदर्शनाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीने मागील वर्षी लोणार वन्यजीव अभयारण्याचा दौरा केला होता. या समितीत देशातील सर्व राज्यांमधील निवृत्त मुख्य प्रधान वन सचिवांचा समावेश होता. त्यांनी सन्? २०२० ते २०२५ या कालावधीत देशभरातील संरक्षित क्षेत्रांचा दौरा करून त्यांच्या संरक्षण, व्यवस्थापन, विकास व सुविधा यांचा सखोल अभ्यास केला. या सर्व बाबींवर आधारित गुणांकन करून अंतिम अहवाल तयार केला. यामध्ये लोणार अभयारण्याला ८८.२८ गुण देण्यात आले आहेत. त्यानुसार लोणार वन्यजीव अभयारण्याने देशात दहावे, तर राज्यात दुसरे स्थान प्राप्त केले आहे.

समितीने केलेल्या अभ्यासात राष्ट्रीय उद्यानांचे ''वाईट,''ठीक,''चांगले आणि ''उत्तम अशा चार श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातील ३४ संरक्षित क्षेत्रांचा समावेश होता. विशेष म्हणजे या ३४ पैकी एकाही जंगलाला ''वाईट श्रेणी देण्यात आली नाही. या समितीने अभ्यास दौऱ्यादरम्यान काही जंगलांमधील व्यवस्थापनात आधीच्या तुलनेत घट झाली असल्याचे अहवालात नमूद केले आहे. या स्थितीत सुधारणा



करण्यासाठी भागनिहाय उपाय, निधीवाढ, शास्त्रीय पद्धतींचा वापर आणि व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्याच्या सूचना अहवालात करण्यात आल्या आहेत. लोणार अभयारण्याला मिळालेल्या या गौरवामुळे येथे पर्यटनवाढीसाठी आणि भौतिक सुविधांच्या उभारणीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून भरघोस निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळवण्याच्या प्रयत्नांनाही यामुळे गती मिळणार आहे. लोणार सरोवर अभयारण्य .

गुणांकन प्रक्रियेची वैशिष्ट्ये या अभ्यासात वन व्यवस्थापनाची स्थिती जाणून घेण्यासाठी सहा विविध मानके ठरवण्यात आली होती. त्या आधारे देशभरातील संरक्षित क्षेत्रांचे २०२० - २०२२, २०२२ -२०२३ व २०२३ - २०२४ अशा तीन टप्प्यांमध्ये मूल्यांकन झाले. यात चंदिगड आणि केरळ या राज्यांनाच 'उत्तम' संपूर्ण व्यवस्थापन श्रेणी दिली.

# सुगंधी वनस्पती, मसाला पिके देणार लाभ -डॉ.प्रभातकुमार

## उद्यानविद्यावर्गीय पिकांच्या एकात्मिक विकासाचे अभियान

● महासागर प्रतिनिधी
अकोला दि. ३०:

विदर्भाचा विचार करता फळ पिकांसाठी अत्याधिक सुरक्षित वातावरण असून शाश्वत विदर्भ विकासासाठी सुगंधी वनस्पतीसह मसाल्यांचे पिके आर्थिक परिवर्तनाचे स्रोत ठरतील असे प्रतिपादन भारत सरकारचे उद्यानिकी आयुक्त डॉ. प्रभातकुमार यांनी केले. ते कालिकत, केरळ येथील सुपारी आणि मसाला पिके विकास संचालनालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे संयुक्त विद्यमाने कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या ''उद्यानविद्यावर्गीय पिकांच्या एकात्मिक विकासाचे अभियान अंतर्गत राष्ट्रीय स्तरावरील दोन दिवस वार्षिक पुनरावलोकन बैठकीचे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी २५ कोटी रुपयांचा निधी देशभरातील विविध संशोधन केंद्रांना मंजूर करण्यात आला.

यावेळी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे राज्यपाल नियुक्त तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय माहोरकर, सुपारी व मसाला पिके विकास संचालनालय, कालिकत केरळचे संचालक डॉ. होमी चेरियन,



मसाला पिकांवरील अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पाचे समन्वयक डॉ. डी. प्रसाद, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, उद्यानविद्या विभागाचे अधिष्ठाता डॉ. देवानंद पंचभाई, उद्यानविद्या विभागप्रमुख डॉ. अरविंद सोनकांबळे, नागपूरच्या कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू, प्रकल्प प्रमुख डॉ. विजय काळे आदी उपस्थित होते.

डॉ. प्रभातकुमार म्हणाले, मसाले व सुगंधी पिके विदर्भासाठी उत्पन्नाचे नवे साधन ठरू शकतात. यामध्ये प्रचंड आर्थिक संधी आहेत. या पिकांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीच्या पलीकडे जाऊन या पिकांकडे वळण्याची गरज आहे. केंद्र शासनामार्फत विविध योजनांद्वारे या क्षेत्राला आवश्यक पाठबळ दिले जात आहे.

मुख्यतः जिरायती शेती पद्धतीवर अवलंबून असलेला शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून कृषी विद्यापीठाने शाश्वत शेती तंत्रज्ञान गाव पातळीवर पोहोचविण्यासाठी मॉडेल व्हिलेज योजना, शेतकरी शास्त्रज्ञ मंचासह अनेकांनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची मालिका कृतीत आणली आहे, असे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले. शाश्वत जीवनमानासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानासह अपारंपारीक पीकपद्धतीचा अवलंब काळसुसंगत आहे. मसाल्याच्या व सुगंधी पिकांसह ओवा, धने, सोपं आदी अपारंपारिक पीक पद्धतीच्या संशोधनात प्रगती करत असून शेतकऱ्यांना नव्या दिशा देत असल्याचे देखील डॉ. गडाख यांनी याप्रसंगी नमूद केले.

### ७५ शास्त्रज्ञ सहभागी

वार्षिक बैठकीसाठी देशभरातून ७५ शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. कार्यक्रमानिमित्त मसाले व सुगंधी पिकांच्या संशोधनावर आधारित विविध वैज्ञानिक लेख, माहितीपत्रके, कृषी मार्गदर्शिका आणि क्षेत्रीय अनुभवांवर आधारित साहित्य प्रकाशित करण्यात आले. ते कृषी संशोधक, विस्तार अधिकारी आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल.

# खामगाव शहरामधील अतिक्रमणे काढण्याची कारवाई सुरूच

✦काही स्वयंस्फूर्तीने निघाली अतिक्रमणे
✦शहरातील रस्ते झाले मोकळे

● महासागर प्रतिनिधी
खामगाव दि. ३०:

खामगाव नगर परिषदेच्या वतीने शहरात सलग दुसऱ्या दिवशीही अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवण्यात आली असूनअतिक्रमणे काढण्याची कारवाई सुरूच होती.काही अतिक्रमणे धारकांनी स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने काढून घेतले तर काही अतिक्रमणावर जेसीबीचा हातोडा चालला. तगड्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई होत असून शहरातील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

खामगाव शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबवली जात आहे. नगर पालिका प्रशासनाने काही दिवसांपूर्वी शहरातील अतिक्रमणधारकांना नोटिसा देऊन स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याचे आवाहन केले होते. तसेच कारवाईचा इशारा देखिल दिला होता. दरम्यान, २७ जून पासून नगर पालिका प्रशासनाने मुख्याधिकारी डॉ.प्रशांत शेळके यांच्या नेतृत्वात अतिक्रमण हटवण्याची धडक मोहीम सुरु केली. शुक्रवारी टावर



चौक, नांदुरा रोड, जलंब नाका, नेहरू मार्केट रोड, सरकी लाइन, भुसावळ चौक, आठवडी बाजार परिसर यासह काही भागातील अतिक्रमण काढण्यात आले.तर शनिवारी सकाळी पुन्हा अतिक्रमण हटाव मोहिमेचा धडाका सुरू झाला. जेसीबी घेऊन नगर पालिका प्रशासनाने अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली. बस स्थानकासमोतील परिसर, सामान्य रुग्णालयासमोरील परिसर, टिळक मैदान, रेल्वे स्टेशन समोरील परिसर, कॉटन मार्केट, टिळक पुतळा परिसर, तलाव रोड, अग्रसेन चौक, नटराज गार्डन रोड, फरशी, मेन रोड, जगदंबा चौक, यासह काही भागातील अतिक्रमण काढण्यात आले. काही ठिकाणी अतिक्रमण धारकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला.

हातावर पोट भरणाऱ्यांचा झाला वांदा खामगाव शहरात नगर परिषदेच्या वतीने दोन दिवस अतिक्रमण काढण्याची मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत अनेक दुकाने जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आली. मात्र काही नागरिक दररोज आपला छोटा व्यवसाय करून कुटुंबाचा गाडा चालवत आहेत अशा नागरिकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. व्यवसायाची दुकाने नष्ट झाल्याने दररोज हातावर पोट भरणार याचा मात्र वांदा झाल्याची चर्चा नागरिकांमधून होत आहे.

# विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थापासून दूर राहावे ठाणेदार ठाकरे

● महासागर प्रतिनिधी

**चोहोट्टाबाजार दि. ३०:** शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांच्या आहारी न जाता आपले भविष्य उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावे. अनेकदा मित्रासाठी मजा म्हणून अंमली पदार्थाचे सेवन केल्याने विद्यार्थी व्यसनाधीन बनतो. अंमली पदार्थांचे दुष्परिणाम पाहता शारीरिक, मानसिक, कौटुंबिक तसेच सामाजिक संतुलन बिघडत आयुष्याचा नाश होऊ शकतो. त्यामुळे शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थापासून दूर राहावे तसेच नागरिकांना अमली पदार्थापासून दूर ठेवण्यासाठी परावृत्त केले पाहिजे, असे प्रतिपादन दहीहंडा पोलिस ठाण्याचे ठाणेदार पुरुषोत्तम ठाकरे यांनी केले. व्यसनमुक्तीसाठी ''ऑपरेशन उडान मोहीम राबवण्यात येत आहे. त्यानिमित्त चोहोट्टा बाजार येथे सार्वजनिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ठाणेदार पुरुषोत्तम ठाकरे होते. सार्वजनिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे संचालक मोहन बुंदे, प्राचार्य प्रवीण साळकर, पोलिस उपनिरीक्षक गणेश अवचार, दहीहंडा पोलिस ठाण्याच्या गोपनीय शाखेचे अम्बुस्कर, शिक्षक मेंढे, शरद बुंदे, पोलिस कर्मचारी स्वप्निल खडे आदी उपस्थित होते. यावेळी आपल्या देशात अंमली पदार्थांचे वाढते सेवन ही भयावह समस्या उभी ठाकली आहे, याबाबत मान्यवरांनी भावना व्यक्त केली. अंमली पदार्थ विरोधात व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे प्रतिपादन ठाणेदार पुरुषोत्तम ठाकरे यांनी केले. ठाकरे यांनी अंमली पदार्थ विरोधी पोस्टर व मोहिमेसंदर्भात माहिती दिली. विद्यार्थ्यांना अंमली पदार्थ तंबाखूच्या सेवनाने होणारे दुष्परिणाम व अपायांची माहिती देण्यात आली. तसेच अंमली पदार्थांचे दुष्परिणाम सांगत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीसाठी शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांमुळे आर्थिक, मानसिक व शारीरिक नुकसानीबद्दल शिक्षण देशात आले. या उपक्रमाबरोबरच विद्यार्थिनींना स्पर्श ज्ञान, गुड आणि बॅड टच कसा ओळखता यावे, याचे मार्गदर्शन देण्यात आले. या प्रकारांबाबत मुलींनी सजग रहावे असे सांगण्यात आले. विद्यार्थी हे देशाची भावी पिढी आहे. देशाचे भवितव्य विद्यार्थ्यांच्या हातात असून समाजात व्यसनमुक्तीचा संदेश देत नवा आदर्श निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान संपूर्ण चोहोट्टा बाजार परिसरात व्यसनमुक्तीचा संदेश देत रॅली काढण्यात आली. कार्यक्रम शरद बुंदे व घुगे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मोताळ्याच्या सचिन राणेचा झेंडा

**नेपाळ येथील स्पर्धेत १२० किलो वजन गटात सुवर्ण पदक**

● महासागर प्रतिनिधी
मोताळा दि. ३०:

नेपाळ येथे २१ ते २४ जून दरम्यान पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पार पडली या स्पर्धेत मोताळा तालुक्यातील २ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये सचिन राणे याने अव्वल येत सुवर्णपदकाची कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या स्पर्धेत भारत, श्रीलंका आणि नेपाळ येथील स्पर्धक सहभागी झाले होते त्यामध्ये १२० किलो वजनी गटात मोताळा येथील सचिन राणे आणि ८३ किलो वजनी गटात बोराखेडी येथील ओम हांडे या स्पर्धकांनी भाग घेतला होता.

दरम्यान, या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पॉवरलिफ्टिंगमध्ये शहरातील आदर्श नगरमध्ये राहत असलेला सचिन राणे या स्पर्धकाने अव्वल येऊन सुवर्ण पदकाची कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यामुळे त्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

या स्पर्धेत सुवर्ण पदकाची कामगिरी केल्यावर त्याचे २७ जून रोजी मोताळा येथील बस स्थानकावर आगमन झाले.

यावेळी बस स्थानक परिसरात गावकऱ्यांच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत त्याचे स्वागत करण्यात आले.




आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अव्वल आल्यावर सुवर्ण पदक घेताना सचिन राणे.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
(Library Department) Tender Notice

**NOTICE INVITING TENDER**

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e – tenders in other form / appropriate form for the following works. These e – tenders can be purchased from Website (https://mahatenders.gov.in). The terms and conditions of e – tenders are available on https://mahatenders.gov.in. Purchase and submission of e – tenders can be done through internet.

| Tender No. | Name of the Work | Tender Cost (in Rs.) |
| --- | --- | --- |
| 1 | Sale for Scrap Material (Such as Chair, Table, Stool, Ceiling Fan Motor, Computer set, Iron Almirah, Iron Book case, Damage wooden doors, wooden almirah, Iron bench stand, Table stand, Aluminium Door Frames, windows, Paper Rack, Inverter Battery etc.) at Various NMC Libraries of Nagpur City | 1,34,682/- |

Tender form, conditions of contract, specifications can be downloaded from the e-Tendering portal i.e. https://mahatenders.gov.in. Payment of tender cost shall be paid online using payment gateway only. The fees of tender document shall be non-refundable. Further information regarding the work can be obtained from the office of Education officer (Library Department), NMC, Civil Lines, Nagpur.

**Note :- 1.** Cost of Blank Tender (In Rs. 236/-) & EMD Rs. 2,000/- **2.** Last Date of submission : 07.07.2025 upto 3.00 PM. **3.** Date of opening : 08.07.2025 at 4.00 PM

Education officer, (Library Dept.)
N.M.C. Nagpur

Advt No. 235 PR Date 30.06.2025
P/N/25/235



## नगर परिषद कळमेश्वर-ब्राम्हणी, जि. नागपूर

मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी येथे खालील कामासाठी पंजीकृत आणि अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडून टक्केवारी दरावर (बी-१) निविदा मागविण्यांत येत आहे. कंत्राटदार शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे किवा तत्सम विभागाकडे योग्य श्रेणीत पंजीकृत असावा. कोरे निविदा प्रपत्र न.प. कार्यालयातून कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत रोखीने भरणा केल्यानंतर दि ०८/०७/२०२५ ला दुपारी २.00 वाजेपर्यंत प्राप्त करता येईल. अनामत रक्कम दि. ०८/०७/२०२५ चे दुपारी २.00 वाजेपर्यंत नगरपरिषदेत रोख भरुन रक्कम भरल्याचे पावतीसह मोहोरबंद निविदा दि.०८/०७/२०२५ ला दुपारी ३.00 वाजेपर्यंत मुख्याधिकारी, नगरपरिषद कळमेश्वर-ब्राम्हणी यांचे नावाने नगरपरिषद कार्यालयातील निविदा पेटीत सादर करावी. शक्य झाल्यास निविदा दि.०९/०७/२०२५ दुपारी १.00 वा. उघडण्यात येईल.

कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही निविदा नाकारणे तसेच रद्द करणे याबाबतचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवले आहे. इतर सविस्तर अटी व शर्ती नगर परिषद कार्यालयांत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पहावयांस मिळेल. शती व अटी शिथिल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांचे राहील.

| अ क्र. | कांमाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.) | अनामत रक्कम (रु.) | कोरी निविदा किंमत (रु.) | कामाचा कालावधी |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | न.प. कळमेश्वर-ब्राम्हणी अंतर्गत वार्ड क्र.१० थोराने लेआऊट खसरा क्र.९०५ मधील ओपन स्पेस अंतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ५३६०७० | ५३६० | १००० | १ महिने |

(आकाश सुरडकर)
प्रशासक तथा मुख्याधिकारी



## कार्यालय नगर पंचायत गोधनी (रेल्वे)

ता. नागपुर जि. नागपुर
Email ID :- npgodhanirailway@gmail.com
GST No :- 27AAELG1484E1DG

जा.क्र./नपं.गो.(रे.)/बांध. वि./११०७/२०२५ दिनांक :- ३०/०६/२०२५

### जाहीर सूचना

नगर पंचायत गोधणी (रेल्वे), ता. नागपूर (ग्रामीण) जि. नागपूर अंतर्गत बांधकाम विभागाकरिता कंत्राटी तत्वावर १ स्थापत्य अभियंता यांची नियुक्ती करायची आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०१/०७/२०२५ ते दिनांक ०७/०७/२०२५ दुपारी ३.०० वाजता पर्यंत अर्ज , शैक्षिणिक अहर्ता व अनुभव करणाऱ्यांनी सर्विस्तर दस्तावेजासह नगर पंचायत गोधणी (रेल्वे) कार्यालयात अर्ज सादर करावा.

कामाचा तपशील :-

| अनु. क्र | पदाचे नाव | पात्रता | मासिक मानधन |
| --- | --- | --- | --- |
| १ | कंत्राटी स्थापत्य अभियंता | १) B.E. Civil Engineering मान्यता प्राप्त विद्यापीठातून<br>२) नगर परिषद / पंचायत येथे किमान २ वर्ष काम केल्याचे अनुभव | ३५०००/- |

अटी व शर्ती

१)अर्जाचा कोणताही विशिष्ट नमुना नाही. उमेदवाराने साधा अर्ज सविस्तर दस्तावेज जोडुन नमुद वेळेत सिलबंद लिफाफ्यात सादर करावा.
२) सदर प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर पंचायत गोधनी (रेल्वे) यांनी राखुन ठेवला आहे.
३) सदर पद पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाचे असून शासकीय सेवेत सामवून घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
४) पुढिल टप्पाबाबत वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

(डॉ.सुप्रिया राठोड)
मुख्याधिकारी
नगर पंचायत गोधनी (रेल्वे)

# घोषणांची झगमग, अंमलबजावणीची अंधारी वाट

**भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे देशाच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाकांक्षी दस्तऐवज आहे. ह्यतीन वेळा हजेरी घ्या, तीन भाषा शिकवा, व्यावसायिक शिक्षण द्या, कौशल्यविकास कराह्ण अशा घोषणांनी भरलेले हे धोरण प्रथमदर्शनी आकर्षक आणि प्रगतिशील वाटते. परंतु या घोषणांचा आभास आणि खऱ्या अंमलबजावणीतील दरी हीच चिंतेची बाब ठरते. या धोरणाच्या मुळाशी जर डोकावले, तर असे दिसते की, यातून भारतातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वास्तव नजरेआड केले गेले आहे.**

भारत हा शहरी नवमध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणारा देश नाही, तर तो बहुसंख्य अल्पभूधारक, गरिब, ग्रामीण आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा देश आहे. अशा देशात ह्यपाश्चिमात्यह्ण शिक्षणधोरणांचे अनुकरण हे धोरणात्मक दुर्भाग्य आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात, तर ३१.१६% लोक शहरी भागात राहतात. याचा अर्थ असा की, भारतातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते लाखो विद्यार्थी अजूनही दोन वेळचे अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, आणि चांगली शाळा यासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने ₹नव्या धोरणांतर्गत₹ किती नवे शिक्षक नेमले? किती सरकारी शाळा उभ्या केल्या? या प्रश्नांची उत्तरे शून्यावर येऊन थांबतात.

आज एकीकडे सरकारी व अनुदानित शाळा बंद करण्याचा, तर खासगी, इंग्रजी माध्यमाच्या, विनाअनुदानित शाळा चालू करण्याचा व्यवस्थात्मक अजेंडा शासन राबवत आहे. ही दिशा केवळ बाजारीकरणाचीच नाही, तर कल्याणकारी राज्याच्या आत्म्यालाच दुर्लक्षित करणारी आहे. गरिबांच्या शिक्षणाचे हक्काचे व्यासपीठ सरकारच नष्ट करत असेल, तर सामाजिक न्याय, समतेची संकल्पना आणि ह्यसबका साथ, सबका विकास हे फक्त राजकीय घोषवाक्य ठरतात.

**शिक्षणाचा अधिकार आणि शासनाचे उत्तरदायित्व**

भारतीय संविधानाच्या कलम २१-अ नुसार प्रत्येक बालकाला ६ ते १४ वयोगटात मोफत व सक्तीचे शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. पण या अधिकाराला पूरक म्हणून आवश्यक असलेली व्यवस्थात्मक कुवत आपण उभी केली आहे का?

शिक्षक भरती प्रक्रिया थांबलेली आहे. शिक्षकांच्या १०० टक्के जागा भरल्या जात नाहीत. असंख्य जिल्हा परिषद शाळांमध्ये एकच शिक्षक कार्यरत आहे. मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अभ्यासक्रम, प्रशिक्षण, शिक्षक व साधनसामग्री या बाबतीत शासनाचा अंमल केवळ कागदावर दिसतो.

स्थानिक अस्मिता, भाषिक गौरव, मातृभाषेतील शिक्षण यासंबंधी शासनाचा दृष्टिकोन कुठे आहे? आज इंग्रजी माध्यमातील शाळांमध्येच यशाचे गमक मानले जाते.

मराठी भाषेतील गुणवत्तावान शिक्षण राबवण्याऐवजी शासन इंग्रजी शाळा सुरू करत आहे. शिक्षणाचा उद्देश हा मातृभाषेतील सर्जनशील विचारांची अभिव्यक्ती आणि समज असावा की, फक्त जागतिक बाजारात काम मिळवण्याचे साधन? हाच प्रश्न राज्य शासनाने स्वतःला विचारायला हवा.

शाळा म्हणजे केवळ इमारत नाही, ती एक संस्कृती असते, स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शाळांनी देशाला उत्तम नेते, प्रशासक, विचारवंत, डॉक्टर, शास्त्रज्ञ दिले. गावोगावी उभ्या राहिलेल्या या शाळा हे सामाजिक समतेचे, प्रगतीचे आणि लोकशाही शिक्षणाचे प्रतीक होत्या.

त्या काळात आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी, शाळा गावाच्या जवळ होत्या, परवडणाऱ्या होत्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवत होत्या.

आज मात्र शासनाला या शाळा परवडत नाहीत. शिक्षणाच्या नावाखाली खाजगीकरण, केंद्रीकरण, डिजिटल विभाजन आणि स्पर्धात्मक बाजारशक्ती वाढत आहे. गावात रस्ता, ब्रिज, कॉम्प्लेक्स होतोय, पण शिक्षणाच्या शाळा मात्र बंद होतात. ही स्थिती एका उदासीन आणि बाजारपेठा चालवणाऱ्या व्यवस्थेची जाणीव करून देते.

**शिक्षणाचा उद्देश काय?**

शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची, सामाजिक समतेचा पाया रचण्याची आणि राष्ट्रीय अस्मितेची उभारणी करणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया बाजारातील उत्पादन प्रणालीप्रमाणे आउटपुट ओरिएंटेड' म्हणजे 'फलनिष्पत्ती-केंद्रित' किंवा 'परिणाम-आधारित'. असू शकत नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण



डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
९३२६८७७७४९

शिक्षणात मूल्ये, समता, न्याय, सर्जनशीलता आणि भाषिक गौरव यांचा समावेश हवा. राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने शिक्षणाची दिशा केवळ जागतिक स्पर्धेसाठी नव्हे तर स्थानिक गरजांसाठी ठरवली पाहिजे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**
**वास्तवाचे विश्लेषण :**

**शिक्षक भरती व कमतरता :** मार्च २०२४ मध्ये अधिवेशनात लोकसभेत उत्तर देताना शिक्षण मंत्री म्हणाले की, देशात २०२३ अखेर पर्यंत ११.१६ लाख शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मान्य केले आहे. आता तर २०२५ मध्ये १४ लाखापेक्षा जास्त शिक्षकाचा जागा रिक्त आहेत.

महाराष्ट्रात २०२३ मध्ये १.२५ लाख शिक्षकांची पदे रिक्त होते सध्या १,५०,००० पेक्षा जागा रिक्त असू शकतात. ज्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये 'एक शिक्षक झ्र सर्व वर्ग' ही स्थिती विद्यमान आहे. रिक्त जागांमुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, ज्या पालकांना समाजव्यवस्थेचे जाण आणि भान आहे, असे पालक आपला उदरनिर्वाह तुटपुंज्या उत्पन्नात करत असतानाही आपल्या मुलाला खाजगी शाळेत घालतात. कारण त्यांना आपल्या मुलाला शिकवायचे आहे, त्याचे भवितव्य घडवायचे आहे, हीच त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

मात्र, ही अशी भयावह परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली असताना, जनप्रतिनिधी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. शिक्षण हक्काचा कायदा अस्तित्वात असतानाही, पुरोगामी महाराष्ट्रात मुलांचे शिक्षणच धोक्यात येणे ही बाब खेदजनक आणि शासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. मात्र, हे सारे होत असताना राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, आणि शिक्षण खात्याचे अधिकारी गप्प आहेत.

कोणत्याही अधिवेशनात शिक्षक भरतीवर ठोस योजना मांडली जात नाही. दरवेळी आश्वासनांचे ढग जमतात, पण शिक्षक भरतीचा पाऊस मात्र पडत नाही. शिक्षण ही राज्याची जबाबदारी असताना राज्यच जर आपल्या जबाबदारीपासून पळ काढत असेल, तर हा लोकशाहीचा पराभव नाही का?

आज गरज आहे ती शिक्षण क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याची. शिक्षक भरती प्रक्रियेला त्वरित गती देणे, रिक्त जागा तातडीने भरून शाळांना पुन्हा सक्षम बनवणे आणि शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. शिक्षक ही केवळ एक नोकरी नसून, ती समाज परिवर्तनाची बीजं पेरणारी संस्था आहे, याची जाणीव शासनाला ठेवावी लागेल.

**भारतातील ११.१६ लाख शिक्षक पदांची कमतरता (मार्च २०२४ पर्यंत)**
**प्रमुख राज्यांमधील रिक्त पदांची विभागणी**

**राज्याचे नाव अंदाजे रिक्त शिक्षक पदे (२०२३ अखेर)**

| | |
|---|---|
| उत्तर प्रदेश २.१५ लाख | राजस्थान ७५ ,000 |
| बिहार २.०७ लाख | ओडिशा ७२ ,000 |
| पश्चिम बंगाल १.१७ लाख | छत्तीसगड ६२ ,000 |
| महाराष्ट्र १.२५ लाख | आंध्रप्रदेश ५३ ,000 |
| मध्यप्रदेश ८९ ,000 | इतर राज्ये १.११ लाख |
| झारखंड ८२ ,000 | |

**शाळा बंद होण्याची स्थिती आणि वास्तवचित्र :**

भारतातील २०१० ते २०२० या दहा वर्षांच्या कालावधीत देशभरात तब्बल १.५ लाख शाळा बंद झाल्या आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी ३०० ते५०० शाळा बंद होत असल्याचा अहवाल राज्य शिक्षण आयुक्तालयाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

ही आकडेवारी चिंताजनक असून, ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. नीती आयोगाच्या २०२२ च्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निर्देशांकानुसार, देशातील शाळांची पायाभूत स्थिती अतिशय दुबळी आहे. ३१% शाळांमध्ये शौचालये कार्यरत नाहीत, ४१% शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, ५५ % शाळांमध्ये संगणक वा डिजिटल साधनांचा अभाव आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता ६वी पासून व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ १२ % शाळांमध्येच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षकच उपलब्ध नाहीत, आणि व्यावसायिक शिक्षकांची पदे तर अस्तित्वातच नाहीत. यामुळे ही योजना केवळ कागदोपत्री मर्यादित राहिली आहे.

३ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषेसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना फक्त मराठीत बोलणे बंधनकारक केले आहे. यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयात स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी महामंडळे आणि सरकारी अनुदानित आस्थापनांमध्ये देखील मराठी बोलणे सक्तीचे आहे.

२०२४ मध्ये मराठी भाषा धोरणात मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, असे एकीकडे म्हणतात, दुसरीकडे इंग्रजी माध्यम शाळांची संख्या २०१० मध्ये ७,००० वरून २०२३ मध्ये १३,५०० वर पोहोचली, तर मराठी माध्यम शाळांची संख्या १९,०००, वरून घटून १४,५०० वर आली आहे.

हे परिवर्तन केवळ भाषिक नसून, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीवरही परिणाम करणारे आहे.याकडे सरकार कधी लक्ष देणार हा अत्यंत चिंतनाचा प्रश्न आहे.

१५ मार्च २०२४ ला संच मान्यतेच्या संदर्भात नवीन निर्देश जाहीर केले अनेक मराठी शाळा आणि मराठी शाळेतील शिक्षक अतिरिक्त व्हायला लागले. परंतु या मराठी शाळा जिवंत राहिला पाहिजे यासाठीच कोणते धोरण शासन अवलंबताना दिसत नाही, मराठी शाळा कशा बंद करता येईल याचा षडयंत्र सरकारच्या माध्यमातून सुरू असल्यास सातत्याने लोकांमध्ये चर्चा होत आहे.

Unified District Inormation System for Educatina Plus च्या अहवालानुसार २०१० ते २०२३ या कालावधीत शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ३५% नी घटली, तर खासगी शाळांतील विद्यार्थी संख्या ४२ % नी वाढली. यामुळे शालेय शिक्षणाचे खाजगीकरण वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

याच काळात भारत शिक्षणावर GDP च्या केवळ २.९ % इतका खर्च करतो, जे ठएढ ने शिफारस केलेल्या ६ % च्या निकषाच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे. या सर्व आकडेवारीवरून स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी अत्यंत मर्यादित स्वरूपात होत आहे.

शिक्षकांची कमतरता, शाळांची पायाभूत सुविधांची दुर्दशा, स्थानिक भाषांचे दुर्लक्षण, शाळा बंद होण्याची वाढती प्रवृत्ती आणि शिक्षणाचे आक्राळविक्राळ खाजगीकरण ही सर्व अत्यंत गंभीर समस्या आहेत.

शैक्षणिक धोरण हे केवळ घोषणापत्र न राहता सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार असले पाहिजे, ही आज देशवासीयांची रास्त आणि टोकदार अपेक्षा आहे. भारताच्या शैक्षणिक धोरणाला नव्या दृष्टिकोनाने तपासण्याची गरज आहे.

शिक्षणाच्या प्रश्नांमध्ये सामान्य नागरिक, पालक, शिक्षक, समाजशास्त्रज्ञ आणि विधिज्ञ यांचा सहभाग हवा. शासनाच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारणारे, अभ्यास करणारे आणि सजग राहणारे नागरिक निर्माण झाले, तरच ख?या अथार्ने शिक्षण लोकशाहीचे माध्यम बनू शकेल. अन्यथा ही धोरणं केवळ घोषणाच राहतील.

# चैतन्याची सळसळती मशाल अरूणभाऊ अडसड

आज आदरणीय भाऊंचा वाढदिवस भाऊ आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा....

पाण्यालाही पेटवणारा वक्ता,चैतन्याची सळसळती मशाल, प्रगल्भ विचार दिलदार मन रोखठोक भूमिका, प्रशुब्ध मनाची निशब्द हूंकार म्हणजे आदरणीय भाऊ विदर्भाची मुलख मैदानी तोफ, विकासाचा महामेरू, विदर्भाचा बुलंद आवाज, कार्यकर्त्यांना कार्यकर्ता नव्हे तर स्वतःच्या लेकराखेरीज सदैव पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तीमत्व म्हणजे आदरणीय अरूणभाऊ अडसड..



अरूणभाऊ अडसड विदर्भाचा बुलंद आवाज म्हणून ख्याती प्राप्त. ही ख्याती नव्हे तर तमाम कार्यत्यांनी भाऊंना घातलेली प्रेमळ साद आहे. ज्या व्यक्तीमत्वाने कित्येकांना घडवल कित्येकांना तारल कित्येकांची भवितव्ये घडवली. कारण सदैव मनी एकच विचार कार्यकर्ता हा कार्यकर्ता नसून आपल्याच कुटूंबातील सदस्य आहे अशी ज्यांची वागणूक, सर्वांस पोटास लावणे आहे, या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रल्गभ विचाराचा हाच वारसा अंगी तेवत समाजात प्रत्येक घटकांत वावरतांना भाऊंची हि भूमिका आपणांस बघावयास मिळते.

*फिटे अंधाराचे जाळे*
*झाले मोकळे आकाश..*

बस याच काळ्या किभ्भीन्न अंधारात प्रकाशाचा एक ओघ एक प्रकाशाचा किरण स्वतःच बुलंद अस व्यक्तीमत्व निर्माण करणारा माणूस म्हणजे भाऊ, साधं आणि सरळ म्हणायचं झाल्यास दिवाणखान्यात लोक निरोपयोगी मनी प्लॅन्टला पाणी घालतात पण त्याच घराच्या त्याच दिवाणखान्याच्या गॅलरीमध्ये संबंध ताकतिनीशी चारही खाने चित करीत त्या सिमेंटच्या भिंतीला जणू भूकंपाचा हादरा बसावा त्याप्रमाणे सिमेंट फोडून पिंपळाप्रमाणे स्वबळावर स्वतःच एक आगळ वेगळ अस्तित्व निर्माण करत वरती येतो. ज्याला खत पाणी कोणीही घातलेल नसत तरी तो प्रस्थापित भिंती फोडून जगाला दाखवतो आपल स्वतंत्र अस्तित्व.

आता चंदेरी दूनियेचा काळ आहे. ज्यांना देश सुद्धा त्यावेळी स्विकारायला तयार नव्हता. आता असे कितीतरी लोक सांगतील दूनियेला वेड लावणारे, आता चालतीचा काळ आहे तो पडतीचा काळ होता आणि त्याकाळात विदर्भात ज्याच अस्तित्व नव्हतं ज्याच नावलौकिक विदर्भात उदयास नव्हतं त्याकाळात धामणगाव तालुक्यातच नव्हे तर संबंध विदर्भ आपल्या वाणीने, तेजोमय वृत्तीने, अथक संघषार्तून भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व स्विकारत एक अशी कार्यकर्त्यांची माळ त्यांनी गुंफली की ती तुटता तुटेना. अखेर खरा विदभार्चा बुलंद आवाज उदयास आला.

त्या काळी भाऊंनी धुरा सांभाळत पक्षाला ज्या उच्चांकावर नेऊन ठेवले की जिथून आता परतीची तमा नाही. माझ्या शब्दांत भाऊंच वर्णन म्हणजे भारदस्त व्यक्तीमत्व, अत्यंत महत्वकांशी, धुरंधर राजकारणी, प्रभावी नेतृत्व आणि वकृत्वाने जनसमुदायाला आपलस करणारे व्यक्तीमत्व आमचे प्रितृतुल्य अरूणभाऊ अडसड.

प्रत्येक विजयात संघर्ष अन संघर्षात विजय म्हणजे भाऊ... प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने पोहण्याच धाडस करून प्रवाह बदल्याणी अफाट ताकत म्हणजे भाऊ... आपल्या कार्यकर्त्यांना भरल्या अंतकरणाने सांगतात की आता रडायचं नाही तर लढायचं हा प्रबळ विश्वास आत्मविश्वास म्हणजे भाऊ... कार्यकर्त्यांना पाठीवर शाबासकीची थाप मारली की त्याला देवरूपी आशीवार्दाचा भास म्हणजे भाऊ... दुर्भाग्याच रूपांतर भाग्यात करणारा परिवर्तनवादी विचार म्हणजे भाऊ... कधी अडवाणी कधी अटलजी तर कधी मोदीजींच्या खांद्यास खांदा लावून लढणारा माणूस म्हणजे भाऊ... बहिरमच्या यात्रेत शेतकऱ्यांसाठी गोळ्या झेलणारा माणूस म्हणजे भाऊ... शिमला कराराच्या वेळेस तुरूंगवास भोगणारा माणूस म्हणजे भाऊ... साधू संताच्या चरणी नतमस्तक होणारा माणूस म्हणजे भाऊ... सरतेशेवटी कधी काळ्या पैशाच्या अभावी तर कधी स्वतःच मोठ्या केलेल्या आपल्याच माणसांच्या फितुरीपणानी हरणारा माणूस म्हणजे भाऊ... ज्याची किर्ती आणि यशोगाथा आज मला लिहताना कुठे आनंद तर अश्रू अनावर होतात तर शब्द अपूरे पडतात असे हे अफाट व्यक्तीमत्व म्हणजे भाऊ आदरणीय अरूणभाऊ...

भाऊ आपणांस जुना धामणगाव देशमुख परिवाराकडून वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दीक हार्दीक शुभेच्छा....



वैभव मीनाक्षी सुभाषराव देशमुख
जुना धामणगाव, जि.अमरावती.
एक कार्यकर्ता
९६६५७९६१२४

# सामान्य माणूस आणि विश्व बँक

सामान्य माणसाला बँक हा शब्द फक्त बचतीचे पासबुक त्यातील सरकारी योजनेचे खात्यात जमा झालेले पैसे, मासिक पगार, पेन्शन, ठेवीवरील व्याज, आवर्त ठेव, गृह कजार्चा हप्ता एवढ्याच पुरता शक्यतो मर्यादित असतो. वर्ल्ड बँक म्हणजेच विश्व बँक याविषयी तर वर्तमानपत्रातून किंवा वृत्तवाहिन्यांवरून कानावर पडते तेवढेच. आपल्या दैनंदिन आयुष्याशी याचा काय संबंध? याचा आपल्याला काय उपयोग असे अनेक वेळा प्रश्न पडतात. १ जुलै विश्व बँकेच्या स्थापना दिनानिमित्त हा लेख सामान्य माणूस आणि विश्व बँक यांच्यातील नात्याचा वेध घेण्यासाठी लिहीत आहे. सदर लेख लोकांच्या अधिकारांविषयी जागरूक करतो. त्याचा उद्देश कोणावरही टीका नसून आपल्या लोकशाही प्रक्रियेचा भाग मजबूत करणे आहे .

---

विश्व बँकेची स्थापना १ जुलै १९४४ रोजी अमेरिकेतील ब्रेटन वुड्स या शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेवेळी झाली. या परिषदेत भारतासह ४४ देशांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला होता.

बँकेचा मूळ हेतू दुसऱ्या महायुद्धानंतर नुकसान झालेल्या देशांच्या पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत करणे हा होता. ही संस्था आंतरराष्ट्रीय पुनर्बांधणी आणि विकास बँक (IBRD) म्हणून ओळखली जात होती. नंतर ती विश्व बँक गट म्हणून विकसित झाली ज्यामध्ये आज खालील पाच संस्था आहेत. आय बी आर डी, आय डी ए, आयएफसी, एम आय जी ए, आणि आयसीएसआयडी.

आज विश्व बँक विकसनशील देशांना कर्ज, ,तांत्रिकसहाय्य, ज्ञान व धोरणात्मक मार्गदर्शन पुरविते. बँकेचे मूळ उद्दिष्टे दारिद्र्य निर्मूलन, शाश्वत विकास, आरोग्य, शिक्षण, पाणी,ऊर्जा, पायाभूत सुविधा, पर्यावरण, संरक्षण यांना मदत करणे हा आहे. आज एकूण १८९ देश विश्व बँकेचे सभासद आहेत.

भारत २७ डिसेंबर १९४५ रोजी विश्व बँकेचा अधिकृत सदस्य बनला. सदस्यत्वानंतर भारताने १९४९ मध्ये पहिले कर्ज रेल्वे पुनर्बांधणीसाठी घेतले. सन २०२४ अखेरपर्यंत भारताने विश्व बँकेकडून एकूण सुमारे १०५ अब्ज डॉलर इतकी मदत कर्ज व अनुदानासह घेतली आहे. ग्रामीण रस्ते, जलसंपदा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, शहरी पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा ,डिजिटल प्रकल्प इत्यादीसाठी हे कर्ज घेतले आहे.



संदीप यशवंत मोने
8698779546

विश्व बँक देशांना कर्ज देताना काही अटी व सामाजिक जबाबदा?या यांची बंधनेही घालते. ज्यात पर्यावरण संरक्षण, पुनर्वसित नागरिकांचा हक्क, पारदर्शक प्रशासन, स्थानिक जनतेचा सहभाग अशा प्रमुख बाबी असतात जे पाळणे कर्ज घेतलेल्या देशाला बंधनकारक असते. प्रकल्प मंजूर करताना प्रभावित नागरिकांवर काय परिणाम होईल, पर्यावरणावर कसा परिणाम होईल हे सर्व पैलू तपासले जातात. हे प्रकल्प अनेक वेळा स्थानिक जनतेच्या जीवनावर, पर्यावरणावर व उपजीविकेवर परिणाम करू शकतात. हे परिणाम नकारात्मक ठरत असतील तर जनतेला तक्रार नोंदविण्याचा अधिकार असतो.

कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पामुळे नुकसान झाल्यास किंवा अन्याय होत असल्यास प्रकल्पग्रस्तास न्याय मागण्यासाठी शासन व न्यायपालिका या दोन घटनात्मक मार्गांचा अवलंब करता येतो. मात्र या तक्रारीच्या निवारणाला नेहमीच ठोस काल मर्यादा नसते. न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू शकते. प्रशासकीय यंत्रणांमध्येही अनेक वेळा विलंब होऊ शकतो. अशावेळी विशिष्ट कालमर्यादेनुसार काम करणारी व पारदर्शकतेचा आग्रह धरणारी विश्व बँकेची जी आर एस प्रणाली (GRS) एक प्रभावी पर्याय ठरू शकते.

स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रकल्पांमध्ये तक्रारीचे निवारण केवळ प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियेवर अवलंबून रहात नाही. अनेकदा त्यावर राजकीय समीकरणांचा ही प्रभाव जाणवतो. विश्व बँकेकडून घेतलेले कर्ज सरकारचे असले तरी त्याची परतफेड थेट सरकारी महसुलातून म्हणजेच नागरिकांनी भरलेल्या करातून केली जाते. मग तो थेट कर असो किंवा अप्रत्यक्ष कर असो.

या माध्यमातून जमा होणारा निधी हे कर्ज फेडण्यासाठी वापरला जातो . त्यामुळे या प्रकल्पाबाबत विशेषतः त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार सामान्य जनतेचा आहेच.

तक्रार, चौकशी किंवा पुनर्विचारासाठी उपलब्ध असलेला विश्व बँकेचा हा तिसरा दरवाजा अजूनही अनेकांसाठी अपरिचित आहे. या दरवाजाचे नाव आहे वर्ल्ड बँक ग्रीव्हियन्स रिड्रेस सिस्टीम. या प्रणालीचा जन्म १० वर्षांपूर्वी झाला.

सन २०२४ या वर्षात जागतिक पातळीवर ७२३ तक्रारी या संस्थेस प्राप्त झाल्या. सन २०२३ च्या तुलनेत यात सुमारे ३४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचाच अर्थ या तक्रार प्रणालीची विश्वासार्हताही वाढली आहे .

जागतिक बँक, कर्ज घेणारे देश आणि बाह्य भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे तक्रारींचे निराकरण करण्यात जीआरएसला यश प्राप्त झाले आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त आणि जागतिक बँकेमध्ये विश्वास निर्माण झाला आहे . जीआरएस प्रणाली ही जागतिक बँकेकडे थेट तक्रारी करण्याचा एक मार्ग आहे .

तुम्ही grievances @worldbank.org या संकेतस्थळावर तुमची तक्रार नोंदवू शकता. तक्रार कोणत्याही भाषेत करता येते. एक व्यक्तीही तक्रार नोंदवू शकते. नोंदविलेल्या तक्रारीबाबत पूर्ण गोपनीयता बाळगली जाते. प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे मूल्यांकन करण्यात येते. जीआरएस कडे प्राप्त झालेल्या अनेक तक्रारींचा संबंध हा भूसंपादन प्रक्रियेशी असतो.

येथे केवळ जागतिक बँकेने कर्ज दिलेल्या प्रकल्पांची तक्रार स्वीकारण्यात येते. जे प्रकल्प होऊ घातले आहेत किंवा त्यांचे काम चालू आहे तसेच १५ महिन्यापेक्षा कमी काळाकरिता बंद असलेल्या प्रकल्पांचीच दखल घेण्यात येते. तक्रार स्वीकारल्यानंतर प्रकल्पाचा आढावा घेण्याकरिता पथक नेमण्यात येते.

सदरचे पथक तक्रारींची गंभीर दखल घेऊन काम करते. एकाच प्रकल्पाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यास जागतिक बँक संबंधित देशाच्या सरकारला जाब विचारून योग्यती कार्यवाही करावयास भाग पाडते . काही तक्रारींची दखल घेऊन जागतिक बँकेने प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने अतिरिक्त भरपाई मिळवून दिली आहे.

कोणतेही प्रकल्प जाहीर झाल्यावर जमीन अधिग्रहणाबाबत प्रकल्पग्रस्तांना सरकारकडून कळविले जाते. तसेच त्यांच्या काही हरकती असल्यास त्याची नोंद करण्यात येते. सरकार प्रकल्पग्रस्तांच्या या हरकतींवर सुनावणी घेते. हीच वेळ साधून प्रकल्पग्रस्तांनी सरकारने सदर प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेतले आहे का? याची विचारणा करायला हवी. त्याबाबतची कागदपत्रांची मागणी करायला हवी. जागतिक बँकेला तक्रार करणे म्हणजे आपल्या देशाचे विषय बाहेर चव्हाट्यावर आण्यासारखे बिलकुल ठरणार नाही. तो आपला अधिकार आहे. शेवटी कर्ज देणारे तेच आहेत. त्यांच्यापर्यंत या गोष्टी पोहोचायलाच हव्यात. हे कळविल्यामुळे विश्व बँकेला काही आवश्यक ध्येयधोरणे बदलण्यास ही मदत मिळेल.

आपण पुढे जात असताना आपल्या देशात, राज्यात जिल्ह्यात आणि आपल्या तालुक्यात विश्व बँकेच्या निधीतून चालू असलेल्या प्रकल्पांची माहिती ठेवणे आणि सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे .विकास आवश्यक आहे पण तो सर्वसमावेशक, पारदर्शक असला पाहिजे. खरा प्रश्न विकास व्हावा का? असा नसून तो कसा व्हावा असा आहे .

हे लक्षात ठेवा खरा विकास म्हणजे फक्त रस्ते किंवा पूल बांधणे नव्हे तर विश्वास, न्याय आणि सर्वांसाठी संधी निर्माण करणे हा आहे .तुमचा आवाज महत्त्वाचा आहे त्याचा योग्य वापर करा आणि बदल घडवा. तर बघा हा विश्व बँकेचा तिसरा दरवाजा ठोठावून.



# नाश्त्यात बनवा आरोग्यदायी आणि चविष्ट पदार्थ

नाश्ता हा दिवसातला सगळ्यात पहिला आहार असतो. दिवसाची सुरूवात करताना नाश्ता हा पोटभर करायचा असतो आणि त्याचवेळी पौष्टिक असणं फार महत्वाचं आहे. अशातच आपण रोज असा नाश्ता करावा जो आपल्या शरीराला आवश्यक सर्व पोषण त्यात मिळतील. त्यातच रोज नाश्ताला काय बनवायचं हे प्रत्येक महिला रोजचा प्रश्न पडत असतो. त्यात घरातील मंडळी हे दररोज नाश्त्यात काहीतरी नवीन असेल तर सगळ्यांनाच ते खायला खूप आवडतं. त्यात घरच्यांना काहीतरी पौष्टिक खाऊ घालावं असं महिलांना वाटत असतं.

१. जर काही हेल्दी खायचे असेल आणि ते पदार्थ चविष्टही हवे असेल, तर ओट्स विथ फ्रूट्स ॲंड सीड्स पासून तयार नाश्ता तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. ते बनवण्यासाठी ओट्स ५-७ मिनिटे दुधात उकळवा.

ते थंड झाल्यावर त्यावर बारीक तुकडे केलेली फळे, चिया/अळशीचे बिया आणि ड्रायफ्रुट्स मिक्स करा. चव वाढवण्यासाठी तुम्ही थोडे मध देखील त्यात टाकू शकता. हा पौष्टिकतेने समृद्ध नाश्ता पचनापासून ते ऊर्जा वाढवण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी खूप चांगला आहे.

२. ग्रीक दही पार्फे हा पदार्थ नाश्त्यात खाण्यासाठी एक अतिशय चविष्ट आणि आरोग्यदायी पर्याय आहे. उन्हाळ्यात ग्रीक दही पार्फे हा पदार्थ खाणे आणखी फायदेशीर आहे. यासाठी प्रथम एका ग्लासमध्ये दह्याचा थर टाका. नंतर ग्रॅनोला, नंतर फळे आणि वरून त्यावर मध आणि सीड्स टाका. त्यानंतर हे ५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा आणि सर्व्ह करा. उच्च प्रथिने, हेल्दी फॅट आणि फायबरने भरलेला हा नाश्ता चवीलाही अद्भुत आहे.

३. होल ग्रेन टोस्टसह व्हेजिटेबल ऑम्लेट बनवण्यासाठी, अंडी फेटून त्यात चिरलेल्या भाज्या, मीठ आणि मिरपूड टाका. नॉन-स्टिक पॅनवर तेल लावा आणि ऑम्लेट बनवा. टोस्टसोबत सर्व्ह करा. अंडी प्रथिनांचा एक उत्तम स्रोत आहे तर ब्रेडमध्ये फायबर असते. पौष्टिकतेने समृद्ध हा नाश्ता चवीलाही खूप चांगला आहे.

४. पॅनकेक्स फक्त मुलांनाच आवडत नाहीत तर मोठ्यांनाही आवडतात. ते हेल्दी पद्धतीने बनवण्यासाठी तुम्ही त्यात बेसन वापरू शकता. ते बनवण्यासाठी तुम्हाला बेसनाच्या पिठात कांदा, टोमॅटो आणि हिरवी मिरची मिक्स करा आणि त्यात हळद, मीठ आणि जिरे टाकूल चांगले मिक्स करा. थोडे तेल लावून ते तव्यावर टाकून शिजवून दोन्ही बाजुंनी चांगले भाजा. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा कमी कार्ब आणि हेल्दी फॅटचा नाश्ता चांगला आहे.

५. मल्टीग्रेन टोस्टवर बनवलेला ॲव्होकॅडो देखील खूप चविष्ट असतो. हा नाश्ता तयार करण्यासही कमी वेळ लागतो. यासाठी, तुम्ही फक्त ॲव्होकॅडो मॅश करा आणि त्यात मीठ, लिंबू आणि मिरची टाका. आता हे मिश्रण टोस्टवर पसरवा. त्यात हेल्दी फॅट असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असतात.

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## आंधळं दळतय अन..!

आंधळ दळतय
कुत्रं पिठ खातय
शासकीय योजनेचं
हे असच असतय ... !
रेशनचं धान्य असो की
लाडकी बहीण योजना
पात्र लाभार्थ्यांच्या पदरात
पडतेय का ते पहा ना?

योजनांचा हेतू खरचं
कितपत होतोय सफल
पुनर्मुल्यांकनाची शासन
कां घेत नाही दखल?

# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने युवा तरुणांसाठी एक मार्केट लिंक्ड उत्पादन लाँच

**नागपूर, ३० जून :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे एक मार्केट-लिंक्ड उत्पादन लाँच केले आहे, जे ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी सक्षम बनवते.

हे उत्पादन फक्त १००० रुपयांच्या मासिक प्रीमियममध्ये खरेदी करता येते, ज्यामुळे तरुण ग्राहकांचा मोठा वर्ग नियमितपणे गुंतवणूक करून आपले दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करू शकतो. या उत्पादनामध्ये जीवन विमा संरक्षणाचा एक घटक देखील समाविष्ट आहे, जो ग्राहकाच्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

अमित पालटा, चीफ प्रॉडक्ट आणि डिस्ट्रीब्युशन ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स यांनी सांगितले, भारत ही सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि मॉर्गन स्टॅन्लीच्या मते, २०२८ पर्यंत ती जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारताची ही प्रगती मुख्यतः तरुण वर्गामुळे घडत आहे, जो सुमारे ६५% लोकसंख्येचा हिस्सा आहे. युएलआयपी उत्पादने त्यांच्या रचनेनुसार संपत्ती निर्मितीसाठी प्रभावी साधने आहेत आणि तरुणांनी लवकर गुंतवणूक सुरू करावी आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी प्रेरित व्हावे यासाठी आम्ही आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे उत्पादन लाँच केले आहे. हे उत्पादन परवडणारे, कर-बचतक्षम असून तरुणांना केवळ १००० रुपये मासिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते.

या उत्पादनाचा प्रमुख ग्राहक वर्ग हा डिजिटल प्लॅटफॉर्मवर ब्रँड व उत्पादने वापरण्यास प्राधान्य देतो हे लक्षात घेऊन आम्ही पूर्णपणे डिजिटल खरेदी प्रक्रिया सुलभ केली आहे.

आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे उत्पादन ग्राहकांना २५ फंड्स आणि ४ पोर्टफोलिओ स्ट्रॅटेजीजचा पर्याय देते. याशिवाय, ग्राहक कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा कराशिवाय एक फंड सोडून दुसऱ्या फंडमध्ये स्विच करू शकतात, ज्यामुळे ते आपल्या संपत्तीचे वाटप अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रित करू शकतात. या उत्पादनामध्ये जीवन विमा कव्हर देखील समाविष्ट आहे. विशेष म्हणजे, ग्राहक वेव्हर ऑफ प्रीमियम हे ॲड-ऑन बेनिफिट पर्याय निवडू शकतात, जे पॉलिसीधारकाच्या अनुपस्थितीत देखील त्यांचे दीर्घकालीन बचतीचे उद्दिष्ट कायम राहण्यास मदत करते.

पालटा पुढे म्हणाले, या उत्पादनाच्या लाँचद्वारे आमचे लक्ष ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारी उत्पादने तयार करण्यावर आहे. हे किफायतशीर उत्पादन व्यक्तींना लवचिकता, स्पष्टता आणि मानसिक शांततेसह त्यांच्या भविष्याची योजना आखण्यास सक्षम बनवते.

# पाइन लॅब्स लिमिटेडने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, ३० जून :** पाइन लॅब्स लिमिटेड (कंपनी) ही व्यापाऱ्यांसाठी, ग्राहक ब्रँड्ससाठी, उद्योगांसाठी आणि वित्तीय संस्थांसाठी डिजिटल पेमेंट्स व इश्यूइंग सोल्युशन्सद्वारे व्यवसायाचे डिजिटायझेशन करणारी एक टेक्नॉलॉजी कंपनी आहे. कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस बाजार नियामक भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड कडे दाखल केला आहे.

या इश्यूमध्ये एकूण २६,००० दशलक्ष (२,६०० कोटी)चा नवीन समभाग विक्री प्रस्ताव (फ्रेश इश्यू) आणि विक्री करणाऱ्या भागधारकांकडून एकूण १४,७८,२२,२२५ इक्विटी शेअर्सच्या विक्रीचा प्रस्ताव (ऑफर फॉर सेल) समाविष्ट आहे.

पाइन लॅब्सने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या ९ महिन्यांच्या कालावधीत एकूण ७,५३१.०५ अब्ज ग्रॉस ट्रान्झॅक्शन व्हॅल्यू आणि ३.९७ अब्ज व्यवहार आपल्या प्लॅटफॉर्म्सद्वारे प्रक्रिया केले. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कंपनीकडे ९,१५,७३१ व्यापारी, ६६६ ग्राहक ब्रँड्स व एंटरप्रायझेस आणि १६४ वित्तीय संस्था होत्या, ज्या तिचे प्लॅटफॉर्म वापरून व्यवहार जलद, सुरक्षितपणे आणि सुलभतेने करत होत्या व त्यांचे व्यवसाय व्यवस्थापित करत होत्या.

पाइन लॅब्स आपल्या डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर आणि ट्रान्झॅक्शन प्लॅटफॉर्म, तसेच इश्यूइंग आणि ॲक्वायरिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अनेक सेवा पुरवते. रेडसीयर रिपोर्टनुसार, भारतात, जो की कंपनीचा मुख्य बाजार आहे, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ट्रान्झॅक्शन व्हॅल्यूच्या दृष्टीने पाइन लॅब्स ही क्लोज्ड आणि सेमी-क्लोज्ड लूप गिफ्ट कार्ड इश्यू करणारी सर्वात मोठी कंपनी ठरली.

त्याचप्रमाणे, डिजिटल कंझ्युमर पॉइंट्स वर डिजिटल अफॉर्डेबिलिटी सोल्युशन्स पुरविणारी सर्वात मोठी कंपनी, भारतातील टॉप ५ इन-स्टोअर डिजिटल प्लॅटफॉर्म्सपैकी एक आणि भारत कनेक्ट ट्रान्झॅक्शन्स प्रोसेसिंग सेवा पुरविणाऱ्या अग्रगण्य कंपन्यांपैकी एक म्हणूनही कंपनीची ओळख निर्माण झाली आहे, असे रेडसीयरच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर करण्यात येणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड या दोन्ही प्रमुख शेअर बाजारांवर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचिबद्धतेचा तपशील)

या इश्यूसाठी बुकरनिंग लीड मॅनेजर्स म्हणून ॲक्सिस कॅपिटल लिमिटेड, मॉर्गन स्टॅन्ली इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, जे.पी. मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्या कार्यरत आहेत.

# जिल्ह्यात आज 'अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस'

**बुलडाणा, ३० जून :** केंद्र सरकारच्या आर्थिक सेवा विभागाच्या निर्देशानुसार १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान 'वित्तीय समावेशन मोहीम' जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत १ जुलै रोजी 'अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस' म्हणून साजरा केला जाणार आहे.

समाजातील वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये सामावून घेणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार या दिवशी जिल्ह्यातील २५ नागरिकांचे अटल पेन्शन योजनेंअंतर्गत नोंदणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व बँक शाखांना प्रत्येकी १०० अटल पेन्शन योजना नोंदणीचे उद्दिष्ट, तर सर्व बँकिंग प्रतिनिधींना प्रत्येकी २५ नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

अटल पेन्शन योजना ही केंद्र शासनाची योजना असून, १८ ते ४० वयोगटातील सर्व नागरिकांसाठी खुली आहे. या योजनेअंतर्गत नियमित मासिक प्रीमियम भरल्यास वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर निश्चित मासिक पेन्शन दिली जाते.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १ जुलै रोजी आपल्या जवळच्या बँक शाखा किंवा बीसी केंद्रावर जाऊन अटल पेन्शन योजना साठी नोंदणी करावी आणि वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षिततेचा आधार मिळवावा. तसेच या उपक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक यांनी केले आहे.

# सेलिब्रिटी कॅपिटल आणि ईव्ही क्रांती: सुनील शेट्टी, केएल राहुल, अहान शेट्टी आणि अक्षै वर्डे एकत्र येऊन सादर करतात एक्सेलमोटो

**मुंबई, ३० जून :** भारतात इलेक्ट्रिक मोबिलिटी आता अधिक वेगवान, स्वच्छ, स्टायलिश आणि महत्त्वाकांक्षी बनली आहे. एक्सेलमोटो ची स्थापना प्रसिद्ध Designer and Automative Entrepreneur अक्षै वर्डे यांनी केली असून, या उपक्रमाला अभिनेता-उद्योजक-मार्गदर्शक सुनील शेट्टी, क्रिकेट स्टार केएल राहुल आणि तरुणांचा आयकॉन अहान शेट्टी यांचा पाठिंबा आहे ज्यामुळे विश्वासार्हता, कूलनेस आणि पिढ्यानपिढ्यांचा प्रभाव एकत्र येतो.



एक्सेलमोटो ने जून २८ पासून प्री-ऑर्डर विंडो सुरू करण्याची घोषणा केली आहे. प्रथम ९९९ ईबाईक साठी ४९९ मध्ये बुकिंग उपलब्ध आहे अधिकृत वेबसाइटवर: डब्लूडब्ल्यूडब्ल्यू.एक्सेलमोटो.कॉम

या पारंपरिक इलेक्ट्रिक स्कूटर्स नाहीत या ईबाईक आहेत, ज्या पेडल असिस्ट प्रणालीसह येतात, ज्यामुळे वापरकर्ते ॲक्टिव राहू शकतात आणि त्यांचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी होतो. या सेगमेंटमधील किमीप्रती खर्चातही हे ईबाईक सर्वात किफायतशीर आहेत. यांचे डिझाइन पेटंटेड असून मोटरसायकलसारख्या स्टायलिश डिझाइनसह सायकलसारखी चपळता आणि सोय मिळते. उच्च दर्जाच्या पार्ट्र्ससह तयार केलेली ही ईबाईक संपूर्ण भारतात तयार केली जाते आणि फक्त कार्यक्षमतेत नव्हे, तर डिझाईन व फिट-फिनिशमध्येही वर्ल्ड-क्लास आहे. हे परफॉर्मन्स, स्टाईल आणि टिकाऊपणा यांचे परिपूर्ण मिश्रण आहे.

संस्थापक आणि सीईओ अक्षै वर्डेम्हणाले, एक्सेलमोटो ही केवळ ईव्ही नाही ही एक चळवळ आहे. हाय-डिझाईन, स्मार्ट, मोबाईलइतकी अंतर्ज्ञानी आणि परवडणारी ईबाईक तयार करणे हेच आमचे ध्येय आहे. भारतासाठी तयार केलेली, भारतीय आयकॉन्सने समर्थित अशी ही ईबाईक फ्युचर मूव्हमेंटचे प्रतीक आहे.

# अदानी ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी यांच्या ६३व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**गोंदिया, ३० जून :** २४ जून रोजी अदानी समूहाचे चेअरमन गौतम अदानी यांचा ६३वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने, अदानी ग्रुपची सामाजिक कल्याण आणि विकास शाखा असलेल्या अदानी फाउंडेशनने देशभरातील २१ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील २०६ शहरांमध्ये भव्य रक्तदान मोहीम आयोजित केली. ही मोहीम मागील वर्षीच्या २५,२८२ युनिट्सच्या विक्रमावर मात करत विक्रमी ठरली आहे.





अदानी हेल्थकेअर टीमच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या या मोहिमेत अदानी समूहाचे कर्मचारी आणि भागीदार यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. या मोहिमेत २७,६६१ युनिट्स (सुमारे ११,१०० लिटर) रक्त संकलित झाले असून, यामुळे ८३,००० हून अधिक रुग्णांना लाभ होणार आहे. या संकलित रक्तामधून पूर्ण रक्त, पीसीव्ही, प्लेटलेट कॉन्सेंट्रेट्स, प्लाझ्मा, एफएफपी, क्रायोप्रेसिपिटेट आणि अल्ब्युमिन असे विविध रक्तघटक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, जे रुग्णांना जीवनदायी उपचारासाठी उपयुक्त ठरतील.

अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी म्हणाल्या, या सेवाभावी उपक्रमात पुढे येऊन सहभाग नोंदविलेल्या आपल्या अदाणी परिवाराचे मी मनःपूर्वक आभार मानते. आपल्या उदारतेमुळे असंख्य जिवांचे आयुष्य उजळणार आहे.

ही मोहीम रेड क्रॉस ब्लड बँक आणि शासकीय रुग्णालयांच्या सहकार्याने राबवली गेली. या मोहिमेला अदानी समूहातील ३,००० हून अधिक डॉक्टर, पॅरामेडिक्स, डेटा ऑपरेटर्स आणि प्रशासनिक कर्मचारी यांनी पाठिंबा दिला.

पहिल्यांदाच हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला, जिथे कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनल पोर्ट, कोलंबो आणि दार-एस-सलाम पोर्ट, टांझानिया येथेही रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये १०० हून अधिक रक्तदात्यांनी या पुण्यकार्यामध्ये सहभाग घेतला.

हा उपक्रम २०११ सालापासून दरवर्षी श्री गौतम अदाणी यांच्या वाढदिवसानिमित्त एक परंपरा म्हणून राबवला जात आहे. सेवा ही साधना आहे या श्री आदाणी यांच्या मार्गदर्शक तत्त्वज्ञानाला अदानी फाउंडेशनच्या समाजाभिमुख उपक्रमांद्वारे आदरांजली अर्पण करण्यात येते. अदानी समूहाची ही सामाजिक संस्था समुदायांच्या सर्वसमावेशक, न्याय्य आणि शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहे.

# ओप्पो लॉन्च करत आहे के१३एक्स ५जी अत्यंत मजबूत आणि टिकाऊ स्मार्टफोन

**अमरावती, ३० जून :** ओप्पो इंडिया ने ओप्पो के१३एक्स ५जी फोन दाखल केला आहे, हा या सेगमेन्टमधील सगळ्यात दणकट स्मार्टफोन आहे. टिकाऊपणा आणि तडजोड न करता सर्व फंक्शन्सची अपेक्षा ठेवणारे तरुण विद्यार्थी आणि नवे नवे व्यावसायिका यांच्यासाठी प्राधान्याने हा फोन बनवण्यात आला आहे. लवचिकता असलेल्या के१३एक्स ५जी मध्ये एसजीएस गोल्ड ड्रॉप सर्टिफिकेशन आणि एमआयएल-एसटीडी ८१०एच मिलिटरी-ग्रेड स्टँडर्ड आहेत. त्यामुळे या श्रेणीतील हा सगळ्यात दणकट फोन बनला आहे. एरोस्पेस-ग्रेडच्या एएम०४ ॲल्युमिनियम मिश्रधातूमधून याची ३६०ओ डॅमेज प्रूफ आर्मर बॉडी बनवण्यात अली आहे. क्रिस्टल शील्ड ग्लासने त्याला मजबुती दिली आहे आणि समुद्री स्पन्जने प्रेरित बायोमिमेटिक स्पॉन्ज शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम मुळे हा फोन आणखी प्रगत बनला आहे. स्टाइल किंवा उपयोगिता यांच्याशी तडजोड न करता, ओप्पो के१३एक्स ५जी ने आयपी६५ वॉटर आणि डस्टरेझिस्टन्ससह टिकाऊपणा आणि बिजोड मजबुतीच्या बाबतीत एक नवीन मापदंड स्थापित केला आहे.



ओप्पो के१३एक्स ५जी च्या ४जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत ११,९९९ रु., ६जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १२,९९९ रु. आणि ८जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १४,९९९ रु. असून २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून हा फोन ओप्पो ई-स्टोअर मध्ये आणि फ्लिपकार्ट विक्रीसाठी उपलब्ध होईल. यामध्ये मिडनाइट व्हायोलेट आणि सनसेट पीच हे दोन रंगांचे पर्याय आहेत. हा फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सेलच्या दिवशी काही निवडक बँक ऑफर्सवर ४जीबी आणि ६जीबी च्या व्हेरियन्टवर १००० रु. आणि ८जीबी च्या व्हेरियन्टवर २००० रु. इन्स्टंट डिस्काउंट मिळेल किंवा १००० रु. चा एक्स्चेंज बोनस आणि अतिरिक्त ३ महिन्यांपर्यंत नो कॉस्ट ईएमआय पर्याय मिळेल. ज्यामुळे या तिन्ही व्हेरियन्टची प्रभावी किंमत अनुक्रमे १०,९९९, ११,९९९ आणि १२,९९९ रु. होईल.

ओप्पो इंडिया चे हेड ऑफ प्रॉडक्ट कम्युनिकेशन सॅव्हीओ डिसूझा म्हणाले, ओप्पो के१३एक्स लॉन्च करून आम्ही असामान्य टिकाऊपणा, फ्लूईड परफॉर्मन्स आणि उत्कृष्ट पॉवर कार्यक्षमता या जेन झीच्या वास्तविक गरजा, चांगल्या किंमतीत पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेस पुष्टी देत आहोत. के१३एक्स मध्ये आधुनिक बायोमिमेटिक शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम, या श्रेणीतील आघाडीचे बॅटरी ऑप्टिमायझेशन आणि ५जी तत्परता आहे. या स्मार्टफोनमधून तडजोड न करता, एंट्री-स्तराच्या स्मार्टफोनमध्ये काय काय शक्य असू शकते याची व्याख्या करण्याचे ओप्पो चे व्हिजन झळकते.

स्मृती रविचंद्रन, उपाध्यक्ष- मोबाइल्स, फ्लिपकार्ट म्हणाल्या, फ्लिपकार्टमध्ये आम्हाला फक्त दमदार परफॉर्मन्स देणाऱ्या नाही, तर दैनंदिन जीवनाच्या मागण्या पुरवणाऱ्या स्मार्टफोन्सची वाढती गरज स्पष्ट दिसत आहे. ओप्पो के१३एक्स ५जी च्या लॉन्चमुळे ग्राहकांची कोणतीही तडजोड न करता टिकाऊपणाची वाढती मागणी पूर्ण होणार आहे. मिलिटरी ग्रेडचा दणकटपणा, नावीन्यपूर्ण शॉक अब्जॉर्प्शन प्रणाली आणि विकसित फीचर्स असलेला के१३एक्स हा मूल्य, स्टाइल आणि लवचिकतेचा शोध घेणाऱ्या तरुणांसाठी एक उत्तम पर्याय आहे. हा दमदार आणि टिकाऊ फोन देशभरातील लक्षावधी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ओप्पो सोबत पुन्हा एकदा भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे.

# तो युग म्हणून खूप गंभीर किंवा चिंतेत असला तरी पडद्यावर छानच दिसतो : आशी सिंह

**मुंबई, ३० जून :** अनेक वर्षे ज्याची तुम्ही प्रशंसा केली, त्याच्या सोबत काम करण्याचे भाग्य सगळ्यांना मिळत नाही. आशी सिंहला ते भाग्य लाभले आहे. सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह आपला सह-कलाकार शब्बीर अहलूवालियाची आधीपासून चाहती होती. त्यामुळे त्याच्याबरोबर काम करण्याची संधी तिला स्वप्नपूर्तीचा आनंद देत आहे.



प्रेम आणि नात्यांच्या विविध पैलूंचा शोध घेणाऱ्या या मालिकेत शब्बीर काहीशा बेपर्वा आणि अंतर्मुख युग सिन्हाच्या रूपात दिसत आहे, तर आशी सिंह कैरीची भूमिका करत आहे, जी आनंदी स्वभावाची तरुणी आहे, आणि यशस्वी वकील होण्याचे तिचे स्वप्न आहे. युग आणि कैरी यांचे स्वभाव एकमेकांपेक्षा अगदी विरुद्ध असल्यामुळे त्यांच्यात उडणारे गंमतीशीर खटके बघायला मजा येते. पडद्याच्या मागे मात्र आशी सिंह शब्बीर अहलूवालिया जेव्हा युगच्या गंभीर, चिंताक्रांत आणि तुटक भूमिकेत हरवलेला असतो, तेव्हा त्याचे फोटो टिपण्याचा प्रयत्न करत असते. इन्स्टाग्रामवर ती कबूल करते: युग-मोड मध्ये असलेल्या शब्बीरचे सहज फोटो घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. अर्थात, तो केव्हाही नुकताच शूटिंग करून आल्यासारखाच दिसतो. सहजपणे सुंदर! कसे काय जमते हे त्याला?

तो एखाद्या भावनिक दृश्याची तयारी करत असो, पटकथा वाचत असो किंवा दोन टेक्सच्या मध्ये क्रू सदस्यांशी बोलत असो, शब्बीरच्या सहज मोहकतेमुळे त्याचे गंभीर युगच्या रूपातले फोटो काढण्याचे आशीचे प्रयत्न नेहमीच फसतात.

सेटवरच्या आपल्या या छंदाबद्दल आशी सिंह सांगते, शब्बीरला युगच्या भूमिकेत वावरताना बघणे हा माझा सेटवरचा एक छंदच आहे. या व्यक्तिरेखेत त्याने इतकी सहज नैसर्गिक सखोलता आणली आहे! खूप सहज आणि तरीही अत्यंत प्रभावी! तो युग म्हणून खूप गंभीर किंवा चिंतेत असला तरी पडद्यावर छानच दिसतो. तो नेहमीच पिक्चर परफेक्ट दिसतो. त्याला काम करताना जवळून बघणे फारच प्रेरणादायक आहे. माझ्यासाठी तर तो रोजचा एक छोटासा मास्टरक्लासच असतो.

# कलाकारांनी त्यांच्या मालिकांमधील सीनबाबत सांगितले, जे व्हायरल जोक बनले!

**मुंबई, ३० जून :** यंदा इंटरनॅशनल जोक्स डे निमित्त हास्याचा आनंद घेण्यासोबत प्रख्यात संवादांना क्षणांमध्ये बदललेल्या सीन्सना प्रशंसित करा, जेथे हे सीन पडद्यावर सादर होण्यासोबत दैनंदिन संवाद आणि व्हायरल मीम संस्कृतीचा भाग बनले. एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार आसिफ शेख (विभुती नारायण मिश्रा, 'भाबीजी घर पर है') आणि योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') त्यांच्या मालिकांमधील विनोदी संस्मरणीय सीनबाबत सांगत आहेत, जे अनपेक्षितपणे व्हायरल सेन्सेशन्स बनले. योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, ''काही विशिष्ट संवाद लोकप्रिय ठरण्यासोबत प्रेक्षकांच्या बोलीभाषेचा भाग बनतात, हे पाहून अविश्वसनीय वाटत आहे. सर्वात व्हायरल सीन म्हणजे हप्पू वैतागून म्हणतो, 'अरे दादा, थंड रख!'. मी ज्या पद्धतीने हा संवाद म्हणतो त्यामध्ये हास्य व व्यंगाचे परिपूर्ण मिश्रण आहे. मी अजूनही प्रेक्षकांना मला पाहिल्यानंतर 'अरे दादा' म्हणून हाक मारताना ऐकतो. चाहत्यांचा आणखी आवडता संवाद म्हणजे हप्पू अभिमानाने म्हणतो, 'नाम है दरोगा हप्पू सिंग!' आणि त्यासोबत केस उडवतो. तो सीन त्वरित मीम टेम्पलेट बनला आणि प्रेक्षकांनी त्यामध्ये ट्विस्टची भर करत नवीन रूपात सादर करण्यास सुरूवात केली. अर्थातच, मी आयकॉनिक संवाद विसरू शकत नाही 'मैं ९ बच्चों का बाप है!' हा संवाद कोणीही कधीच विसरणार नाही. हा चालता-फिरता बोलला जाणारा विनोद बनला आहे, जो प्रेक्षकांना खूप आवडतो. यामधून उत्तम कॉमेडी पडद्यामागे देखील खूप प्रसिद्ध होते आणि वास्तविक जीवनात विनोदाचा भाग बनते, हे दिसून येते.''

आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा आठवणींना उजाळा देत म्हणाले, ''एक सीन खूप व्हायरल झाला, तो म्हणजे विभुती अंगूरी भाबीला नखरे करत म्हणतो 'आय लाइक इट व्हेन यू कॉल मी नल्ले!'. हा संवाद इतका लोकप्रिय झाला की प्रेक्षक मला अजूनही त्यावर बनवलेले मीम व रील्स पाठवतात. आणखी एक प्रसिद्ध संवाद म्हणजे 'हॅलो भाबीजी?', जो मोहकता व खोडकरपणाच्या परिपूर्ण एकत्रिकरणासह सादर करण्यात आला आहे. चाहत्यांमध्ये हा संवाद लगेच लोकप्रिय ठरला आणि आता सर्व मीम पेजेस व सोशल मीडियावर धूमाकूळ निर्माण करत आहे. आणखी एक उत्तम संवाद आहे 'आय ॲम सारी', विभुतीची इंग्रजी भाषेमधील मनोरंजन माफी मागण्याची पद्धत. याबाबत मीम करण्यापर्यंत हा संवाद पंचलाइन बनला आहे. सहजपणे संवाद बोलण्याची पद्धत आणि विनोदी शैलीने या संवादाला संस्मरणीय केले.

## आज का अंदाज

मंगळवार १ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ४९९ | १५९ | १५० | २७० | २३८ | ११२ | १७७ | २६० |
| ३९० | २४९ | २६८ | ४६९ | ५८० | २२० | ४४७ | ४५९ |
| २०० | ३५७ | ३३० | ३७९ | ३३७ | ३३८ | ३६६ | ३५० |
| २० | ५० | ६४ | ९४ | ३२ | ४२ | ५१ | ८१ |
| २१ | ५१ | ६३ | ९३ | ३६ | ४६ | ५७ | ८७ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३० | ४० | ५९ | ८९ |

१ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# आम्हा तिघांना फन मस्केटियर्स म्हणतात

**मुंबई, ३० जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका त्यातील सुरस कथांमुळे प्रेक्षकांना आवडते आहे. सुजाणता आणि बुद्धीचातुर्य हा मालिकेचा मूलभूत गाभा असला, तरी ही मालिका तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज), लक्ष्मणाप्पा (कुणाल करण कपूर) आणि कोतवाल (निखिल आर्या) या त्रिकुटासह प्रेक्षकांना एका रोमांचक शोध प्रवासावर घेऊन जाते. पारंपरिक पठडीचे बुद्धीचातुर्य आणि तर्कनिष्ठा वापरुन हे तिघे खूप गुंतागुंतीची प्रकरणे सोडवताना दिसतात.

पण, जर कॅमेऱ्याच्या मागे पाहिलेत तर एक अगदी वेगळेच दृश्य तुम्हाला दिसेल. इथे न संपणारा हशा असतो, सतत विनोद आणि कोट्या होत असतात. हे त्रिकूट म्हणजे सेटवरील मस्तीचे केंद्र बनले आहे. ते या शो चे फन मस्केटियर्स आहेत, जे पडद्यावरील हेरगिरीचे गांभीर्य पडद्याच्या मागील मस्तीने संतुलित करतात. एकमेकांच्या खोड्या काढणे, मीम्स शेअर करणे किंवा स्वतःच्याच चुकांवर हसणे या त्यांच्या मस्तीमुळे शूटिंगचे वातावरण मात्र हलके-फुलके आणि प्रसन्न राहते.

पडद्यामागच्या फन मस्केटियर्सच्या नात्याविषयी बोलताना कृष्ण भारद्वाज म्हणाला, कुणाल आणि मी सेटवर खूप धमाल करतो. दोन खोडकर मुलांचा जसा उच्छाद असतो, तसाच आमचा या सेटवर उच्छाद असतो. निखिल आर्या आमचे आवडते टार्गेट आहे. आमच्या हसण्या-खिदळण्यामुळे तो नेहमी गोंधळात पडलेला असतो, पण आमची मस्ती तो मनावर घेत नाही. जेव्हा आम्ही तिघे एकत्र येतो, तेव्हा आमची पडद्यामागची केमिस्ट्री इतकी धमाल आणि संसर्गजन्य असते की आम्हाला मिळालेले या शो चे फन मस्केटियर्स हे नाव आम्हाला अगदी साजेसेच आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला अडकलेले पैसे मिळतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** तुमच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. तणाव कमी करण्यासाठी आणि स्वत:ला फ्रेश ठेवण्यासाठी काळजी घ्या. कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात कराल.

**मिथुन :** आज कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.

**कर्क :** तुमच्या बॉसशी बोलताना किंवा महत्त्वाच्या चर्चा करताना शहाणपणाने आणि विचारपूर्वक बोला. तुमच्या शब्दांनी परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह :** कुटुंबासोबत विशेषत: आई-वडिलांसोबत वेळ घालवाल. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतील. आर्थिक बाबतीत चढ-उतार दिसू शकतात. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी हा एक उत्तम दिवस आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** स्वत:च्या आरोग्याकडे आणि मानसिक स्थितीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आज तुम्हाला कामात भरपूर उत्साह जाणवेल. तुम्ही तुमच्या जबाबदाजया अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**वृश्चिक :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.


**धनु :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**मकर :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. यामुळे नात्यात गोडवा येईल. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती थोडी गडबडू शकते. त्यामुळे कोणत्याही मोठ्या निर्णयांमध्ये सावधगिरी बाळगा. सतत काम करण्याऐवजी छोटे ब्रेक घ्या. यामुळे तुमची कार्यक्षमता टिकून राहील.

**मीन :** आपल्या कामाचे संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी विचारपूर्वक आणि रणनीती आखा. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. आर्थिक स्थिती चांगली आणि मजबूत राहील.

# शब्दकोडे क्रमांक २१५१




**आडवे शब्द :-**
१) ओळखीचा
३) राजाचे निवासस्थान
७) रक्षण करणारा
१०) काढलेली सुट्टी
११) नष्ट झालेले मेलेले
१३) प्रतिदिनी
१६) बस्तान
१७) शरीरावरील माराची खूण
१८) उपवन
१९) काटकसर
२२) टरफल
२३) मनातील विचार मन
२४) फांदी तुटतानाचा आवाज
२६) मासिक भत्ता
२८) स्थिती, अवस्था
२९) कौसल्यापुत्र
३०) गोमाता
३१) शर्करा
३३) जय
३४) प्रजा, कुळावरील सरकारी कर
३७) फिकीर, गुणांची पारख
३९) मनाचा झालेला ग्रह
४०) एक शिकारी पक्षी
४२) सिंहासन
४३) *** राम--गोसावी, भटक्या मनुष्य
४४) अर्जुनाचा रथ चालविणारा श्रीकृष्ण
४६) आजच्या आधीचा दिवस
४७) जेवणातील रसरशीत तोंडी लावणे
४९) पती, यजमान
५०) मला
५१) वेळेचा कमीतकमी भाग
५२) नगरवासी, एक आडनाव
५५) मल्ल
५७) अनाथ
५८) दोन डोंगरामधील अरुंद रस्ता
५९) कविता, गीत
६०) बारा महिन्याचा काळ
६१) लटलटणे, धैर्य सुटणे
६२) तृण, चारा
६४) उत्तराधिकारी
६६) मत देण्याची क्रिया
६८) मुक्तता
६९) बारीकसारीक
७०) जाडसर पीठ

**उभे शब्द :-**
१) कमळ
२) पुष्कळ
३) भूपती
४) नंतर
५) वर्ष
६) वाईट सवय, खोड
७) मनावर ठेवला आवर
८) निमग्न
९) आपल्या कठीण प्रसंगास कोण मदत करतो ? रामदासस्वामीची एक विचारणा
१०) चांदी
१२) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) पत्थर
१४) रोख रक्कम
१५) एक औषधी हळद प्रकार
१७) सिंह
१८) वाकलेला
२०) लक्ष्मी
२१) पोळ्या भाजण्याचे पात्र
२५) च्या साठी
२७) पृथ्वी
३२) वाळा
३३) वाटप
३५) योग्य, उचित
३६) दिवस
३७) मणका
३८) अर्धा शेर
४१) जोडीदार
४४) बाजीप्रभूंच्या रक्ताने पवित्र झालेली जागा
४५) दर्या, अर्णव
४६) वेळेचा अपव्यय
४७) रात्री चमकणारा किडा
४८) रंग
५०) अधिक महिना
५१) नष्ट होणारे
५३) ढगांचा आवाज
५४) भांडण, तंटा
५६) लोणी
६३) डोळ्यातील बुब्बुळावर येणारा कवडा
६४) चणचण, उणीव
६५) लोखंड
६६) अंत:करण
६७) दरवाजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सोलर प्लांटसाठी बनावट ठराव, कागदपत्रे

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३० :

मोताळा येथील सोलर प्लांट उभारणीसाठी संगनमताने बनावट ना हरकत प्रमाणपत्र, ठरावचा वापर करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे नगरपंचायतला सुमारे दहा लाखांचे महसूल (शुल्क) बुडाल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले.

या प्रकरणी नगरपंचायत च्या अध्यक्ष, कर्मचारी, सोलर कंपनीचे व्यवस्थापक व कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामुळे राजकीय वर्तुळ, औद्योगिक क्षेत्रासह मोताळा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

काँग्रेस नगराध्यक्ष, स्वीकृत नगरसेवक, नगर पंचायत कंत्राटी कर्मचारी आणि कंपनीचे अधिकारी कर्मचाऱ्यासह एकूण पाच जणांवर शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मोताळा नगर पंचायत अध्यक्षा माधुरी देशमुख (रा. मोताळा, जि. बुलढाणा) अमोल शिवाजी देशमुख (स्वीकृत नगरसेवक मोताळा नगर पंचायत, रा. मोताळा, जि. बुलढाणा), सन पॉवर इंडीया प्रायव्हेट लिमिटेड, कॅम्प



## नगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांवर गुन्हे

मोताळा) चे व्यवस्थापक (व्यवसाय वृद्धी) महेश सहाणे (रा. सावरगाव पाठ, ता. अकोले, जि. अहमदनगर), शांताराम सुपडा लोखंडे (४८, सन पॉवर इंडीया कॅम्प मोताळा, रा. रुईखेडा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) नगराध्यक्ष माधुरी पुरुषोत्तम देशमुख (५२, रा. मोताळा, जि. बुलढाणा), सुनिल ओंकार मिरकुटे (५४, आवक-जावक लिपीक मोताळा नगरपंचायत) अशी आरोपीची नावे आहेत. या आरोपीनी आर्थीक लाभापोटी संगनमत करून मोताळा नगर पंचायत कार्यालयाचे खोटे नाहरकत प्रमाणपत्र व ठराव तयार केले. मागील ११ ते १८ एप्रिल २०२३ या कालावधीत त्यांनी सभा न घेता ही बनावट कागदपत्रे तयार केली असे प्राथमिक चौकशीत आढळून आले. यामुळे नगर पंचायत कर, विक्रास शुल्क, बांधकाम शुल्क वृक्षतोड परवानगी शुल्क अस अंदाजे दहा लाख रुपयेपेक्षा जास्त शुल्क बुडवुन शासनाची फसवणूक केल्याचे चौकशी मध्य निष्पन्न झाले. नगर पंचायतचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी बोराखेडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी पाच आरोपी विरुध्द गुन्हे दखल करण्यात आले.

मोताळ्यात कंपनी कडून महापारेषण सोबत करार करून विद्युत विक्रीसाठी कमर्शियल सोलर प्लांट उभारण्यासाठी मोताळा नगर पंचायत मुख्याधिकाऱ्याची बोगस स्वाक्षरी,शिक्के मारून संगतमताने बनावट ना हरकत प्रमाणपत्र तयार करण्याचा पराक्रम या पाच आरोपीनी केल्याचे तक्रारीत नमुद आहे. आरोपींमध्ये नगराध्यक्ष माधुरी देशमुख यांनी ११ एप्रिल २०२३ रोजी ला घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेचा फायदा घेत नगरसेवकांना न सांगता वेळेवरच्या विषय भासवून कंपनीला मोताळा नगर पंचायतची नाहरकत बाबत ठराव दिला आहे. म्हणूनच त्यांना देखील आरोपी करण्यात आले आहे.

बोराखेडी पोलीस ठाण्यात पाच आरोपींवर नगर पंचायतची फसवणूक व बनावट कागदपत्रे तयार केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.आरोपीमध्ये मोताळा नगर पंचायत नगराध्यक्ष माधुरी देशमुख, स्वीकृत नगर सेवक अमोल देशमुख यांच्यासह कंत्राटी कर्मचारी व कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या सोलर घोटाळ्यात पुढील चौकशीत आरोपीची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सोलर घोटाळ्यात नगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांवर गुन्हे दाखल झाल्यामुळे खळबळ उडाली.

## एक पेड माँ के नाम मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी, कुऱ्हा, दि. ३० :

कला व विज्ञान महाविद्यालयातील रासेयो विभागाद्वारे एक पेड माँ के नाम अभियान राबवण्यात आले. १० कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाची पूर्तता व पर्यावरण संतुलनाकरिता वृक्षांप्रती कृतज्ञता जाणीव ठेवून वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. ५ जून ते ३० जून या कालावधीत राज्यात एक पेड माँ के नाम २.० ही मोहीम राबवण्याचे आवाहन राज्य शासनाने केले. त्यालाच अनुसरून महाविद्यालयात ५१ वृक्षांचे रोपण करण्याचा संकल्प ठरवण्यात आला. प्राचार्य, डॉ. सुनील आखरे यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून वृक्षारोपणाच्या उपक्रमाला प्रत्यक्ष सुरवात झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. नामदेव ढाले जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा अध्यक्ष इतिहास अभ्यास मंडळ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे होते. कडूनिंब, कडूबदाम, जांभूळ, वड, पिंपळ, कवठ, शिसम, सीताफळ इ. प्रकारच्या ५१ रोपांची लागवड करण्यात आली. एक पेड माँ के नाम या मोहिमेअंतर्गत राज्यात १० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प आहे. त्यानुसार ५ जून ते ३० जून या कालावधीत राज्यात १० कोटी वृक्षलागवड करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अजय अभ्यंकर, प्रा. डॉ. स्मिता जाधव, प्रा. डॉ. किर्ती गांधी, प्रा. हर्षा कांबे, शिक्षकेतर कर्मचारी रमा आत्राम, दिलीप पाटील रासेयोचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# बँकेच्या उच्च अधिकाऱ्याचा अश्लील व्हिडिओ तयार करुन उकळली खंडणी



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :

मोबाइल ॲपद्वारे ओळख वाढवून बँकेच्या उच्च अधिकाऱ्याला अश्लील चॅटिंगच्या माध्यमातून सापळ्यात अडकवून, त्यांचा अश्लील व्हिडिओ तयार करून ७९ हजार ९०० रुपयाची ऑनलाइन खंडणी उकळणाऱ्या टोळीतील दोन आरोपींना खदान पोलिसांनी अटक केली आहे. तर अन्य तीन फरार आरोपींचा शोध पोलिस घेत आहेत.

या प्रकरणात पीडित ४१ वर्षीय बँक कर्मचाऱ्याने २८ जून रोजी खदान पोलिस ठाण्यात दिलेल्या फियार्दीत म्हटले की, एका ऑनलाइन "गे-डेटिंग ॲपवर अनोळखी व्यक्तींसोबत ११ एप्रिल पर्यंत चॅटिंग केले. या दरम्यान त्याला हिंगणा फाटा येथे भेटण्यास बोलावले. ठरल्याप्रमाणे तो सायंकाळी ७ वाजता तेथे पोहचला असता, एका तरुणाने त्याला मोटारसायकलवर बसवून नदीकाठी नेले. तेथे आधीच उपस्थित तीन तरुणांनी त्याला नग्न करून प्लास्टिकच्या पाइपने मारहाण केली व त्याच्यासोबत अनैसर्गिक संबंध ठेवून अश्लील व्हिडिओ तयार केला.

यानंतर व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी ७९ हजार ९०० रुपयांची खंडणी वसूल केली. २३ जून रोजी आरोपींनी पुन्हा फोन करून रक्कम मागितली आणि प्रकरण मिटवण्याची बतावणी केली. सततच्या धमक्यांनी त्रस्त होऊन अखेर पीडित बँक मॅनेजरने २८ जून रोजी पोलिसांकडे धाव घेतली. त्याच्या फियार्दीवरून खदान पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. तपासादरम्यान पोलिस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी मनीष मिलींद नाईक (२२, रा. मलकापूर ,अकोला) आणि मयुर मधुकर बागडे (वय २५, रा. सरकारी गोदाममागे, खदान, अकोला) यांना अटक केली. आरोपी मनीष नाईककडून गुन्ह्यात वापरलेला ५ हजार किमतीचा मोबाइल जप्त करण्यात आला असून, अन्य तीन आरोपींचा शोध सुरू आहे.

शहरालगतच्या मोर्णा नदीकाठी ठरल्याप्रमाणे त्या ठिकाणी या बँकेच्या अधिकाऱ्याला नेऊन सेक्स उत्तेजित करणारे इंजेक्शनही देण्यात आले. तर काही इंजेक्शन आरोपी दोघा तरुणांनीही स्वतःला लावून घेतले. यावेळी या दोन आरोपींनी आणखी तिघा साथीदारांना त्या ठिकाणी बोलावून घेतले. बँकेच्या त्या अधिकाऱ्यांसोबत या दोघांनी अनैसर्गिक कृत्य करतानाचे व्हिडिओ चोरून काढले. हीच चूक त्या बँकेच्या उच्च अधिकाऱ्याला घातक ठरली. त्या दोन्ही आरोपींनी पुढे तो व्हिडिओ त्या बँक अधिकाऱ्याला पाठवला. शिवाय व्हायरल करण्याची धमकीही दिली. त्यामुळे बँक अधिकारी घाबरून गेला होता. शेवटी त्याने पोलिसांत धाव घेतली.

# पाऊस पडताच लोक वळले रोपवाटिकेकडे

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :

पावसाच्या दमदार आगमनानंतर परसबागेतील फळ, फूल झाडांचे रोप विक्रेते परिसरात दाखल झाले आहेत. शेकडो प्रकारच्या फळ, फुलांचे रोप उपलब्ध झाले असून, खरेदीसाठी ग्राहकाची पावले नर्सरी व रस्त्यांच्या कडेला दुकाने थाटलेल्या रोप विक्रेत्यांकडे वळली आहेत. यंदा गतवर्षीच्या तुलनेत रोपांची उपलब्धता जास्त प्रमाणात आहे. दरही गतवर्षांच्या तुलनेत स्थिर असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

दरवर्षी पावसाळा आला की शहरातील काही प्रमुख रस्त्यांवर रोप विक्रीची दुकाने थाटली जातात. यंदाही ही दुकाने थाटण्यात आली असून, रोपांची विक्री वाढल्याचे चित्र आहे. दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाते. त्यासोबतच घरोघरी देखील वृक्षांची लागवड करून त्यांची जपणूक केली जाते. अनेकांना आपली परसबाग फुलवण्याचा छंद असतो. आपल्या परसबागेत इतरांपेक्षा अधिक व आकर्षक वृक्षराई असावी.

# चिखलदऱ्यातील पंचबोल पॉइंटवर कार पडली दरीत

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :

चिखलदरा येथे सध्या पर्यटकांची गर्दी वाढली आहे. दरम्यान शनिवार व रविवारी तर चिखलदऱ्यात पर्यटकांची मोठी संख्या राहते. दरम्यान तेथील पंचबोल पॉइंटच्या पार्किंगमध्ये उभी केलेली एक कार वाहनातील व्यक्ती खाली उतरल्यानंतर थेट दरीत जाऊन कोसळली. या कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र कारमध्ये कोणीही नसल्याने इतर हानी झाली नाही. ही घटना रविवारी दुपारी ४ वाजता घडली आहे.

अतुल श्रीकृष्ण ठाकरे (४८, रा. शिराळा पुसदा ह. मु. अमरावती) यांची ती स्विफ्ट कार आहे. अतुल ठाकरे त्यांच्या काही मित्रांसह रविवारी कामानिमित्त चिखलदरा येथे गेले होते. काम आटोपल्यावर ते पंचबोल पॉइंटवर गेले. रविवारी पर्यटकांची गर्दी व अरुंद रस्ता मुख्य पॉइंटपासून वाहने एक किमी अलीकडेच उभी करावी लागतात. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस वाहनांना गर्दीच्या वेळी समोर जाऊ देत नाहीत. दरम्यान ठाकरे यांनी पार्किंगमध्ये कार उभी करून पायी चालत समोर गेले. त्यानंतर काही वेळाने कार थेट बाजूला असलेल्या दरीत जाऊन कोसळली. या पार्किंगस्थळी काहीसा उतार असल्यामुळे कार ४० ते ५० फुट खोल पडल्याचे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. कारला हँडब्रेक लावला होता. तरीसुद्धा ही घटना घडल्याची माहिती काही प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. या घटनेची माहिती गस्तीवर असलेले चिखलदरा ठाण्याचे एपीआय प्रवीण पाटील यांना मिळाली. त्यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली होती. रविवारी सायंकाळी साडेसात वाजेपर्यंतही कार दरीतच होती.

# कत्तलीसाठी बांधलेल्या दोन बैलांची सुटका



■ महासागर प्रतिनिधी, बार्शीटाकळी, दि. ३० :

जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशाने राबवण्यात येणाऱ्या "ऑपरेशन प्रहार" मोहिमेंतर्गत बाशीटाकळी पोलिसांनी एक महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. गोपनीय माहितीवरून कारवाई करताना कत्तलीसाठी निर्दयतेने बांधून ठेवलेली दोन गोवंश जनावरे व सुमारे १० किलो मास पोलिसांनी जप्त केले. ही धडक कारवाई करून गोवंशांना जीवनदान देण्यात पोलिसांना यश आले आहे.

२९ जून २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास बार्शीटाकळी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, कुरेशी पुरा परिसरातील शेख आरिफ अब्दुल अजिज यांच्या घराच्या ओसरीवर दोन गोवंश जातीची जनावरे कत्तलीसाठी निर्दयतेने बांधून ठेवली आहेत. बार्शीटाकळी पोलिस स्टेशनचे कर्मचारी पंचांसह घटनास्थळी दाखल झाले. तेथे पाहणी केली असता, दोन गोवंश जातीचे बैल आखूड दोऱ्यांनी बांधलेले असून, त्यांना कत्तलीसाठी ठेवले होते. बैल पुढील देखरेख व संगोपनासाठी आदर्श गोसेवा संस्थान, म्हैसपूर येथे हलवण्यात येणार असून, जप्त करण्यात आलेले मास वैज्ञानिक तपासणीसाठी पाठवले आहे. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ५अ, ५ब, ९, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणारा कायदा अंतर्गत कलम ११ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३२५ अंतर्गत गुन्हा दाखल केला.


**Change Of Name**

MY OLD PASSPORT NO. **B129833**. MY OLD NAME WAS **SHEIKH RIYAJ MOHAMMED SHEIKH NIYAZ**. NOW MY NEW NAME IS **RIYAZ NIYAZ SHEIKH.**
**ADD** : PLOT NO. 60, OPP. SAYYAD GUEST HOUSE THAKUR PLOT TAJABAD, NAGPUR (MAH.) 440024.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ARIF**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ARIF SHEIKH.**
PASSPORT NO. **K6983061**.
**ADD :** M K MAJESTIC APT FLAT NO 202 PLOT NO 37 PUSHKAR CO OP S KATOL ROAD NAGPUR - 440013.

MY OLD NAME WAS **SHAZIA ANJUM KHAN**. NOW MY NEW NAME IS **SHAZIA ANJUM MOHAMMAD ARIF SHEIKH.**
PASSPORT NO. **K1315642**.
**ADD :** M K MAJESTIC APT FLAT NO 202 PLOT NO 37 PUSHKAR CO OP S KATOL ROAD NAGPUR - 440013.

MY OLD NAME WAS **SHAIFUDDIN SYED FAKHRODDIN**. NOW MY NEW NAME IS **SAIFUDDIN FAKHRUDDIN SYED.**
**ADD** : NEAR DR. REHAN HOUSE, DUDHE LAYOUT PUSAD YAVATMAL - 445204.

MY OLD NAME WAS **AYFAZ MUSTAK SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **AAYFAZ MUSTAK SHEKH.**
**ADD** : KHATIK PURA, PARDI, NAGPUR 440035.


# निराधार महिलेला मिळाला श्रावण बाळ योजनेचा लाभ

■ महासागर प्रतिनिधी, खामगाव, दि. ३० :

तालुक्यातील रोहना येथील एका ७५ वर्षीय निराधार महिलेला श्रावण बाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी पुरेशी कागदपत्रे नसल्याने ती शासकीय उंबरठे झिजवत होती. मात्र खामगावचे तहसीलदार सुनील पाटील यांनी पुढाकार घेतल्याने या वृद्ध महिलेला विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत श्रावण बाळ योजनेचा लाभ मिळवून दिला. शासनाच्या महाराजस्व अभियानाचे हे फलित असून गत आठवड्यात तहसील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात या निराधार महिलेला दरमहा निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.



तालुक्यातील रोहना येथील श्रीमती शांताबाई जगदेव रवणकार या ७५ वर्षीय वृद्ध महिला निराधार आहेत. त्यांना सध्या मोल मजुरी करता येत नसल्याने पोटाची खळगी भरण्यासाठी गावभर भटकंती करावी लागते. या महिलेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने तिच्या दैनंदिन गरजा पूर्ण करताना अडचणी येत होत्या. तेव्हा शासनाकडून निराधारांना दरमहा लाभ मिळतो याची माहिती शांताबाई रवणकार यांना मिळताच त्यांनी तहसील कार्यालयात धाव घेतली होती. मात्र त्यांच्याकडे या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नव्हती त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला नाही. अशातच त्यांची भेट कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी झाली व या वृद्ध महिलेने आकाश फुंडकर यांना आपबिती सांगितली. तेव्हा ॲड. फुंडकर यांनी तहसीलदार सुनील पाटील यांच्याशी संपर्क साधत या वृद्ध महिलेला श्रावण बाळ योजनेचा लाभ कसा देता येईल याबाबत सुचविले. यानंतर तहसीलदार पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत शांताबाई रवणकार यांची भेट घेऊन त्यांच्याकडे असलेले आधार कार्ड व बँकेचे पासबुक ही कागदपत्रे घेतली. तर रोहना गावातून या महिलेची माहिती घेऊन ती खरोखरच निराधार असल्याची शाश्वती केली.

विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत श्रीमती शांताबाई जगदेव रवनकार यांना श्रावण बाळ योजनेचा लाभ देण्यासाठी समाविष्ट करण्यात आले. शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सुरू आहे.

या अभियानांतर्गत पार पडलेल्या शिबिरात २३ जून रोजी पार पडलेल्या शिबिरात शांताबाई रवणकार यांना निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. येत्या जुलै महिन्यापासून या महिलेच्या बँक खात्यात दरमहा १५०० रुपये लाभ जमा होणार आहे. तहसीलदार सुनील पाटील यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे श्रावण बाळ योजनेत समाविष्ट केल्याने या महिलेला दिलासा मिळाला आहे.

## शहरात गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये गरजूंना मोफत पुस्तकांचे वितरण

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३० :

येथील गोधणी मार्गावरील जिल्हा परिषद गव्हर्नमेंट शाळेतील नवव्या वर्गाच्या गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले. हा उपक्रम शाळेतील माजी विद्यार्थ्यांकडून राबवण्यात आला. विशेष म्हणजे शाळेच्या १९७४ व ७५ च्या हायर मॅट्रीक बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून यापूर्वीही अनेक उपक्रमाअंतर्गत गरीब होतकरु विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आलेला आहे.

कार्यक्रमाला गट शिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, माजी नगरसेविका तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य संगीता कासार, माजी विद्यार्थी अरुण सरागे, अनिल अंबाडकर, अभय निसाळ, मुख्याध्यापक साहेबराव पवार, शिक्षक सुनिल गावंडे, संदीप मारगाये, प्रकाश साबळे, अहमद असलम, सुनिल बरमदे, शालीनी ठाकरे, सिमा सिडाम आदि शिक्षक उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक साहेबराव पवार यांनी प्रास्ताविकातून शाळेचे माजी विद्यार्थी शाळेला व विद्यार्थ्यांना करीत असलेल्या मदतीबद्दल माहिती दिली.

## वारकऱ्यांसाठी ८ जुलैला मिरज-नागपूर फेरी

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील वारकऱ्यांची वाढलेली संख्या बघता नवी अमरावती ते पंढरपूर अशा विशेष रेल्वेच्या चार फेऱ्या देण्यात आल्या असल्या तरी तेवढ्यानेच भागणार नाही म्हणून पंढरपूर येथून भाविकांना परत आणण्यासाठी मिरज-नागपूर या ८ जुलै रोजी आणखी एका अतिरिक्त फेरीची सुविधा मध्य रेल्वेने दिली आहे. या विशेष रेल्वेने अमरावती जिल्ह्यातील वारकऱ्यांना बडनेरा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे स्थानकावर उतरता येणार आहे. गाडी क्र. ०१२१३ एकेरी विशेष गाडी ही ८ जुलै रोजी मीरज येथून दु. १२.५५ वाजता निघेल व दुसऱ्या दिवशी नागपूर येथे दु. १२.२५ वाजता पोहोचेल. दरम्यान ही गाडी पंढरपूर येथे दु. ३.५५ वाजता तर बडनेरा येथे सकाळी ८.५० वाजता पोहोचेल. मार्गात ती पंढरपूर, कुडूवाडी, दौंड, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, पुलगाव, वर्धा, अजनी या स्थानकांवर थांबा घेणार आहे. त्याचप्रमाणे ज्या भाविकांना काही कारणास्तव नवी अमरावती-पंढरपूर रेल्वेने सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाणे शक्य होणार नाही, त्यांच्याकरिता पंढरपूरला जाण्यास गाडी क्र. ०१२०५ नागपूर-मिरज रेल्वेची सुविधा आहे.

# इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

१ जुलै हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमीत्त १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला.

शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, नियार्तीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोज्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो.

महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## भावाने उधार घेतलेले ७० हजार रुपये एएसआय कलामांच्या जीवावर बेतले

# पाय फ्रॅक्चर झाल्याने एक आरोपी रुग्णालयात; दोन आरोपींना कोठडी

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :

वलगाव ठाण्यात कार्यरत एएसआय अ. कलाम यांचा अपघातानंतर चाकूने वार करून शनिवारी खून करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोघांना रविवारी (दि. २९) पहाटे अटक केली असून, तिसरा आरोपी उपचार घेत आहे. अ. कलाम यांच्या भावाने एका महिलेकडून ७० हजार रुपये उधार घेतले होते. त्याच रकमेवरून महिलेच्या मुलांमध्ये व कलाम यांच्या भावाचा तसेच पुतण्याचा वाद झाला होता. तो वाद पोलिसांतही पोहोचला होता. या वादात भावाकडून अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यामुळे अ. कलाम यांचा महिलेच्या मुलाने त्याच्या दोन मित्रांच्या मदतीने खून केला. ७० हजारांचा हा वादच कलाम यांच्या जीवावर बेतल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले.

खुनाचा मुख्य सूत्रधार जिहानोद्दीन वल्द अहेसानोद्दीन (२२, रा. अराफतनगर, अमरावती) हा असून त्याच्यासह आवेज खान अयुब खान (२२, रा. दयार्पूर) या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. याचवेळी फाजील खान साबिर खान (२३) हा तिसरा आरोपी पाय फ्रॅक्चर असल्यामुळे उपचारासाठी रुग्णालयात दाखल असून, पोलिस त्याच्यावर नजर ठेवून आहेत. जिहानोद्दीनच्या आईकडून काही दिवसांपूर्वी अ. कलाम यांचा भाऊ सलाम यांनी ७० हजार रुपये उधार घेतले होते. ही रक्कम परत करत नसल्यामुळे जिहानोद्दीन, त्याचे वडील, भाऊ लकी हे २० जूनला सलामच्या घरी गेले होते. या वेळी त्यांची बाचाबाची व मारामारी झाली होती. या प्रकरणी सलाम यांच्या पत्नीने गाडगेनगर पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली होती. त्या तक्रारीवरून पोलिसांनी जिहानोद्दीन, त्याचा भाऊ लकी, वडील व आवेज या चौघांविरुद्ध मारहाण करणे व राइटच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. दरम्यान तुम्ही घरी येऊन हाणामारी केली ही बाब सलामचा मुलगा फैसल व त्याचा चुलत भाऊ शोएब यांना कळली. त्यामुळे शोएब, फैसल, सलाम हे तिघे २० जूनला उशिरा रात्री जिहानोद्दीनच्या घरी गेले. या वेळी जिहानोद्दीन घरी नव्हता. त्यावेळी जिहानोद्दीनचे वडील अहेसानोद्दीनवर या तिघांनी चाकू हल्ला चढवला होता. या चाकू हल्लूयात ते गंभीर जखमी झाले होते. त्या प्रकरणी २१ जूनला पहाटे नागपुरी गेट पोलिसांत सलाम, फैसल आणि शोएब या तिघांवर गंभीर मारहाण करून जीवाने मारायचे नव्हते तर अपघात करून पळायचे होते अटक केल्यानंतर जियानोद्दीनने पोलिसांना सांगितले की, आम्हाला त्यांना जीवाने मारायचे नव्हते. केवळ अपघात करून पळायचे होते. मात्र अपघातानंतर ते जीवंत होते. त्यांना आम्ही दिसलो होतो. त्यामुळे आमच्यासमोर पर्याय नव्हता, कारण ते जीवंत राहिले असते तर आम्हालाही धोका होता. त्यामुळे आम्ही खून केला असल्याचे त्याने सांगितले आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# टॉमेटो गार्लिक पास्ता

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम पण वेगळं काही खावंसं वाटतं. अशावेळी मस्तपैकी टॉमेटो गार्लिक पास्ता बनवता येईल.

**सामग्री:** ४०० ग्रॅम स्पॅगेटी पास्ता, दोन चमचे पार्मिसन चीझ, एक टी स्पून काळीमिरी, अर्धा किलो चेरी टोमॅटो, अर्धा टेबलस्पून लसूण, ६ ते ७ तुळशीची पानं किंवा बासिल हर्ब, एक टी स्पून सोया सॉस, एक टेबलस्पून टॉमेटो सॉस, एक टीस्पून ग्रीन चिली सॉस, मीठ, तेल आणि सजावटीसाठी कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात थोडं मीठ घाला. पाणी उकळल्यानंतर त्यात स्पॅगेटी पास्ता घालून शिजवून घ्या. पाणी गाळून पास्ता गार करायला ठेवा. एका कढईत दोन टेबलस्पून तेल गरम करा. त्यात लसूण आणि टॉमेटो घालून शिजवून घ्या. टॉमेटो मऊ शिजल्यानंतर त्यात मिरपूड,मीठ, ग्रीन चिली सॉस, सोया सॉस घालून परतून घ्या. मसाला तयार झाल्यानंतर त्यात पास्ता घाला. यात टोमॅटो सॉस, बासिल किंवा तुळशीची पानं, चीझ आणि कोथिंबिर घालून पाच ते आठ मिनिटं शिजवून घ्या. तुमचा पास्ता तयार आहे. गरमागरम खा.




# लॉकर ठरले यशाची गुरुकिल्ली

अचिव्हर

सनत जैन आणि विशाल जैन हे दोघे मेहुणे आहेत. दोघेही पूर्वी दिल्लीतील चांदणी चौकात सीसीटीव्हीचे दुकान चालवत होते. परंतु या क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे त्यांना हे दुकान बंद करावे लागले. त्यानंतर दोघांनी 'लवना स्मार्ट डोअर लॉक्स' नावाचा एक नवीन ब्रँड सुरू केला. ते डिजिटल लॉकर बनवतात. आज हा ब्रँड कोट्यवधी रुपयांचा बनला आहे.

सनत जैन आणि विशाल जैन यांनी बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेमुळे चांदणी चौकातील सीसीटीव्हीचे दुकान २०२० मध्ये बंद केले. या काळात ते चीनला गेले आणि दोघांनाही डिजिटल स्मार्ट लॉकर व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. डिजिटल स्मार्ट लॉकरने प्रभावित होऊन त्यांनी प्रथम ते त्यांच्या घरात बसवले आणि त्याचा अनुभव घेतला. अशा प्रकारे त्यांनी 'डिजिटल स्मार्ट लॉकर'चा व्यवसाय सुरू केला. दोघांनीही हे क्षेत्र समजून घेण्यासाठी बाजारात जाऊन खूप



अभ्यास केला. विविध ब्रँडसाठी स्मार्ट लॉक बनवणारे ओईएम (मूळ उपकरण उत्पादक) म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

दोघांनीही २०२१ मध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्स नावाचा स्वतःचा ब्रँड सुरू केला आणि या व्यवसायात प्रत्येकी ५० लाख रुपये गुंतवले. त्यांच्या मूळ कंपनीचे नाव भगवान श्री लॉक्स प्रायव्हेट लिमिटेड असे आहे. विशाल जैन यांनी खरेदी आणि सर्व्हिसिंग पाहिले तर सनत जैन यांनी विक्री आणि मार्केटिंगकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परंतु हळूहळू लोकांचा त्यांच्या उत्पादनांवर विश्वास बसला आणि त्यांचा व्यवसाय वाढला.

**डिजिटल लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान**

त्यांच्या डिजिटल स्मार्ट लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यात वाय-फाय आणि ब्लूटूथ, ०.४ सेकंदात फिंगरप्रिंट डिटेक्शन, ओटीपी सारखी वैशिष्ट्ये आहेत. आज भारतातील १२० स्टोअरमध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्सची विविध उत्पादने उपलब्ध आहेत. लवना स्मार्ट डोअर लॉक्सची उत्पादने ऑनलाइनदेखील विकली जातात. फक्त तीन वर्षात या कंपनीची उलाढाल सात कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

टेक टॉक

## एआय चॅटबॉट्सही धोकादायक




नवीन एआय चॅटबॉट्स आणि लेखन साधनांचा व्यापक वापर कंपन्यांना डेटा लीकचे बळी बनवू शकतो. हॅकर्स संवेदनशील कॉर्पोरेट तपशीलांमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासाठी चॅटबॉट्सना लक्ष्य करू शकतात, अशी भीती आहे. चॅटबॉट्समध्ये असलेली गोपनीय माहिती आता भविष्यात एआय कंपन्या चॅटबॉट्सना प्रशिक्षण देण्यासाठी वापरतील, अशीही चिंता आहे. अशा परिस्थितीत डेटा सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. 'मायक्रोसॉफ्ट कॉर्प आणि अल्फाबेट इंकसह प्रमुख टेक कंपन्या चॅटबॉट्स आणि सर्च इंजिन अधिक अद्ययावत करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा वापर करत आहेत. यासाठी, ते इंटरनेटवर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नां चा वापर करत आहेत. अशा परिस्थितीत चॅटबॉट्सना विचारलेले प्रश्नकदेखील संग्रहित केले जात आहेत आणि त्यातून 'एआय'ला प्रशिक्षण दिले जात आहे, असे गृहीत धरले जाऊ शकते. या साधनांमध्ये गोपनीय किंवा वैयक्तिक डेटा भरला जात असेल तर डेटा हटवणे खूप कठीण असू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

ॲप वर्ल्ड

## आता 'एआय' करेल व्हिडीओ एडिटिंग

व्हिडिओ बनवणाऱ्यांसाठी 'मेटा एआय'ने एक उपयुक्त फिचर आणले आहे. व्हिडिओ बनवून एडिटिंगची गुंतागुंत नको असणाऱ्यांचे काम आता सोपे झाले आहे. आता फक्त व्हिडीओ अपलोड केला तरी नंतर 'मेटा एआय'च्या मदतीने ५० पेक्षा जास्त प्रॉम्प्टस वापरून त्यात हवे ते बदल करता येतात. या फीचरचा वापर करून आपण व्हिडिओतल्या व्यक्तींचे कपडे, पार्श्वभूमी, शैली आणि अगदी वातावरणदेखील बदलू शकतो. हे फिचर 'मेटा एआय ॲतप' आणि वेबसाइटवर अगदी सहजपणे कार्य करते. युजरला फक्त त्याचा व्हिडीओ अपलोड करायचा आणि त्यात काय बदलायचे आहे, ते ठरवायचे आहे. म्हणजे तुम्हाला टी-शर्ट इतर रंगाचा हवा असेल किंवा पार्श्वआभूमीत समुद्राऐवजी पर्वत दिसावेत, असे वाटत असेल तर फक्त संबंधित प्रॉम्प्ट निवडा आणि एआय काही सेकंदात तो बदल करेल.



नवे काही

## कुलरमधून घ्या एसीची हवा!


कुलरमध्ये बर्फासोबत दोन ते तीन चमचे मीठ टाकल्यावर कुलर एसीपेक्षाही थंड हवा देते. तसेच याचा वीजबिलावर कोणताही परिणाम होत नाही. बर्फ आणि मिठाचे मिश्रण कूलरमध्ये टाकल्यानंतर थोड्याच वेळातच पूर्वीपेक्षा अधिक थंड हवा येत असल्याची जाणीव होईल. जवळपास एसीमधून येते तेवढीच थंड हवा कुलरमधून येईल. अनेक जण या ट्रीकवर संशय व्यक्त करतात. मात्र ही ट्रीक काम करते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे, तुम्ही बर्फामध्ये मीठ टाकता तेव्हा तो बर्फ अधिक वेगाने वितळू लागतो. बर्फ वितळल्यामुळे कुलरमधून एसी इतकी थंडी हवा मिळते. मात्र हा प्रयोग करताना केवळ दोन ते तीन चमचे एवढेच मीठ टाकावे. त्यापेक्षा अधिक टाकल्यास मीठाच्या पाण्यामुळे कुलरमधील काही इलेक्ट्रिकल पार्ट्स खराब होण्याची शक्यता असते. काही लोखंडांच्या पार्ट्सवर यामुळे गंज चढतो.



# केसाचा लूक बदलण्याची योग्य वेळ

ग्रुमिंग

पुरुषांच्या लूकमध्ये केसांची मोठी भूमिका असते. पण बर्याचि पुरुषांना हेअरस्टाईलबद्दल योग्य माहिती नसते. त्यामुळे त्यांचा लूकही खराब होतो. लग्न-समारंभाच्या किती दिवस आधी केस कापणे योग्य आहे, याचाही कोणी फारसा विचार करत नाही. सहसा मुले सलूनमध्ये जातात आणि लग्नाच्या एक-दोन दिवस आधी केस कापतात. तुम्हीही अशी चूक करणार असाल तर थांबा.



सर्वप्रथम एखाद्या समारंभाला जाण्यापूर्वी किती दिवस आधी केस कापले पाहिजेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून समारंभाच्या मुख्य दिवशी तुमची हेअरस्टाईल योग्य दिसेल आणि तुमचा लूकही अपेक्षेप्रमाणे दिसेल. लग्न किंवा साखरपुड्यासारख्या खास समारंभाच्या आधी पुरुषांनी निश्चितच केस कापले पाहिजेत. पुरुषांचे केस लवकर वाढतात आणि त्यांना योग्य आकारात ठेवणे महत्त्वाचे आहे. परंतु समारंभाच्या फक्त एक-दोन दिवस आधी केस कापल्याने संपूर्ण चेहर्यावचा लूक खराब होऊ शकतो.

५-६ दिवस आधी केस कापा

पुरुषांना एखाद्या विशेष समारंभाला किंवा स्वतःच्या लग्नाला उपस्थित राहायचे असते तेव्हा त्यांनी केसांचा उत्तम लूक येण्यासाठी सुमारे ५ ते ६ दिवस आधी केस कापून घ्यावेत. केस कापल्यानंतर, योग्य आकारात येण्यासाठी थोडा वेळ लागतो. त्यामुळे समारंभाच्या दिवशी हेअर स्टाईल परिपूर्ण दिसते. तसेच, इतके दिवस आधी केस कापण्याल्यामुळे केस कापताना झालेल्या चुकादेखील दुरुस्त करता येतात.

# अक्षम्य चूक झाली!

मॅच मेकिंग

प्रेयसीसोबतचं तीन वर्षांचं नातं संपवून मी दुसऱ्याच मुलीकडे आकर्षित झालो. नातं संपवताना माझी प्रेयसी खूप रडली. पण काही काळानंतर तिने हा निर्णय स्वीकारला. मी शिक्षणानिमित्त दुसऱ्या शहरात गेल्यानंतर नवं नातं जोडलं. पण फक्त दहा महिन्यातच हे नातं संपलं. कॉलेज संपल्यानंतर ती मुलगीही मला सोडून गेली. आधीच्या प्रेयसीसोबतचं नातं संपवून मी खूप मोठी चूक केली आहे. ती आता आयुष्यात पुढे निघून गेली आहे. माझ्याशी बोलण्यात तिला रस नाही. मी काय करू?

**उत्तर** : सर्वात आधी तू समुपदेशकांना भेट. तुला नात्यामधून नेमकं काय हवं आहे, हे जाणून घे. याबाबतची स्पष्टता तुझ्याकडे असायला हवी. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. काही काळ कोणत्याही नात्यात अडकू नकोस. स्वयंविकासावर भर दे. तुझी प्रेयसी आयुष्यात पुढे निघून गेली आहे. त्याचप्रमाणे तूही भविष्याचा विचार कर. आता भूतकाळ बदलता येणार नाही. पण भविष्य आपल्या हातात आहे. उज्ज्वल भवितव्यासाठी आपण नक्कीच प्रयत्न करू शकतो.



# इथे चुकू नका

फॅशन पॅशन

आपण फॅशनच्या बाबतीत काही चुका करत असतो. चुका करायला हरकत नाही पण त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अर्थात अजाणतेपणीही काही चुका होतात. त्या टाळल्या तर आपण नक्कीच स्मार्ट दिसू शकतो.



* दोस्तांनो, पँटचे खिसे वस्तू ठेवण्यासाठी असले तरी ते फुगता कामा नयेत. पँटच्या शिखातून बाहेर येणार्यां चाव्या, वॉलेट फार वाईट दिसतात. वॉलेट उगाचच खिशात कोंबू नका. बॅकपॅकच्या कप्प्यात टाका. कार्ड ठेवण्यासाठी लेदरच्या कार्ड होल्डरचा वापर करा.

* फार लांब ट्राउझर्स घालू नका. यामुळे तुमच्या लूकचा पार विचका होईल. पँट पायात येणार नाही याची काळजी घ्या.

* 'स्क्वेअर टो ड्रेस' हा बुटांचा प्रकार आता बराच मागे पडला आहे. हे बूट आउट ऑफ फॅशन आहेत. त्यामुळे ते कॅरी करू नका. त्याऐवजी पुढच्या बाजूने गोलाकार असणारे शूज घ्या.


* एकाच वेळी जास्त ॲक्सेसरीज घालून नका. त्याऐवजी छानसं घड्याळ, पॉकेट स्वेअर, ट्रेंडी टाय, कफलिंक्स यापैकी काहीतरी ट्राय करा.

* मोज्यांची निवड योग्य असायला हवी. ट्राउझरला साजेसे न्यूट्रल रंगाचे मोजे घ्या. बुटांना शोभणारे भडक रंगाचे मोजे अजिबात घेऊ नका. कॉन्ट्रास्ट सॉक्सही चालून जातील. पण असे सॉक्स कॅज्युअल ऑकेजनसाठी ठेवा.

* खोल व्ही नेक असणारा टी शर्ट अजिबात घालू नका. असे टी शर्ट चांगले दिसत नाहीत. त्याऐवजी हेन्ले स्टाईल टी शर्टस ट्राय करा.

# जिने चढा, फिट रहा

फिटनेस फंडा



फिटनेस राखण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आपण बरंच काही करतो. ट्रेडमीलसारखी महागडी उपकरणं विकत घेतो. जीमच्या मेंबरशीपसाठी बरेच पैसे खर्च करतो. पण तुम्ही स्वस्तात फिट राहू शकता. यासाठी हवी समर्पित वृत्ती, जिद्द आणि जिने. तुमच्या इमारतीला भरपूर जिने असतील तर कॅलरी जाळण्यासाठी तुम्हाला दुसरीकडे कुठेही जावं लागणार नाही. जिन्यावरून धावणं हा एक उत्तम व्यायाम ठरू शकतो. फक्त अर्धा तास जिन्यावरून धावल्याने ५०० कॅलरी खर्च होतात, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही जिन्यांवरून धावण्याचा व्यायाम सुरू करू शकता. याबाबतच्या काही टिप्स...

* इतर कोणत्याही व्यायाम प्रकाराप्रमाणे जिन्यावरून धावण्याचा व्यायाम सुरू करण्याआधी 'वॉर्म अप' म्हणजे पूर्वतयारी करणं गरजेचं आहे. धावणं सुरू करण्याआधी ३ ते ४ मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. हळूहळू वेग वाढवा.

* जिन्यांवर तुम्ही पुश-अपही करू शकता. नेहमीच्या पुश-अप्सप्रमाणेच हा व्यायाम करायचा आहे. खालच्या पायरीवर उभे रहा. हात तिसऱ्या किंवा चौथ्या पायरीवर ठेवा आणि पुशअप्स करा.

* व्यायाम करायला फार वेळ नसला तरी काळजी करू नका. पाच मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. मग वेग वाढवा. त्यानंतर पुढची पाच मिनिटं जिन्यांवरून जोरात धावा. फक्त दहा मिनिटांत तुमचा व्यायाम होईल.

* तुमच्याकडे २० मिनिटं असतील तर एक पायरी सोडून जिने चढण्याचा व्यायाम करा. सुरूवातीला वेग कमी ठेवा. मग दोन पायर्यार सोडून जिने चढण्याचा प्रयत्न करा.

# लोणावळ्यात काय पाहाल?

भटकंती

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतून थोडा वेळ स्वत:साठी काढणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे निश्चियतच आपल्या डोक्यावरील ताण कमी करण्यास मदत होते. तसेच बाहेर फिरायला गेल्याने आपण ताजे तवाने होऊन पुन्हा जोमाने कामाला लागू शकतो. त्यामुळे लोक अनेकदा शनिवार-रविवारी फिरायला जाण्यासाठी बाहेर पडतात. असेच एक ठिकाण म्हणजे लोणावळा.

लोणावळा मुंबईपासून १२० किलोमीटर तर पुण्यापासून साठ किलोमीटर अंतरावर आहे. पार्टी करण्यापासून निसर्गाचा आनंद घेण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी हे ठिकाण परिपूर्ण आहे. लोणावळ्याला फिरायला जाण्यासाठी सकाळी लवकर निघा. इथे पोहोचून नाश्ता केल्यानंतर तुम्ही काही वेळ विश्रांती घेऊ शकता. यानंतर, साइटसीइंगला सुरुवात करा. इथे तुम्हाला भुशी धरण पाहायला मिळेल. ते पावसाळ्यात खूप सुंदर दिसते. याशिवाय, तुम्ही सनसेट पॉइंट/ टायगर पॉइंट, लायन पॉइंटवरून अद्भुत दृश्याचा आनंद घेऊ शकता.



लोणावळ्यात दुपारपर्यंत फिरल्यानंतर तुम्ही कोणत्याही प्रसिद्ध रेस्टॉरंट किंवा कॅफेमध्ये दुपारचे जेवण करू शकता. तुम्हाला हवे असल्यास कोणत्याही फार्महाऊस किंवा रिसॉर्टमध्ये बुफे लंचदेखील बुक करू शकता. किंवा तुम्ही स्ट्रीट फूडचा आनंद घेऊ शकता. दुपारी पुन्हा फिरायला जा. या वेळी तुम्ही लोणावळा तलाव, विसापूर किल्ला नक्की पाहा. लोणावळ्याला वॅक्स संग्रहालय आहे. ते मुलांना नक्कीच आवडेल. खरेदी करायची असेल तर तुम्ही स्थानिक चिक्की मार्केटमध्ये तेथील स्पेशल चिक्की व इतर खरेदी करू शकता.

**संध्याकाळी हिल व्ह्यू पॉइंटचा आनंद घ्या**

संध्याकाळी कोणत्याही हिल व्ह्यू पॉईंटवर चहा आणि भज्यांचा आस्वाद घ्या. हवामान चांगले असेल तर तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर थांबून खाऊ-पिऊ शकता. गर्दी आणि रहदारी टाळण्यासाठी सकाळी लवकर निघणे महत्त्वाचे आहे.

# 'न्यूक्लिअर इंजिनीअरींग'चा आकर्षक पर्याय

करियर वाटा

आजच्या युगात ऊर्जा ही सर्वात मोठी गरज बनली आहे. वाढत्या मागणीमुळे पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि टिकाऊ ऊर्जा स्रोतांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत 'न्यूक्लियर इंजिनीअरींग' ही शाखा करिअरसाठी एक महत्त्वपूर्ण आणि आकर्षक पर्याय ठरते. ही शाखा केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून वैद्यकीय क्षेत्र, संशोधन, संरक्षण आणि औद्योगिक विकासातही मोठ्या प्रमाणात योगदान देते.



**न्यूक्लियर इंजिनिअरिंग म्हणजे काय?**

'न्यूक्लियर इंजिनीअरींग' या विज्ञानशाखेत अणुऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती, रेडिएशन नियंत्रण, अणुउर्जा रिएक्टरचे डिझाइन, आणि कचरा व्यवस्थापन (वेस्ट मॅनेजमेन्ट) यासारखी कामे केली जातात. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यांचा समावेश असतो.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंगमध्ये हे कोर्सेस उपलब्ध आहेत.**

*बी. टेक-चार वर्षांचा

*एम. टेक/एम. एस.-एक ते दोन वर्षांचा

* पीएच. डी- संशोधनासाठी तीन ते पाच वर्षांचा कोर्स

भारतामध्ये प्रवेशासाठी जेईई, गेट, किंवा सीयूईटी परीक्षांमधून पात्रता मिळवावी लागते. बारावीत पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) असणे आवश्यक आहे.

**अभ्यासक'मासाठी प्रमुख शैक्षणिक संस्था**

**भारतात :**

*आयआयटी - रिएक्टर फिजिक्समध्ये विशेष अभ्यासक'म

* जादवपूर विद्यापीठ -एम. टेक. साठी उत्कृष्ट पर्याय

* भाभा ॲवटॉमिक रिसर्च सेंटर - संशोधन व प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध

*पंडित दीनदयाळ ऊर्जा विद्यापीठ - खासगी क्षेत्रात आघाडीवर

**परदेशात:**

*एमआयटी(अमेरिका) - रिएक्टर डिझाइनसाठी जागतिक मान्यता

*यूसी बर्कली (अमेरिका)- न्यूक्लियर फ्युजन संशोधन

*इम्पिरिअल कॉलेज, लंडन (बि'टन) - डीकमिशनिंग आणि सेफ्टी कोर्सेस

*मॅकमॉस्टर विद्यापीठ (कॅनडा) - मेडिकल ॲप्लिकेशन्सवर भर

*केआयटी (जर्मनी) - वेस्ट मॅनेजमेंटसाठी प्रसिद्ध

भारतात केवळ मोजक्याच संस्था न्यूक्लियर इंजिनिअरिंग कोर्सेस देतात. त्यामुळे प्रवेशासाठी मोठी स्पर्धा असते. परदेशात प्रवेशासाठी जीआरई, टोफेल, किंवा इलेट्स स्कोअर लागतो. परदेशातील वार्षिक फी सुमारे २०-५० लाखादरम्यान असते, तर भारतात ती दोन ते आठ लाखांदरम्यान असते.

**पगार आणि करिअर संधी**

'न्यूक्लियर इंजिनीअरींगच्या क्षेत्रात नोकरी मिळाल्यावर भारतात चार ते सहा लाख रुपये इतका वार्षिक पगार मिळतो. अनुभव वाढल्यावर तो १०-१५ लाखांपर्यंत जातो. अमेरिकेत सरासरी पगार १.०५ ते १.६० लाख डॉलर (८५ लाख ते १.३ कोटी) पर्यंत असतो. ब्रिटनमध्ये मिड-लेव्हल इंजिनीअर्सना ३५ ते पन्नास हजार पौंड (३७ ते ५३ लाख) पगार मिळतो.

**मुख्य करिअर पर्याय :**

*न्यूक्लिअर इंजिनीअर- पॉवर प्लँट्समध्ये रिएक्टर डिझाइन आणि ऑपरेशन

*सेफ्टी इंजिनीअर- रेडिएशन नियंत्रण आणि पर्यावरण सुरक्षा

*रिसर्च सायंटिस्ट - न्यूक्लियर फ्युजन/वेस्ट मॅनेजमेंट

*मेडिकल फिजीस्ट - रेडिएशन थेरपी उपकरणांचे डेव्हलपमेंट

*प्रोजेक्ट इंजिनीअर - न्यूक्लियर प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी.



# विधीमंडळ अधिवेशन

## विरोधक - सत्ताधाऱ्यांची निदर्शने





■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरूवात झाली. आज पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांविरोधात विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाविरोधात आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांनी हिंदीच्या सक्तीचा निर्णय राज्याच्या हितासाठी घेतला, असे त्यांचे म्हणणे होते. त्यानंतर काही वेळाने विरोधकांनी टाळ कुटीत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

दरम्यान, हिंदीची सक्ती करणारे दोन्ही निर्णय शासनाने मागे घेतले असले तरी त्याचे तीव्र पडसाद विधिमंडळात उमटण्याची चिन्हे आहेत. याशिवाय शक्तिपीठ महामार्गाला विरोध, शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा मुद्दा, समृद्धी महामार्गाची झालेली दुरवस्था, महागाई आदी विविध मुद्द्यांवरून सभागृहात टोकाचे राजकारण होण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे आज विधानभवनात आले होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्राच्या गावागावात व कानाकोपऱ्यात जय महाराष्ट्राचा नारा पुन्हा एकदा बुलंद झाला आहे. हा नारा बुलंद करण्यात शिवसेना व शिवसैनिक आघाडीवर होते. सरकारला शहाणपण सुचले की नाही हे येत्या काही दिवसांत कळेल. पण तूर्त त्यांनी हिंदी सक्तीचा जीआर रद्द केला. त्यांनी हा जीआर रद्द केला नसता तर ५ तारखेच्या मोर्चात सत्ताधारी भाजप, एसंशिं गट व अजित पवार गटाचे अनेक नेते सहभागी झाले असते. कारण आता मराठी माणसांची एकजूट आता झालेली आहे. त्यांनाही मी धन्यवाद देतो.

उद्धव ठाकरे म्हणाले, मातृभाषेचे प्रेम हे पक्षाच्या पलिकडे असले पाहिजे. सरकारने केवीलवाणा प्रयत्न केला. पण तरीही आम्ही त्यांना धन्यवाद देतो. आता त्यांनी एक नवीन समिती नेमली आहे. समिती कोणतीही असू द्या, त्यांनी काहीही सांगू द्या, पण सक्ती विषय हा संपलेला आहे.

आपण विखुरले आहोत असे वाटल्यानंतर मराठीद्रोही पुन्हा डोके वर काढतात. त्यांचे डोके काल आपण चेपलेले आहे. चिरडून टाकले आहे. त्यांचा फना पुन्हा वर येऊ नये असे वाटत असेल तर परत संकट येण्याची वाट पाहत बसण्यापेक्षा ही एकजूट आपण कायम ठेवली पाहिजे, असे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाजपचा उल्लेख कमळी असा केला. ते म्हणाले, या सरकारच्या मंत्र्यांचे रोज कोणते न कोणते पापं बाहेर येत आहेत. शेतकऱ्यांचे विषय तसेच प्रलंबित आहेत. मला उत्सुकता आहे की, ही कमळी कोणत्या भाषेच्या शाळेत शिकली. कारण मार्क्स मिळाले शंभर पैकी शंभर ही कमळी आमची एक नंबर. आता ही कमळी कोणत्या भाषेच्या शाळेत शिकली? त्या कमळीवर कोणत्या भाषेची सक्ती होती का? तिने 100 मार्क कसे मिळवले? या 100 मार्गात तिने ईव्हीएम वापरले होते का? हे पाहण्याची मला उत्सुकता आहे. त्यामुळे कमळी एक नंबर आहे असे म्हणणारे कोण आहेत? हे मला पाहायचे आहे, असेही उद्धव ठाकरे शरसंधान साधताना म्हणाले.

## समृद्धी महामार्गाच्या दुरवस्थेवरून आदित्यची टीका

समृद्धी महामार्गाची पहिल्याच पावसात दुरवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. यावरून देखील विरोधक सरकारवर हल्लाबोल करू शकतात. यावर आदित्य ठाकरे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत बोलतानाच टीका केली आहे.

ते म्हणाले, ज्या महामार्गाला माझ्या आजोबांचे नाव दिले त्या महामार्गावर आज खड्डे पडले आहेत. त्याच महामार्गावर आज नदी वाहते आहे. मुंबई-पुणे महामार्गावर चुकीच्या पद्धतीने जवळ जवळ साडे साडेबारा कोटी रुपये चुकीचा फाइन लावण्यात आला आहे. कारण हा घोटाळा एमएसआरडीसी ने केलेला आहे, असा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे. त्यामुळे हा देखील विषय अधिवेशनात गाजू शकतो.

# गरीब, दुर्लक्षित समाजावर राज्यात अन्याय

## जयंत पाटील यांचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यावरून माजी अर्थमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्यावर निशाणा साधला.

ते सरकारला धारेवर धरत म्हणाले, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन राखणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. सद्यस्थितीत राज्याचे आर्थिक संतुलन पूर्णतः ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होत आहे. एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर होणारा खर्च कागदावर दाखवला जातो हे ३१ मार्चला कळते. पण प्रत्यक्षात त्यावर काहीच पैसा खर्च झाला नाही. तीच पुनरावृत्ती यंदा हे सरकार करत आहे.

**सरकारने अजून एक विक्रम रचला**

जयंत पाटील पुढे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केल्याचा उल्लेख मी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आज पुन्हा पुरवणी मागण्या माडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटींच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्यामुळे या मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या व आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक विक्रम रचला आहे. पुरवणी मागण्या मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असा प्रकार या सरकारने सुरू केला आहे.

यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. त्यानंतर पुढचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आणखी एक पुरवणी मागणी येणार. याचा अर्थ हे सरकार राज्याची महसुली तूट दीड किंवा २ लाख कोटींपर्यंत पोहोचवेल. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे, असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. त्यामुळे सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

# विधानभवनातील पासेसवरून अशोक स्तंभ गायब



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एका गोष्टीकडे लक्ष वेधले. विधानभवनातील पासेसवरून अशोकस्तंभ हटवल्याचा दावा त्यांनी केला.

रोहित पवार म्हणाले, विधिमंडळाचा पास आहे म्हणजे जिथे कायदे केले जातात महाराष्ट्राचे त्या पासवर मध्ये अशोकस्तंभ होता. आता हळूहळू हा अशोकस्तंभ सगळीकडून काढला जाईल. संविधानाची गळचेपी भाजपकडून केली जात आहे, अशी टीका त्यांनी केली.

**जितेंद्र आव्हाडांचीही टीका**

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील याच मुद्द्यावरून सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, आपल्या सगळ्या पासेस म्हणजे जे सरकार विधिमंडळ इश्यू करतो त्यावर नेहमी अशोकस्तंभ असायचा. यापूर्वीचे सगळे पासेस तपासून बघा सगळ्यावर अशोकस्तंभ आहे. पीएच्या पासवर अशोकस्तंभ आहे, प्रेक्षकांचे पासवर सुद्धा अशोकस्तंभ आहे. आता हा अशोकस्तंभच गायब झाला आहे.

# नेतृत्वाने कच खाल्ली

## प्रकाश आंबेडकरांची टीका



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
ट्रम्पधार्जीण्या सरकारमुळे भारताने युद्ध जिंकण्याची संधी घालवली, अशी टीका ऑपरेशन सिंदूर'वरून प्रकाश आंबेडकरांची टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांनी येथे मोदी सरकारवर केली. फुले -आंबेडकर इंटलेक्च्युअल फोरमच्यावतीने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर आणि नंतरच्या घडामोडी' हा विषय होता.

भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं. आपण जिंकायला लागलो होतो. परंतु ट्रम्प धार्जीण्या सरकारमुळे जिंकायला आलेलो युद्ध आपण हरलो असे आंबेडकर म्हणाले. भारताला गेले २० ते २५ वर्षांपासून दहशतवाद्यांचा त्रास होत होता, ती घालवण्याची संधी भारताने का घालवली? असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी केला.

ऑपरेशन सिंदूर'च्या काळात झालेल्या युद्धाच्या वेळी पाकिस्तानकडे दहा दिवसच पुरेल एवढाच दारूगोळा होता. देशाला यानिमित्ताने चांगली संधी आलेली होती. त्यामुळे, पाकिस्तान आणि त्यांच्या पाठबळावर चालणाऱ्या दहशतवादाला कायमची समाप्ती देण्याची संधी आपल्या हातात होती. पण आपण ती संधी गमावली, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

# शिंदे गटात गुंडाचा प्रवेश?

## पक्षप्रवेशाचा दावा फेटाळला



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूर येथे पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी नागपूरमधील कुख्यात गुंड युवराज माथनकरनेही शिवसेनेत प्रवेश केला असल्याची माहिती समोर आली आहे.

युवराज माथनकर हा एकनाथ शिंदे यांच्या जवळ उभा असल्याचे दिसून आले तसेच त्याच्या गळ्यात शिवसेनेचा दुपट्टाही दिसून आला. परंतु, जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांनी युवारजचा पक्षप्रवेश झाला नसल्याचा दावा केला आहे.

नागपूरचे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांनी म्हटल्यानुसार, युवराज माथनकरने शिवसेनेत प्रवेश केला, हे आम्हाला माध्यमांमध्ये बातम्या पाहून कळले. आमच्या पक्षात प्रवेश घेणा?यांच्या यादीत युवराज माथनकरचे नाव नव्हते. तसेच युवराज माथनकर नामक गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने पक्षात प्रवेश घेतल्याची माहिती नव्हती, असे गोजे म्हणाले.

पुढे बोलताना सूरज गोजे म्हणाले, शनिवारी पक्ष प्रवेश होताना मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. याच गर्दीत युवराज माथनकर तिथे आला असावा आणि त्याच्या गळ्यात दुपट्टा टाकण्यात आला असावा, माथनकर याचा शिवसेनेशी काहीही संबंध नाही. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री असून नगर विकास मंत्री असल्याने अनेक लोक काम घेऊन येतात, त्याच कारणाने युवराज माथनकर ही आला असावा, अशी शंका गोजे यांनी व्यक्त केली.

तसेच युवराज माथनकर कार्यक्रम स्थळी दिसत आहे. हे आम्ही नाकारत नाही, पण पक्ष प्रवेशाशी त्याचा काहीही संबंध नाही, असे म्हणत युवराज माथनकरचा पक्षप्रवेश झाला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, युवारज माथनकरच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत. लूट, खंडणी आणि हत्या असे अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामुळे काही वर्षे तो तुरुंगातही होता. नंतर अनेक प्रकरणातून त्याची निर्दोष सुटका झाल्याची माहिती आहे. निर्दोष सुटका जरी झाली असली तरी नागपूरमधील लोक त्याला अजूनही सराईक गुंड म्हणूनच ओळखतात.

पक्षप्रवेश सोहळा पार पडल्यानंतर पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी युवराज माथनकरच्या पक्षप्रवेशाविषयी विचारले. यावर उत्तर देताना शिंदे म्हणाले, स्थानिक कार्यकर्त्यांचा प्रवेश देण्याचा निर्णय स्थानिक पातळीवरील पदाधिकारी करतात. त्यामुळे कोणी वादग्रस्त व्यक्ती पक्षात येणार नाही, याची काळजी स्थानिक नेतृत्वाने घ्यायची असते, असे शिंदेंनी मत व्यक्त केले.

# 'पादरी'चे सैराट करणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस

## पडळकर यांचे वादग्रस्त विधान

■ वृत्तसंस्था
जालना, दि. ३० :
बैलगाडीच्या शर्यतीत जसे बक्षीस ठेवले जाते, तसेच बक्षीस धर्मांतरासाठी येणाऱ्या पादरी लोकांना ठोकण्यासाठी ठेवले पाहिजे, असे वादग्रस्त विधान भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात केले आहे. त्यांच्या या विधानामुळे ख्रिश्चन धर्मियांत मोठा रोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी ख्रिश्चन धर्मियानी सोमवारी जालन्यात आक्रोश मोर्चा काढला.

सांगली येथील यशवंत नगर येथे गत आठवड्यात सासरच्या छळाला कंटाळून ऋतुजा राजगे नामक ७ महिन्यांच्या गरोदर महिलेने आत्महत्या केली होती. नंतर ही घटना धर्मांतराच्या प्रकरणाशी संबंधित असल्याचे समोर आले होते. या प्रकरणी टीका करताना गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या या विधानाचे सोमवारी जालन्यात तीव्र पडसाद उमटले.

येथील ख्रिश्चन बांधवांनी सोमवारी शहरातील गांधी चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. त्यात पडळकर यांच्याविरोधात घोषणाबाजी करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. या मोर्चाला दलित संघटनांनीही पाठिंबा दिला.

सरकारने गोपीनाथ पडळकर यांची आमदारकी रद्द करून त्यांच्यावर कारवाई केली नाही तर या प्रकरणी विभागीय पातळी ते दिल्लीपर्यंत मोर्चे काढले जातील, असा इशारा मोर्चेकऱ्यांनी दिला. पडळकरांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांची आमदारकी रद्द करण्यासाठी अहिल्यानगर येथेही मोर्चा काढण्यात आला होता.

# पंढरीच्या वारीला निघालेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :
विठ्ठलाच्या वारीला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर काही नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना पुण्याच्या दौंड येथे घडली आहे.

दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे ही संतापजनक घटना घडली आहे. मजल दरमजल करत पंढरपूरच्या दिशेने जाणारे वारकरी चहापाण्यासाठी येथे थांबले होते. त्यानंतर गाडीत बसताना २ जण गाडीवरून तिथे आले. त्यांनी वारकऱ्यांच्या गळ्याला कोयता लावला.

त्यानंतर त्यांनी वारकऱ्यांची लूट करून एका अल्पवयीन मुलीला आपल्यासोबत काही अंतरावर नेले. तिथे तिच्यावर अत्याचार केला. या घटनेमुळे दौंड तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात खळबळ माजली आहे. या प्रकरणी दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलिस अज्ञात आरोपींचा शोध घेत आहे. त्यांच्यापुढे आरोपींच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान आहे.

# शिंदे गटाचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने आज विधानभवनाच्या पाय?यांवर विरोधकांविरोधात विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेविरोधात आंदोलन केले. नवीन शैक्षणिक धोरण तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सरकारने स्वीकारल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या हितासाठी हिंदीच्या कथित सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्दबातल केल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

# पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा फुले यांचे नाव द्या

## उपेक्षित समाज महासंघाची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३० :
दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक ओबीसीसह सकल बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सनदशीर मार्गाने लढा देणाऱ्या अराजकीय संघटना, उपेक्षित समाज महासंघाचे वतीने महात्मा फुले यांना अभिवादन करुन पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा जोतीराव फुले यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली.

उपेक्षित समाज महासंघ व फुले शाहू आंबेडकर अनुयायांच्या वतीने केलेल्या मागणीत म्हटले की, महाराष्ट्राला फुले शाह आंबेडकर यांच्या क्रांतिकार्याचा वारसा आहे. त्यांच्या म्हणून क्रांती कार्यामुळेच पुणे नगरीला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महत्व प्राप्त झाले आहे. तसेच महाराष्ट्राला पुरोगामी राज्य संबोधले जाते. त्यांच्या कार्यापासून सदैव प्रेरणा मिळावी म्हणून पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा फुले यांचे नाव देण्याची मागणी बैठकीत महासंघाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण बनसोड, श्रीकृष्णदास माहोरे, सुभाष गोहत्रे व उत्तमराव भैसने, सुभाष प्रकाश खंडारे, इंजि. ज्ञानेश्वर कुर्वे, सुभाष शिंदे, वसंतराव भडके, धर्मपाल रामटेके, पारधी समाज नेते डॉ. शिवलाल पवार, रामकुमार खैरे, रविंद्र इंगळे पाटील सह फुले-शाहू-आंबेडकरांच्या अनुयायांनी केली.

# : हॅलो डॉक्टर :

## अशक्तपणा कारणं, लक्षणं आणि उपचार



मानवी शरीर हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे, त्यामुळेच अनेकदा कोणतेही बाह्य लक्षण नसताना किंवा आजार सदृश परिस्थिती नसताना देखील आपल्याला अचानक प्रचंड थकवा जाणवतो.

शरीरात अशक्तपणाची जाणीव होते. अशक्तपणाची हि जाणीव विशेषतः स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात असते. हा अशक्तपणा रक्तातील पांढऱ्या किंवा लाल पेशींच्या कमतरतेमुळे देखील असू शकतो. यालाच ॲनिमिया असे संबोधतात. शरीरातील हा अशक्तपणा नेमका कोणत्या करणामुळे येतो? या अशक्तपणाची लक्षण काय आहेत? आणि यावर उपचार काय करायचे? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी डॉ. निनाद जोगळेकर यांच्याशी बातचीत.

**अशक्तपणा म्हणजे नेमके काय?**

■ शरीरातील अशक्तपणा हा एक विकार आहे जो शरीरातील रक्तातील लाल पेशींचे प्रमाण अत्यंत कमी होते तेंव्हा जाणवतो. या लाल रक्तपेशींचे कार्य सुरळीत नसेल तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. काही लोकांमध्ये हा अशक्तपणा अनुवांशिक पद्धतीने आलेला असतो. परंतु अनेकदा काही प्रकारच्या आजारामुळे अशक्तपणा येऊ शकतो. याचे वेगवेगळे प्रकार असले तरी काही प्रकारच्या अशक्तपणामध्ये कर्करोग सारख्या गंभीर आजराची चाहूल असते. त्यामुळे अशा शारीरिक अशक्तपणाचे वेळीच निदान करणे गरजेचे असते.

**अशक्तपणाची लक्षण नेमकी काय असतात?**

■ अशक्तपणामध्ये प्रचंड शारीरिक थकवा जाणवणे हे अत्यंत सामायिक लक्षण असते. त्याशिवाय छातीत दुखणे, चक्कर येणे, वारंवार कोणत्याही गोष्टीचा आजाराचा संसर्ग होणे,हृदयाचे ठोके वाढणे, डोकेदुखी, त्वचेचा रंग फिकट होणे, श्वास लागणे इत्यादी लक्षण असू शकतात.

**अशक्तपणाची कारण काय आहेत?**

अशक्तपणा हा अनेक गोष्टीमुळे होऊ शकतो. आपल्या शरीरातील लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारा अशक्तपणा हा सामान्य प्रकारचा अशक्तपणा आहे.


एखादा दीर्घकालीन आजार असेल तरी अशक्तपणा जाणवू शकतो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती लाल पेशींवर हल्ला करते तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. याला ऑटो इम्यूईंन ॲनिमिया म्हणतात. लाल पेशींची कमतरता, व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता, यकृताचे विकार, थायरॉईड, कर्करोग, दाहक आतड्यांचा आजार, मूत्रपिंडाचे आजर,अशा अनेक कारणामुळे अशक्तपणा उद्भवू शकतो.

**अशक्तपणा या विकारावर कोणते उपचार आहेत?**

■ अनेकदा शारीरिक अशक्तपणा हा शरीरातील विशिष्ट घटकांच्या कमतरतेमुळे येऊ शकतो. शरीरात लोहाची कमतरता असेल तर पूरक कॅप्सुल किंवा गोळ्या देऊन हि कमतरता भरून काढता येते. आपल्या शरीरातील लाल रक्तपेशींची कमतरता भरून काढण्यासाठी व्हिटॅमिन बी ९ हे जीवनस्तव आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी १२ देखील तितकेच पूरक आहे.

शारीरिक अशक्तपणासाठी एरिथ्रोप्रोएटिन, इमिनोसप्रेसनंट्स,हि औषध डॉक्टर लिहून देतात. मात्र या सर्व औषधोपचारा बरोबरच आपला आहार जर पूरक आणि परिपूर्ण असेल म्हणजे त्यामध्ये कडधान्य,पालेभाजा,फळभाजा, दुग्धजन्य पदार्थ यांचा पूरक समावेश असेल तर आपल्याला अशक्तपणा हा विकार होणार नाही.

■ ■ ■



# ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस आजाराने त्रस्त मुलीवर यशस्वी उपचार

नोएडातील १५ वर्षीय आद्या ही तिची १० वीची बोर्ड परीक्षा संपली तेव्हा तिला ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस असल्याचे निदान झाले, ज्यामध्ये पाठीचा कणा असामान्यपणे वळतो.

हे निदान धक्कादायक होते, कारण उपचार न केल्यास या आजारामुळे दीर्घकालीन शारीरिक समस्या उद्भवू शकतात.आद्या हिने फरीदाबाद येथील रुग्णालयात पाठीच्या कण्यातील सुधारणा शस्त्रक्रिया केली. या प्रक्रियेत सुरक्षितता आणि अचूकता सुनिश्चित करण्यासाठी प्रगत साधने आणि तंत्रांचा समावेश होता. तिला पाच दिवसांतच डिस्चार्ज देण्यात आला आणि शस्त्रक्रियेनंतर फक्त तीन आठवड्यांनी ती शाळेत परतली. त्यानंतर तिने तिचे नियमित वर्ग पुन्हा सुरू केले आहेत.

जेव्हा आद्या आमच्याकडे आली तेव्हा तिच्या पाठीच्या कण्यातील वक्रता जवळजवळ ५० अंशांपर्यंत पोहोचली होती, शस्त्रक्रियेच्या मर्यादेपलीकडे. ही विकृती केवळ सौंदर्य प्रसाधनात्मक नव्हती; उपचार न केल्यास ती फुफ्फुस आणि हृदयाच्या कार्यावर परिणाम करू शकते, असे अमृता हॉस्पिटल फरीदाबाद येथील स्पाइन सर्जरीचे प्रमुख डॉ. तरुण सुरी म्हणाले.

बोर्ड परीक्षा आणि सामाजिक दबावांना तोंड देणाऱ्या एका तरुण मुलीसाठी, आम्हाला माहित होते की भावनिक दावे वैद्यकीय परीक्षांइतकेच उच्च आहेत. आमच्या टीमचे ध्येय केवळ क्लिनिकल उत्कृष्टताच नाही तर संपूर्ण पुनर्प्राप्ती प्रदान करणे होते.

स्कोलियोसिस १० पैकी १ मुलाला प्रभावित करते, तरीही ते अनेकदा दुर्लक्षित केले जाते. १० ते १५ वयोगटातील हे सर्वात सामान्य आहे. ■ ■

# आरोग्यवर्धक खजूर



खजूर आपल्या शरीरासाठी उष्ण ठरतो असा अनेकांना समज आहे. पण खजूर हा केवळ तुमच्या हृदयासाठीच नाही तर मानसिक फिटनेससाठीही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

आयुवेर्दापासून खजूराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. भिजलेले खजूर खाण्याचे आरोग्यदायी फायदे आहेत.

खजुरामध्ये गॅस्ट्रोइंटेस्टाईन संक्रमण संतुलित करणारे गुण असतात. तसंच यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असल्यामुळे बद्धकोष्ठता सुधारण्यासाठी खजुराचा फायदा करून घेता येतो. रोज ३५ ग्रॅम फायबर खाल्ल्याने शौचाला स्वच्छ होते, पोटासंबंधित कॅन्सर रोखण्यासाठीही याचा उपयोग होतो. हृदयाच्या आरोग्यात सुधारणा आणण्यासाठी तुम्ही दिवसभरात मुठ्ठीभर खजुराचे सेवन करू शकता. खजुरातील असणारे अँटीऑक्सिडंट गुण हे आर्टरी सेल्समधून कोलेस्ट्रॉल घालविण्यास मदत करतात. खजूर रक्तदाबाचा स्तर नियंत्रित करण्यासाठी फायदेशीर ठरतात. कारण यामध्ये पोटॅशियम आणि मिनरल्स अधिक प्रमाणात आढळतात. साधारणतः २४ ग्रॅम मेडजूल खजुरामध्ये १६७ मिलिग्रॅम पोटॅशियम असतात. अन्य फळांच्या तुलनेत हे अधिक असून शरीरातील पोटॅशियमचे प्रमाण यातून अधिक संतुलित राहते.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

महासागर
नागपूर वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १, जुलै २०२५ ■

# जमीनीवर पडलेला वीजेच्या जीवंत तारांच्या स्पर्शाने युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ३० :



तालुक्यातील प.ह. क्रं. 51 मधील पंचधार येथील शेत सर्वे क्रमांक 252चे शेतकरी अमित तामनोजी जगताप यांचे शेतावर फसाटी साठी शेतमजुरीला गेलेल्या गौरव खुशाल निशाने (18) रा. पंचधार याचा रवीवार 29जून रोजी दुपारी 4.30 चे वाजताचे दरम्यान शेताचे धूऱ्यावर (जमीनवर) पडलेल्या जीवंत वीज ताराला स्पर्श झाल्याने मृत्यू झाल्याची तक्रार रात्री उशिरा दहा वाजताचे दरम्यान मृतकाचे मोठे वडिल श्रावण माणिकराव निशाने यांनी कोंढाळी पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आली.

या प्रकरणी तक्रार दाखल होताच कोंढाळी पोलीस स्टेशनचे ऑन डिवटी पोलीस उपनिरीक्षक धवल देशमुख आपल्या स्टाफसह घटना स्थळी पोहचले. मृतकाचा घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह शव विच्छेदनासाठी काटोल येथे ग्रामीण रूग्णालयात पाठविला आहे. या प्रकरणी पंचधार येथील शेतकरी अमित तमनोजी जगताप यांचे शेतात फसाट करत असतांना शेताचे धुऱ्यावर पडलेल्या जीवंत प्रवाहित वीजेच्या तारांचे स्पर्शाने गंभीर अवस्थेत पडलेल्या गौरव निशाने याला याच शेतात काम करणारे सहकार्याने कचारी सावंगा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेण्यात आले.

येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गौरव खुशाल निशाने याला काटोल ग्रामीण रूग्णालय येथे रेफर केले. गौरव निशाने याला काटोल ग्रामीण रूग्णालय आणल्या वर ऑन डिवटी मेडिकल ऑफिसरांनी गौरव ला तपासले असता मृत घोषित केले. शेतकरी तामनोजी जगताप यांनी 27 जून रोजी या भागातील वीज रोहित्र तीन फेस फूल असल्याने त्यांचे शेतातील वीज पंप सुरू होत नसल्याची वीज उपकेंद्र येथील तक्रार नोंद वहित नोंदवली असल्याचे सांगण्यात आले आहे. मृतकाचे मोठे वडिल श्रावण माणिकराव निशाने यांनी कोंढाळी पोलीस स्टेशनला रात्री दहाचे सुमारास तक्रार नोंदवली आहे.

या प्रकरणी कोंढाळी वीज उपविभागीय अधिकारी प्रणव कुरेवार वीज अधिकारी यांचे सोबत भ्रमण ध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी सांगितले की घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर काही सांगता येईल. त्याचप्रमाणे शव विच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर काय ते स्पष्ट होईल या घटनेचा तपास कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक धवल देशमुख, ए एस आय राजकुमार कोल्हे व पोलीस स्टाफ करत आहेत.

# स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधात आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :



तत्कालीन उपमुख्यमंत्री व ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणूकीपूर्वी राज्यातील घरगुतीसह सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटल लावणार नसल्याची घोषणा केली होती. परंतु मुख्यमंत्री पदाची सूत्रे स्विकारल्यावर मात्र जबरन ग्राहकांकडे स्मार्ट मीटरचे नाव टीओडी मीटर करून सक्तीने लावले जात आहे. हे मीटर लावल्यास उग्र आंदोलनाचा इशारा देत संतप्त विदर्भ राज्य आंदोलन समितीने सोमवारी व्हेरायटी चौकात जोरदार निदर्शने केली. यावेळी मीटरचे पोस्टर जाळण्यात आले.

आंदोलकांनी सांगितले की, अदानी, मोंटोकार्लोसह इतरही खासगी उद्योजकांचे खिसे भरण्यासाठी सरकार जबरन ग्राहकांकडे हे महागडे मीटर बसवत आहे. हे मीटर खूप जास्त दराने खासगी कंपनीकडून लावण्याचे करार केले गेले असून त्याच्या बदल्यास सत्ताधाऱ्यांना विविध पद्धतीने लाभ मिळण्याची शक्यताही आंदोलकांनी वर्तवली.

दरम्यान नागपूरसह विदभार्तील सर्वच जिल्ह्यांत महावितरणच्या वीज ग्राहकांना पूर्व सुचना न देता जबरजस्तीने स्मार्ट प्रीपेड मीटर बसवले जात आहे. या मीटरला ग्राहकांसोबतच विदर्भ राज्य आंदोलन समितीचा विरोध आहे.

दरम्यान हे मीटर लावण्यासाठी त्याचे नाव बदलून टीओडी (टाईम ऑफ द डे) मीटर असे केले गेले आहे. विधानसभेत स्मार्ट प्रीपेड मीटल लावणार नसल्याची घोषणा असल्याने या मीटरचे वेगळे नामकरण केल्याचा आंदोलकांचा आरोप आहे. नागपूर जिल्ह्यात १४ लाखाहून जास्त ग्राहकांचे आधीच चांगले असलेले मीटर बदलवून त्या जागी स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याकरिता मोंटेकार्लो व जीनस कंपनीचे स्मार्ट मीटर अगोदरच डंप करून ठेवण्यात आले आहे. हे मीटर जबरन ग्राहकांकडे लावले जात आहे.

या मीटरच्या उपक्रमात उद्योगपतींची मोठी गुंतवणूक असून त्यांना आपला पैसा वसूल करून घ्यायचा आहे. त्याकरिता महावितरण कंपनीवर नियंत्रण ठेवत व आंदोलकांच्या आणि वीज ग्राहकांचे लक्ष या बाजूने लागू नये याकरिता वीज ग्राहकांना पूर्वसुचना न देता व विदाऊट कॅलीब्रेशन सटीर्फीकेशन व ओके टेस्टींग रीपोर्ट नसलेले स्मार्ट प्रीपेड मीटर हळुहळू बसविल्या जात असल्याचाही आंदोलकांचा आरोप आहे.

स्मार्ट मीटर रद्द करण्याचे नारे आंदोलकांनी सकाळी व्हेरायटी चौक परिसरात गोळा होऊन स्मार्ट प्रीपेड मीटर रद्द करा, रद्द करा, वीज दरवाढ मागे घ्या, दिल्लीत आहे वीज स्वस्त, विदर्भातील जनता वीज दरवाढीने त्रस्त, ऊजार्मंत्री मुर्दाबाद असे नारे लावले. दरम्यान आंदोलकांनी ग्राहकांकडे जोरजबरजस्तीने जर प्रीपेड मीटर बसवले गेल्यास आम्ही डंप केलेले प्रीपेड मीटर नष्ट करू.

प्रसंगी जेलमध्येही जाऊ असाही इशारा आंदोलकांकडून केला गेला. आंदोलनात विदर्भ राज्य आंदोलन समिती, समितीची युवा आघाडीसह इतरही काही संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महाल हिंसाचार

## एकाच वेळी ८० आरोपींना जामीन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

महाल परिसरात गत 17 मार्च रोजी उसळलेल्या हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी शेकडो लोकांविरुद्ध गुन्हा नोंदविला. 100 हून अधिक आरोपींना अटक केली होती. चार दिवसांपूर्वीच यातील 9 आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून जामीन मिळाला होता. आता उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधारावर सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए.आर.कुळकर्णी यांनी एकाच वेळी 80 आरोपींचा जामीन मंजूर केला आहे, मात्र या हिंसाचारामागील कथित मास्टरमाईंड मायनॉरिटी डेमोक्रेटिक पाटीर्चा शहराध्यक्ष फहीम खान याला यावेळीही दिलासा मिळाला नाही. एकाच वेळी इतक्या आरोपींना एकाच प्रकरणात जामीन मिळण्याचे हे पहिलेच प्रकरण असल्याची चर्चा सोमवारी दिवसभर न्यायालय परिसरात होती.

सत्र न्यायालयातून दिलासा न मिळाल्याने मोहम्मद राहिल जाकीर खानसह 8 आरोपींनी उच्च न्यायालयात अपील केली होती. या सर्वांना गत शुक्रवारी उच्च न्यायालयातून जामीन मिळाला. त्यानंतर मोहम्मद हारिश मोहम्मद इस्माईल, मोहम्मद शाहनवाज शेख, मोहम्मद युसूफ शेख, नसीम सलीम शेख आणि इतर 76 आरोपींनी त्यांच्या वकिलांमार्फत सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. फहीम खानसह अनेक आरोपींविरुद्ध वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत.

बचावपक्षाने न्यायालयाला सांगितले की, पोलिसांनी कोणताही सबळ पुरावा नसताना देखील त्यांना अटक केली. केवळ गोपनिय माहितीच्या आधारावर ही कारवाई करण्यात आली. याचिकाकर्ता, मुख्य आरोपी फहीम खानच्या सनी यूथ फोर्स व्हॉट्सॲप ग्रूपचे सदस्यही नव्हते. ओळख परेडमध्येही त्यांची ओळख पटली नाही. त्यामुळे त्यांना जामीन मिळाला पाहिजे. या प्रकरणात इतर आरोपींना उच्च न्यायालयातून जामीन मिळाला आहे. त्यामुळे याचिकाकर्त्यांनाही जामीन मिळण्याचा अधिकार आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सोमवारी 80 आरोपींना सशर्त जामीनावर सोडण्याचे आदेश दिले.

सर्व आरोपींना 1 लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यांना आठवड्यातून दोनदा पोलिस ठाण्यात हजेरी लावावी लागेल. आरोपी कोणत्याही प्रकारे तपास प्रभावित करणार नाहीत आणि तपासात पूर्ण सहकार्य करतील. एकाच वेळी वेगवेगळ्या याचिकांवर जामीन मंजूर झाल्याच्या आदेशाची प्रत उपलब्ध होऊ शकली नाही. आरोपी फहीम खानच्या जामीनावर 4 जुलै रोजी सुनावणी होणे अपेक्षित आहे. बचावपक्षातर्फे ॲड. आसिफ कुरेशी, रफीक अकबानी, अश्विन इंगोले, रमेश रावलानी, अतुल रावलानी आदींनी बाजू मांडली, तर जिल्हा सरकारी वकील नितीन तेलगोटे यांनी सरकारची बाजू मांडली.

# अंमली पदार्थासह गुंडाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

तहसील पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका गुंडाला सापळा रचून अंमली पदार्थासह अटक केली. लखन शैलेष धुरिया (30) रा. पिवळी मारबत चौक, जागनाथ बुधवारी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पिवळी मारबत चौकाजवळ एका युवक अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची माहिती तहसील पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिस पथकाने घटनास्थळी पोहोचून लखनला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ 8.11 ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज (एमडी) मिळाले. पोलिसांनी एमडी आणि मोबाईल जप्त करून लखनला अटक केली. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

आता पोलिस त्याला माल देणाऱ्याचा शोध घेत आहेत. लखनविरुद्ध आर्म्स ॲक्ट, खंडणी वसुलीसह गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. लखनचा भाऊ राम धुरिया हा सुद्धा गुन्हेगार होता. त्याचे अनेकांशी वैर होते. सप्टेंबर 2018 मध्ये विरोधी टोळीने रामचा खून केला होता. त्यानंतर लखन गुन्हेगारीत सक्रीय झाला. न्यायालयाने त्याला 2 जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ही कारवाई वपोनि शुभांगी देशमुख आणि पोनि राहुल वाढवे यांच्या नेतृत्वात पोउपनि रसूल शेख, सफौ राजेश ठाकुर, पोहवा रामकैलाश यादव, नजीर शेख आणि फिरोख खान यांनी केली.

# उमरेड विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय मेश्राम

## यांच्या तालिका अध्यक्ष पदावरील निवडीने मतदासंघांत उत्साह

■ महासागर प्रतिनिधी, उमरेड, दि. ३० :



उमरेड विधान सभेचे आमदार श्री संजय मेश्राम यांचे राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान पहिल्याच दिवशी तालिका अध्यक्षपदी निवड झाली आहे.

आपण पहिल्यांदा पाहूया की तालिका अध्यक्ष म्हणजे नेमके काय पद आहे? तलिका अध्यक्ष पदाची तरतूद कलम 180(2) नुसार निश्चित करण्यात आलेली आहे. सभागृहाचे अध्यक्ष हे वेळोवेळी नेमलेल्या सदस्यांची एक तालिका बनवतात. आता सध्या नव सदस्यांची तालिका बनविण्यात आलेली आहे. सभागृहाचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष सभागृहाच्या बैठकीसाठी अनुपस्थित असतील त्यावेळेस या तलिकेतील एका सदस्य बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितो. तालिका अध्यक्षास कार्याध्यक्ष म्हणूनही संबोधले जाते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचे इतकेच या तालिका अध्यक्षांनाही अधिकार असतात. तालिका अध्यक्षांनी दिलेला अधिनिर्णय अंतिम असतो व तो बंधनकारक असतो. आमदार संजय मेश्राम यांच्या तालिका अध्यक्ष या पदावरील निवडीने उमरेड मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे. पहिल्यांदाच महाराष्ट्र विधानसभेत निवडून गेलेले आमदार संजय मेश्राम यांना तालिका अध्यक्ष पदाचा मान मिळाला आहे, त्यांच्या 6 महिन्याच्या कार्यकाळात केलेले काम पाहून विधानमंडळाने त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे.विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी विधानसभा अध्यक्षांची तालिका अध्यक्ष म्हणून 9 जणांची निवड केल्याची घोषणा आज सकाळी सभागृह सुरू झाल्यानंतर करण्यात आली.

यामध्ये आमदार संजय मेश्राम यांच्या माध्यमातून काँग्रेसच्या एका आमदाराची वर्णी लावण्यात आली आहे. उमरेड मतदारसंघातून 2024 मध्ये झालेल्या निवडणुकीत आमदार संजय मेश्राम निवडून आले आहेत. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधिमंडळाकडून त्यांना बढती मिळाली असून विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदावर संधी देण्यात आली आहे.

# प्रयोगशील शेती पुरस्कार

## कांचन गडकरी यांना होणार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

वसंतराव नाईक प्रतिष्ठान आणि वनराई फाउंडेशनच्या संयुक्त वतीने आज १ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता एनरीको हाइट्स कन्व्हेन्शन हॉल, हॉटेल रेडिसन ब्लू शेजारी, वर्धा रोड येथे प्रयोगशील शेती पुरस्कार 2025 वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यंदा कांचन गडकरी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून रोख ३० हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कांचन गडकरी यांनी मागील २६ वर्षांपासून धापेवाडा येथील त्यांच्या शेतात पारंपरिक पद्धतींच्या जोडीने विविध आधुनिक प्रयोग करत शेती उत्पादनात लक्षणीय वाढ साधली आहे.

हा पुरस्कार ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. सी. डी. मायी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरदराव गडाख यांच्यासह माजी आमदार व वसंतराव नाईक प्रतिठानचे अध्यक्ष ॲड. निलय नाईक, सचिव प्रगती पाटील यांची प्रमुख उपस्थित राहील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी राहतील. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पर्यावरण तज्ज्ञ डॉ. अजय पाटील यांनी केले आहे.

# 3.3५ लाखांच्या मालावर हातसाफ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

गोरेवाडा मार्गावरील सद्गुरू शरण कोऑपरेटिव्ह सोसायटीत चोरांनी दोन घरांचे कुलूप तोडून 3 लाख 35 हजार रुपये किंमतीच्या मालावर हातसाफ केला. या घटनेने सोसायटीत एकच खळबळ उडाली आहे. मानकापूर पोलिसांनी संपतलाल पतिराम मोहोबिया (54) यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

मोहोबिया कुटुंब गत शुक्रवारी घराला कुलूप लावून शिर्डी आणि शनी शिंगनापूर येथे दर्शनासाठी गेले होते. या दरम्यान चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 20 हजार आणि सोन्याचांदीचे दागिन्यांसह 2.85 लाख रुपयांचा माल चोरी केला. त्यानंतर आरोपींनी परिसरातच राहणाऱ्या प्रशांत हरीभाऊ गोडबोले (50) यांच्या घराकडे मोर्चा वळवला. गोडबोले कुटुंबही शहरातून बाहेर गेले होते. चोरांनी कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील 50 हजार रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले.



नागपूर : विश्रांतीनंतर पावसाने आता आपले रूप दाखवणे सुरू केले आहे. आज सोमवारी पावसाने नागपूरकरांना चांगलेच झोडपून काढले. संततधार पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचले होते. वाहनधारकांची मात्र तारांबळ उडाली .

# महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये पर्यावरणस्नेहींनी गाठला ५ लाखांचा टप्पा

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये 5 लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवार (दि. 30)पर्यंत सहभागी झालेल्या 5 लाख 3 हजार 795 वीजग्राहकांना 6 कोटी 4 लाख 55 हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

वार्षिक 120 रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात 10 रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक 120 रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील 12 महिन्यांची म्हणजे 120 रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी 10 रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

पर्यावरणस्नेही 5 लाख ग्राहकांचा प्रतिसाद - वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत 5 लाख 3 हजार 795 पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना 6 कोटी 4 लाख 55 हजार 400 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक 2 लाख 1 हजार 233 (2.42 कोटी), कोकण- 1 लाख 13 हजार 254(1.36 कोटी), उत्तर महाराष्ट्र- 70 हजार 226 (84.27 लाख), विदर्भ- 63 हजार 731 (76.47 लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी 55 हजार 351 वीजग्राहकांना 66 लाख 42 हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील 11 महिन्यांचे असे एकूण 12 महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

## समाजमाध्यमातून ओळखी आणि प्रेम यातून बेपत्ता महिलांचे प्रमाण ७० टक्के

# मिसिंग मॅन सुधीर खुबाळकर यांचा दावा

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. ३० :



17 मे 2023 पासून मिसिंग डिपार्टमेंटचे काम सांभाळणारे मिसिंग मॅन म्हणून प्रसिद्ध असणारे पोलिस हवालदार सुधीर खुबाळकर यांनी दोन वर्षांत 200 च्यावर बेपत्ता पुरुष, वृद्ध, अल्पवयीन मुले, मुली व महिलांना यशस्वीरित्या शोधून त्यांच्या परिवाराला सुपूर्त केले आहे. या बेपत्ता झालेल्यांमध्ये 70 टक्के प्रमाण हे इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप, स्नॅपचॅट यासारख्या समाजमाध्यमातून झालेली ओळखी व प्रेम यातून बेपत्ता झालेल्या महिला, अल्पवयीन व युवतींचे आहे.

पोलिस खात्यात 33 वर्षांपासून सेवा देणारे पोलीस हवालदार सुधीर खुबा ळकर 17 मे 2023 पासून मिसिंग डिपार्टमेंट सांभाळत आहेत. सध्या ते सक्करदरा पोलिस ठाण्यात कार्यरत असून 200 च्या वर बेपत्ता महिला व पुरुषांना यशस्वीरित्या शोधून काढले आहे. त्यांच्या या कायार्मुळे ते मिसिंग मॅन म्हणून नावलौकिकास आले. या तक्रारींमध्ये अध्यार्पेक्षा जास्त तक्रारी या महिलांच्या बेपत्ता होण्याच्या आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट यासारख्या समाजमाध्यमातून युवक व युवतींची ओळखी होते. केवळ दोन ते तीन महिन्यांच्या मैत्रीतून, समाज माध्यमावरील भ्रामक स्वप्नांकडे आकर्षित होऊन अल्पवयीन मुली, युवती, विवाहित महिला या आपला फुललेला संसार सोडायला तयार होतात. अशा वागणुकीचा आपल्या परिवारावर काय परिणाम होईल?, आपल्या मुलांचे भविष्य धोक्यात येईल, सामाजिक प्रतिमा पुसली जाणार याचा काहीही विचार न करता अनैतिक पाऊले उचलण्यास महिला तयार होताना दिसतात.

ते सांगतात की नुकतीच पोलिस ठाणे सक्करदरा येथे 29 वर्षीय महिला बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या पतीने नोंदवली. ही महिला आपल्या तीन वर्षीय मुलासह बेपत्ता होती. तिच्या मोबाईलचे लोकेशन ट्रेस केले असता बुलढाणा जिल्ह्यातील लोकेशन मिळाले. त्यानुसार खुबाळकर तत्काळ तेथे पोहोचले आणि त्यांचा शोध घेतला असता ती एका बेरोजगार युवकासोबत आढळली .त्यांच्या चौकशीतून ते लग्न करणार असल्याचे पुढे आले. या दोघांचे समुपदेशन केल्यानंतर ती महिला आपल्या पतीकडे परत गेली. आपला मुलगा व पत्नी परत मिळाल्याचा आनंद पतीच्या चेहऱ्यावर दिसून आला. अशा अल्पवयीन, युवती, महिला यांचे तसेच लहान मुले, पुरुष, वृद्ध यांचे समुपदेशन करून त्यांच्या परिवाराला मिळवून देण्यात ते निष्णात आहेत. तक्रारी आल्यानंतर त्यांच्या मोबाईलचे लोकेशन ट्रेस झाले की देशाच्या कानाकोपऱ्यात, विविध राज्यात जावे लागले तरी ते तत्काळ ट्रेन पकडतात आणि निघतात.कधी उभे राहून, कधी दोन बर्थच्यामध्ये झोपून कधी उपाशी राहून ते प्रवास करतात. याशिवाय लागणारा खर्च ते आपल्या खिशातून करतात. आतापर्यंत त्यांनी अलाहाबाद, आग्रा, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, कोल्हापूर, दिल्ली, वर्धा, मनमाड यासारख्या अनेक ठिकाणांहून बेपत्ता झालेल्यांना शोधून काढले आहे.

म्हणूनच ते मिसिंग मॅन, देवदूत या नावानी प्रसिद्ध आहेत. परिवाराच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद यातच माज्या कामाचे समाधान आहे. त्यांच्या या कामासाठी त्यांना पोलिस महासंचालक सन्मान चिन्ह, पोलिस आयुक्तांकडून अवॉर्ड व अनेक संस्थांकडून ते सन्मानित झाले आहेत. वृत्तपत्राच्या माध्यमातून ते सांगू इच्छितात की समाज माध्यमांवरील विश्व हे आभासी आणि क्षणिक आहे. काल्पनिक विश्व आणि सत्य यातील फरक महिलांनी ओळखावा व भ्रामक विश्वात अडकू नये.

# पीएम श्री प्राथमिक शाळा कोंढाळीच्या मैदानाची दुरावस्था

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ३० :



शाळांना आधुनिक बनवण्यासाठी प्रधानमंत्री श्री शाळा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विकसित झालेल्या शाळा सामान्य शाळांपेक्षा वेगळ्या असणार आहेत. असे सांगितले जाते. मात्र कोंढाळी येथील पी एम श्री प्राथमिक शाळा कोंढाळी च्या मैदानाचे दुरूस्ती काम करणाऱ्या ठेकेदाराकडून मैदानाची दुरुस्ती ऐवजी मैदानाची दुरावस्था केल्याची घटना घडली आहे.

पी एम श्री प्राथमिक शाळा कोंढाळी चे खेळाचे मैदानाची दुरुस्ती ऐवजी मैदानाची दुरावस्था खड्डेमय झाल्याचे चित्र दिसत आहे. शिक्षण हा प्रत्येकाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सुशिक्षित व्यक्ती देशाला चांगले आणि मजबूत बनवण्यात योगदान देते. भारतात सरकारी शाळांमध्ये शिकणारी अनेक मुले आहेत. सरकारी शाळांमध्ये गरीब श्रीमंत असा कोणतही भेदभाव न करता सर्वांनाच शिक्षण दिले जाते. याच सरकारी शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी मोदी सरकारने एक विशेष योजना आणली आहे. भारतात अशा अनेक शाळा आहेत ज्या अनेक वर्षांपूर्वी बांधल्या गेल्या आहेत. याच शाळांना आधुनिक बनवण्यासाठी मोदी सरकारने प्रधानमंत्री श्री शाळा योजना सुरू केली आहे.पंतप्रधान श्री शाळा योजनेमधून विकसित झालेल्या शाळा इतर सामान्य शाळांपेक्षा वेगळ्या असणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील काटोल तालूक्याच्या कोंढाळी येथील पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढाळी चे खळाचे मैदान दुरुस्ती ऐवजी पी एम श्री योजना अंतर्गत बांधकाम करणारे कत्रांटदाराने येथील मैदानाच्या सपाटीकरण करण्या ऐवजी मैदानाचे खोदकाम केल्याने या मैदानावर पावसाचे पाणी साचत असल्याने प्राथमिक शाळेतील लहान लहान विद्यार्थी/विद्यार्थ्यांनी चिखल युक्त पावसाचे पाण्यात पडत असल्याच्या घटना घडत आहेत. अशी माहिती येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय खुटाफळे, तथा शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य स्वप्निल व्यास,संजय राऊत यांनी माहिती दिली आहे.

भारत सरकारने सन 2022 मध्ये एक योजना सुरू केली होती. या योजनेचे नाव पीएम श्री म्हणजेच पीएम स्कूल फॉर रायझिंग इंडिया असे होते. पीएम श्री स्कूल योजना म्हणून ही योजना ओळखली जाते. या योजनेअंतर्गतच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 राबविण्यात येणार आहे. पीएम श्री स्कूल योजनेंतर्गत काही शाळा विकसित करण्याचे काम केंद्र सरकार कडून करण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या शाळांची दुरूस्ती करणे सुरू आहे. यात पायाभूत व मुलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. मात्र कोंढाळी येथील पी एम श्री प्राथमिक शाळे च्या मैदानाचे खेळाचे मैदान दुरुस्ती करणार्या कत्रांटदाराने येथील मैदानाच्या सपाटीकरण करण्या ऐवजी मैदानाचे खोदकाम केल्याने या मैदानाचे तीन तेरा वाजण्याची दुरावस्था करण्यात आली आहे.

पीएम श्री स्कूल योजनेंतर्गत बांधल्या जाणाऱ्या शाळांमध्ये ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळणार आहे. मात्र येथील मैदानाच्या सपाटीकरण करण्या कत्रांटदाराने शाळेच्या मुख्याध्यापिक किंवा शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांना कहीही,कसलीही माहिती न देता कोंढाळी येथील पी एम श्री प्राथमिक शाळा कोंढाळीचे मैदान उखरु ठेवले आहे. या प्रकरणी येथील मैदान दुरुस्ती करणारे यंत्रणा कुठली? काम करणारे कत्रांटदार कोण? या बाबतीत येथील शाळा मुख्याध्यापक यांना विचारले असता त्यांनी सांगितले की मैदानाचे बांधकाम कंत्राटदाराला प्रांकलना बाबद विचारले असता त्यांनी कुठलीच माहिती दिली नाही किंवा येथील मैदान दुरुस्ती करणारी यंत्रणा कोण या बाबतीत काहीही सांगितले नाही. अशी माहिती मुख्याध्यापक रजनी मानकर यांनी दिली.

# हिंदी सक्तीचा शिवसेनेचा जाहीर विरोध अध्यादेशाची प्रत जाळून निषेध



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

राज्य सरकारने शालेय शिक्षणात इयत्ता पहिल्यापासून हिंदी भाषा सक्तीने शिकवण्याचा घेतलेला निर्णय हा मराठी अस्मितेला धोका देणारा असल्याचा आरोप करत, शिवसेनेच्या हिंगणा विधानसभा विभागातर्फे जोरदार निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर जमलेल्या शिवसैनिकांनी हिंदी सक्तीच्या अध्यादेशाच्या प्रतीची होळी करत संताप व्यक्त केला.

"हिंदी - मराठी भाई-भाई, पण हिंदीची सक्ती जमणार नाही", "मराठी माणसाच्या काळजावर हिंदीची सक्ती करणाऱ्यांचा निषेध असो", अशा घोषणा देत संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या आंदोलनाद्वारे मराठी भाषेच्या अवमूल्यनाचा प्रयत्न करणाऱ्या शासनाचा निषेध करण्यात आला. हिंदीला प्राधान्य देताना मराठी भाषेचा अपमान होतो आहे, अशा भावना शिवसैनिकांनी व्यक्त केल्या. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलनात राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारच्या विरोधातही घोषणा देण्यात आल्या.

या निषेध आंदोलनाचे आयोजन उपजिल्हा प्रमुख मधू माणके पाटील यांनी केले होते. यावेळी जिल्हा प्रमुख उत्तम कापसे, जिल्हा समन्वयक रविंद्र जोडागंडे, हिंगणा तालुका प्रमुख विष्णू कोल्हे, नागपूर तालुका प्रमुख तुषार डेरकर, युवासेना जिल्हाधिकारी आकाश इंगोले, उपतालुका प्रमुख रुपेश झाडे तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात होऊ घातलेल्या पावसाने भाजीचे भाव कडाडले



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

शहरात कळमना मार्केट, कॉटन मार्केट येथे ठोक भावात विकला जाणारा भाजीपाला नाशिक, सातारा, हैदराबाद, दिल्ली येथून येतो. येथे होत असलेल्या मुसळधार पावसामुळे भाज्यांचे भाव कडाडले आहेत.

गेल्या एका महिन्याच्या तुलनेत किलोमागे 20 ते 30 रुपयांनी भाव वाढले आहेत. बाजारात आलेले काटवल सर्वाधिक शंभर रुपये प्रमाणे तर गवाराच्या शेंगा 160 रुपये किलोने विकल्या जात आहे.

**भाज्यांचे किलोमागे भाव**

| | |
|---|---|
| काटवल | 400 |
| पत्ता कोबी | 50 |
| फुलकोबी | 100 |
| भेंडी | 80 |
| टमाटर | 40 |
| ढेमस | 100 |
| तोंडळे | 100 |
| चवळीच्या शेंगा | 120 |
| गवार शेंगा | 160 |
| वांगे | 60 |
| सांबार | 160 |
| मिरची | 100 |
| काकडी | 50 |
| गाजर | 50 |

# हुडकेश्वर (खुर्द ) ग्रामपंचायतमध्ये विकास कामाचे भुमीपुजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :



हुडकेश्वर (खुर्द ) गट ग्रामपंचायतमधील हुडकेश्वर ( खुर्द), किरणापूर, धामणा, कन्हाळगावात विकास कामाचे भुमीपुजन पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्या हस्ते शनिवार २८ जुन रोजी करण्यात आले.

यावेळी १० लाख रुपयाचे हुडकेश्वर खुर्द येथील श्री. पवार ते श्री गडीकर यांच्या घरापर्यंत खडीकरण रस्ता, १० लाख रुपयाचे धामणा येथील श्री. हटवार ते श्री. पाटील यांच्या घरापर्यंत खडीकरण रस्ता, १० लाख रुपयाचे किरणापूर येथील सभा मंडप परीसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे, १० लाख रुपयाचे कन्हाळगाव येथे वाढीव वस्तीमध्ये खडीकरण रस्ता बांधकाम करणे, १० लाख रुपयाचे हुडकेश्वर खुर्द मधील रमाई कॉलनी येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ६ लक्ष रुपयाचे अनुसुचित जाती व नवबौदध घटक वस्तीचा विकास करणे आदीचे भुमीपुजन करण्यात आले. पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रलंबित मागण्या समजून घेऊन निवेदने स्वीकारली व त्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, निवडणूक प्रमुख अजय बोढारे, माजी जि. प.सदस्य रूपराव शिंगणे,सुभाष गुजरकर, शुभांगी गायधने, तालुका मंडळ अध्यक्ष पप्पू राऊत, बाळू घोडमारे, माजी तालुका अध्यक्ष सुनील कोडे, श्री फाउंडेशनचे संस्थापक संकेत बावनकुळे, हुडकेश्वर (खुर्द ) गट ग्रामपंचायतचे सरपंच मीनाताई शेंडे, उपसरपंच शुभम हटवार, माजी सरपंच कमलाकर शेंडे,ग्रा. पं. सदस्य कुणाल कानफाडे,सचिन घोडे, कोमल परतेकी, मंगला भगत, शुभम पारसे, अर्चना बुरबरे, शारदा काष्टे, चंद्रकांत सोनेवाने, गणेश आगलावे, अजय भगत उपस्थित होते.

# कमाईपेक्षा खर्च वाढल्याने एसटीची माल वाहतूक बंद होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३० :

एसटी महामंडळाची कमाईपेक्षा खर्च वाढल्याने आता राज्य परिवहन महामंडळाची माल वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या गणेशपेठ येथील एसटीची माल वाहतूक लवकरच बंद होणार असल्याने नागरिकांना आपला माल इतर वाहनातून पाठवावा लागणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या महसूल वाढीसाठी माल वाहतूक सेवा सुरु करण्यात आली होती. मात्र गत पाच महिन्यांत केवळ लाख रुपयांचे उत्पन्न माल वाहतूकीतून मिळाले आहे. एकंदरीत या व्यवहारात खर्च अधिक असल्याने एसटी महामंडळाने माल वाहतूक सेवा इतिहासजमा करण्याचा निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळाच्या नियमांमध्ये प्रवासी वाहतुकीसह मालवाहतूक करण्याचा समावेश आहे. याचा आधार घेत २०१९ मध्ये मालवाहतूक सुरू करण्याबाबत चाचपणी सुरू करण्यात आली. आठ वर्षे पूर्ण झालेल्या प्रवासी बसचे मालवाहतूक ट्रकमध्ये रूपांतर करण्यात आले होते. गेल्या आर्थिक वर्षात एसटी मालवाहतुकीची अत्यंत वाईट स्थिती होती. एप्रिल २०२४ ते मे २०२५ या कालावधीत एप्रिल आणि मे महिना वगळता अन्य महिन्यात एक कोटींचा टप्पाही मालवाहतुकीला ओलांडता आला नाही.

# बहादुरा नगर पालिका प्रशासनाने फलक लावला

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३० :

नगर पंचायत बहादुरा क्षेत्रातील रिकाम्या भूखंडांवर स्वच्छता आणि जनहित लक्षात घेऊन नगर पंचायत प्रशासनाने संबंधित भूखंडधारकांना रिकाम्या भूखंड भरण्यासाठी वारंवार कळवले. मुनादीही करण्यात आली. परंतु नागरिकांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने नगर पंचायत प्रशासनाने मोहीम राबवली. यावेळी रिकाम्या भूखंडावर माहिती फलक लावून ७ दिवसांत भूखंड भरण्याचे आदेश देण्यात आले, अन्यथा जप्ती आणि प्रतिवर्षी १०,००० रुपये दंडाची कारवाई करण्याची सूचना देण्यात आली. दरम्यान, नगर पंचायतीचे प्रशासक राजेंद्र चिखलखुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, पाणीपुरवठा आणि स्वच्छता अभियंता यांनी केली.

श्रीकांत समर्थ, सहाय्यक कर व प्रशासकीय अधिकारी सहस कनार्ळे, शहर समन्वयक सुमित गव्हाळे, अजय भोयर, भास्कर नगरारे, रतिमान वानखेडे, वैभव भोयर यांनी मोहिमेत सहभाग घेतला. महाकाळकर लेआउट, श्रीराम नगर इत्यादी ठिकाणी ३५ ते ४० रिकाम्या भूखंड भरण्याबाबत माहिती फलक लावण्यात आले होते.

# राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विद्यार्थी व नागरिकांसोबत केले योगासन



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ३० :

दिनांक २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पतंजली योग समिती, रामटेक तर्फे गांधी चौक, रामटेक येथे व एकविरा मतिमंद मुलांचे बालगृह, काचुरवाही येथे योगासन केले. या उपक्रमात योगाचे विविध आसन, श्वणयतंत्रे करीत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी उपस्थिती लावून नागरिकांसोबत योगासन केले. योगाने कर्मात कुशलता आणि आयुष्यात समत्व निर्माण होते, हे या उपक्रमातून प्रकर्षाने जाणवले. त्यातून युवा पिढीने, विद्यार्थ्यांनी योगाभ्यास सुरू करणे ही काळाची गरज आहे. योगाच्या माध्यमातून आपण एक आरोग्यदायी, सशक्त समाज निर्माण करण्याचा संकल्प करुया, योग ही आपली परंपरा, आणि आनंददायी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

# ई-रिक्षा चोर गजाआड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ३० :

पाचपावली पोलिसांनी ठाण्यात नोंद ई-रिक्षा चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक केली. त्याच्याकडून ई-रिक्षा आणि चोरी दरम्यान वापरलेले वाहनही जप्त केले. विधांशू रुपेश रोकडे (20) रा. बाळाभाऊपेठ असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फियार्दी प्रदीप काजवे आणि आरोपी विधांशू एकाच परिसरात राहतात. गत बुधवारच्या रात्री प्रदीपने त्याची ई-रिक्षा घरासमोर पार्क केली होती. मध्यरात्रीला अज्ञात आरोपी त्याची रिक्षा चोरून फरार झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर प्रदीपने पाचपावली पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता परिसरातच राहणारा विधांशू रिक्षा चोरी करताना दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ई-रिक्षा आणि चोरी दरम्यान वापरलेली दुचाकी जप्त केली.

# व्हीएनआयटी आणि आयसीएआर-सीसीआरआय नागपूर यांच्यात सामंजस्य करार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. ३० :

विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर आणि आयसीएआर-सेंट्रल सिट्रस रिसर्च इन्स्टिट्यूट (सीसीआरआय), नागपूर यांच्यात औपचारिकपणे सामंजस्य करार करण्यात आला आहे.

यावेळी व्हीएनआयटीचे संचालक प्रा. प्रेमलाल पटेल आणि आयसीएआर-सीसीआरआयचे संचालक डॉ. दिलीप घोष यांनी, व्हीएनआयटीचे डीन, विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच आयसीएआर-सीसीआरआयचे शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ यांच्या उपस्थितीत, शुक्रवार दिनांक २७ जून रोजी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. ही शैक्षणिक भागीदारी संयुक्त संशोधन व विकास उपक्रम, तज्ज्ञ देवाणघेवाण, कार्यशाळा, परिषदा आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनासाठी एक भक्कम चौकट निर्माण करते. विविध वैज्ञानिक आणि अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये लिंबूवर्गीय पदार्थांचे नाविन्यपूर्ण अनुप्रयोग शोधणे आणि विकसित करणे हे या सहकार्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून, व्हीएनआयटी आणि सीसीआरआय संयुक्तपणे पदवीपूर्व (यूजी), पदव्युत्तर (पीजी) प्रकल्पांना आणि डॉक्टरेट संशोधन कायार्ला सक्रियपणे प्रोत्साहन देतील. सीसीआरआयच्या अनुभवी व वरिष्ठ शास्त्रज्ञांची उपस्थिती ही भागीदारी अधिक समृद्ध करत असून, उदयोन्मुख संशोधकांना मौल्यवान मार्गदर्शन आणि अंतर्दृष्टी मिळवून देते.

प्रा. प्रेमलाल पटेल यांनी आपल्या भाषणात व्हीएनआयटीच्या धातुकर्म आणि साहित्य अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. दिलीप आर. पेशवे आणि सामंजस्य कराराचे समन्वयक डॉ. अनिल कुमार यांच्या सक्रिय पुढाकाराचे कौतुक केले. त्यांनी कृषी नवकल्पनांना प्रगत साहित्य विज्ञानाशी जोडण्याचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.

# महात्मा गांधी इंग्लिश स्कूलचा श्रेहान जिवतोडे राज्यातून चौथा




■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ३० :

सन २०२४-२५ इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड स्पर्धा परिक्षा विद्यालय स्तरावर घेण्यात आली. या स्पर्धेत महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकूण ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून श्रेहान जिवतोडे चौथ्या स्थानी आला त्याला १२००/- शिष्यवृत्ती व मेडल देऊन त्याचे गौरव करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यालयातील पिहल कुंभारे आणि अनन्या वर्मा यांना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणुन मेडल देऊन गौरविण्यात आले. या योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता वाढून अभ्यासातील गुणवत्ता वाढीस लागली. शालेय स्तरावरून मिळणाऱ्या शिक्षणामुळे मुलांना भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी देखील मानसिक व शैक्षणिक तयारी करता येते. याच स्पर्धेत बेस्ट प्रेरणादायी शिक्षक म्हणून श्रद्धा इरटवार, शालिनी सहारे आणि किरण लांजेवार, शाळेचे विषयानुसार बेस्ट शिक्षक इंग्रजी नाजूका म्हैसकर, गणित रुची पांडे, विज्ञान माधुरी पवार, हिन्दी सविता पाटील तर मुख्याध्यापक धर्मेंद्र पारशीवणीकर यांना उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले तर शाळेला महाराष्ट्र स्तरावर गोल्डन अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

# तालुक्यातील निराधारांचे अडकले अनुदान डीबीटीच्या चक्रात

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ३० :



राज्य सरकारने वृद्ध निराधारांचे अनुदान डीबीटी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अंतर्गत लाभार्थ्यार्चे बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. तालुक्यातील पुष्कळशा लाभार्थ्यांनी आधार कार्ड मध्ये मोबाईल क्रमांक समाविष्ट न केल्यामुळे तसेच बँकेत केवायसी न केल्यामुळे त्यांचे अनुदान तूर्तास थांबविण्यात आले आहे.

गेल्या चार ते पाच महिन्यापासून अनुदान न मिळाल्यामुळे वृद्ध बँक व तहसील कार्यालयाच्या चकरा मारत असल्याचे चित्र दिसून येत आहे. निराधार यांना वृद्धपकाळात सन्मानाने जगता यावे यासाठी सरकारच्या वतीने संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा योजना या कल्याणकारी योजना मागील कित्येक वषार्पासून राबविल्या जातात. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दर महिन्याला पंधराशे रुपयाची अनुदान बँक खात्यात जमा केले जाते. पूर्वी हे अनुदान तहसील कार्यालयामार्फत चेक द्वारे बँकेत जमा करून त्याचे वितरण केले जात होत राज्य सरकारने डिसें २०२४ पासून वितरण प्रणालीत बदल करून अनुदान डीबीटी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला.

कळमेश्वर तालुक्यातील बहुतांश लाभार्थ्यांनी आधार कार्डशी मोबाईल नंबरची जोडणी केलेली नाही. तसेच बँकेत केवायसी न केल्यामुळे शासनाकडून होणारे डीबीटी पेमेंट होत नाहीत परिणामी या डीबीटीच्या चक्रात निराधारांचा पंधराशे रुपये आधार मिळणे कठीण झाले आहे. कळमेश्वर तालुक्यात १४हजार ९२५ लाभार्थी आहेत यामधील ज्या लाभार्थ्यांनी आधार कार्डशी मोबाईल नंबरची जोडणी बँकेत केवायसी तसेच तहसील कार्यालयात जाऊन डीबीटी करून घेतले असेल. अशा लाभार्थ्यांचे डीबीटी डीबीटी द्वारे अनुदान जमा होत आहे. परंतु ज्या लाभार्थ्यांनी आधार कार्डशी मोबाईल क्रमांक जोडणी बँकेत केवायसी तसेच तहसील कार्यालयात जाऊन डीबीटी करून घेतले नाही, असे लाभार्थी आधार केंद्र बँक तहसील कार्यालयात चकरा मारत असल्याचे चित्र कळमेश्वर शहरांमध्ये दिसून येत आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून अनुदान न मिळाल्यामुळे हातात पैसाच नसल्यामुळे जीवन कसे जगावे व औषधाचा खर्च कसा करावा हा प्रश्न लाभार्थ्यांसमोर उभा ठाकला आहे.

कळमेश्वर तहसील कार्यालयात डीबीटी करण्यासाठी आलेले लाभार्थी काही तांत्रिक अडचणी अभावी वापस जात आहेत. एकीकडे प्रशासनाकडून डीबीटी करण्यासाठी सक्ती केली जात आहे. परंतु डीबीटी करण्यासाठी तहसील कार्यालयात आलेले लाभार्थ्यांना. सर्वर डाऊन या तांत्रिक अडचणीमुळे वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. कळमेश्वर शहरातील गणपत कामडी या वृद्धाने आधार कार्डशी मोबाईल नंबर ची जोडणी बँकेची आधार कार्ड लिंक केलेले आहे तहसील कार्यालयात जाऊन डीबीटी सुद्धा करून घेतले. परंतु एन पी सी आय या ऑनलाइन सर्विस कडून त्यांचे प्रकरण पेंडिंग दाखवत असल्यामुळे गेल्या फरवरी २०२५ या महिन्यापासून हा लाभार्थी अनुदानापासून वंचित आहे व बँक तहसील कार्यालयाच्या चकरा मारत आहेत. गेल्या चार ते पाच महिन्यापासून अनुदान मिळाल्यामुळे डीबीटी करण्यासाठी कळमेश्वर तहसील कार्यालयात वृद्धांची गर्दी दिसून येत आहेत. परंतु तांत्रिक अडचणी मुळे वृद्धांची चांगलीच ससेहोलपट होत आहे. कळमेश्वर तहसील कार्यालयात. डीबीटी करण्यासाठी आलेले वृद्ध आल्या पाऊली परतत आहे. काही वृद्धांच्या मते आलेल्यांना येथील कर्मचाऱ्यांकडून योग्य माहिती न देता उद्धटपणाची वागणूक दिली जात असल्याची तक्रार अनेक नागरिक करतांना दिसते आहे.

# भारतीय जनता पक्षातर्फे सुर्वेनगर समाज भवन हॉल येथे शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातर्फे त्रिमूर्तीनगर भागामध्ये नवीन मतदार नोंदणी व यादीत दुरुस्ती करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भाऊ साहेब सुर्वेनगर हॉल व त्रिमूर्ती नगर चौक, त्रिमूर्ती नगर गाळेधारक ऑफिस येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात नविन मतदार नोंदणी व यादी दुरुस्ती तसेच लाडकी बहिण तक्रार निवारण, आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड याचे दोन दिवस शिबिर घेण्यात आले होते. दोन दिवस झालेल्या या शिबिराचा त्रिमूर्तीनगर परिसरातील नागरिकांनी भरपूर प्रमाणात लाभ घेतला. या दोन दिवसांत नागरिकांचे आभा कार्ड, आयुष्यमान कार्ड, नवीन मतदार फार्म व दुरुस्तीचे काम करुन देण्यात आले. त्रिमूर्तीनगर मंडळाचे अध्यक्ष ईश्वर ढेंगळे यांनी दोन दिवस झालेल्या शिबिराला भेट दिली.

या शिबिराला त्रिमूर्तीनगर प्रभाग ३६ क चे वार्ड अध्यक्ष मिलिंद भोंबे, माजी नगरसेवक लहूकुमार बेहते, महामंत्री लता सावरकर, किशोर लेकुरवाळे, दामोदर पोहूरकर, देवदत्त डेहनकर, मधुकरराव महल्ले, योगेश तोडते, जितेंद्र टिचकुले, बुथ अध्यक्ष सपना रोडी, वर्षा भोयर, माधुरी पडोळे, हर्षा आयचित, पुरुषोत्तम शेंडे, शिवकांत शर्मा तसेच मुख्यमंत्री कार्यालया कडुन आलेले मेहुल पराते या सर्व पदाधिकारनचे मोलाचे योगदान लाभले.

# आदिवासी गोवारी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पवनी येथे संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक दि. ३० :

आदिवासी गोवारी समाजातील दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पवनी येथील अपलोना गोंटूल या आदिवासी सभागृहात रविवार ला आदिवासी गोवारी (गोंड गोवारी) फाऊंडेशन रामटेक तर्फे आयोजित करण्यात आला होता.

विद्यार्थांनी जिद्द, चिकाटी,संयम, सहनशीलता व एकाग्रता ठेऊन यशाची पायरी चढता येथे.त्यात गरीब परिवारातील विद्यार्थी सुद्धा यशस्वी झाले आहेत.रडत बसण्यापेक्षा केव्हाही लढत राहणे आवश्यक आहे.एक ना एक दिवस आपण आपल्या कार्यात यशस्वी होऊ असे प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक ज्ञानेश्वर नेवारे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.यावेळी शिक्षक जीवन राऊत यांनी सुद्धा दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावर्षी बारावीतील प्रथम पारितोषिक क्षितिज वाघाडे,द्वितीय नम्रता मुर्खे,तृतीय आदित्य नेवारे यांना तर दहावी मधील गुणवंत विद्यार्थी मध्ये प्रथम क्रमांक लक्ष्मी नेवारे, द्वितीय क्रमांक चेतना चौधरी तर तृतीय क्रमांक क्रिश नेवारे यांना शिल्ड व



पुष्पगच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्याला शिवसेना उपजिलहाप्रमुख वर्धराज पिल्ले,आदिवासी गोवारी समाज संघटनेचे अध्यक्ष कैलाश राऊत,आदिवासी गोवारी(गोंड गोवारी) फाऊंडेशनचे अध्यक्ष भास्कर राऊत,आदिवासी वार्ताचे संपादक शेखर लसुंते,स्मारक समितीचे उपाध्यक्ष चिंतामण वाघाडे, ज्येष्ठ समाज सेवक प्रभाकर नेवारे, माजी नगरसेवक अनिल ठाकरे, बलधारी नेवारे, फागण नेवारे,आनंद शहारे,जगदीश शेंद्रे, रवी देव्हारे, मनोहर सोनवणे, सुखदेव शेंद्रे, उमेश राऊत, सतीश गाडे, ब्रम्हानंद नेवारे, रवींद्र कोहळे, सुनील नेवारे, सुरेश शेंद्रे, टेकलाल नेवारे, बाळु सोनवणे,राजू बाबा कवरे, कृष्णा सहारे,ममता राऊत, लक्ष्मी राऊत, लेखिका कोहळे सह विद्यार्थी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन आनंद शहारे व प्रास्ताविक जीवन राऊत तर आभार आदिवासी गोवारी (गोंड गोवारी) फाऊंडेशन, रामटेकचे सचिव नंदकिशोर कोहळे यांनी मानले.

# ४.६५ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

वाठोडा ठाण्यांतर्गत चोरांनी घरफोडी करून 4 लाख 65 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. या प्रकरणी पोलिसांनी ललिता दयाशंकर पाठक (65) रा. शैलेषनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 23 जून रोजी ललिता घराला कुलूप लावून कुटुंबासह पारडी येथे राहणाऱ्या मुलीकडे गेल्या होत्या.

या दरम्यान चोरांनी मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. लोखंडी कपाटातून रोख 12 हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 4.65 लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

मंगळवारी ललिता घरी परतल्यावर चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# श्रीक्षेत्र आंभोऱ्यात मायमराठी आषाढ कविसंमेलन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ३० :

विदर्भात प्रसिद्ध पाच नद्यांच्या संगमावर वसलेले श्री क्षेत्र आंभोरा देवस्थान परिसरात अवतीभवती वाहणाऱ्या पाच नद्या, आणि बरसणाऱ्या पाऊस सरींच्या साक्षीने वैनगंगा तिरावरील ब्रम्हगीरी पर्वतावर "माय मराठी नक्षत्र प्रतिष्ठान" चा आषाढ काव्य महोत्सव आणि स्मृतीशेष केशवराव मारोतकर काव्य पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.

प्रसंगी मंचावर अतिथी डॉ. भारती खापेकर, माजी प्राचार्य धनवटे नॅशनल कॉलेज आणि सुप्रसिद्ध कवी भगवंत शोभणे, आंभोरा देवस्थानचे प्रतिनिधी व साहित्यिक शरद शहारे, मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानच्या अध्यक्ष सुप्रसिध्द साहित्यिक विजया मारोतकर, सचिव मंगेश बावसे, कोषाध्यक्ष डॉ. माधव शोभणे उपस्थित होते. मराठी भाषेतील पहिला आद्यग्रंथ 'विवेकसिंधु' जो मुकुंदराजांनी शके ११८८ मध्ये



लिहिला गेला. या पुण्यभूमीवर सदर कार्यक्रमाच्या कल्पक आयोजना करिता 'मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठान' संस्थेचे आभार मानण्यात आले. "स्व. केशवराव मारोतकर स्मृती काव्य स्पर्धेचे हे चौदावे वर्ष असून, ही स्पर्धा दरवर्षी नागपूर व्यतिरिक्त लोणावळा, गोवा, आनंदवन, वरोरा व अन्य सुप्रसिद्ध ठिकाणी संपन्न झाली आहे. व प्रथमताच श्री क्षेत्र आंभोरा येथे पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

ही साहित्य क्षेत्रातील एक वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. राज्यस्तरीय, विदर्भस्तरीय, जिल्हास्तरीय आणि स्थानिक अशा विविध साहित्य संमेलनाचे दर्जेदार आयोजन करणे. मराठी साहित्यातील नामवंत साहित्यिकांचे मार्गदर्शन मिळवून देणे. विदर्भातील लेखकांना शोधून त्यांना मानाचं स्थान देणे हा मुळ उद्देश या उपक्रमाचा असून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा...". असे गौरोद्गार आषाढ कविसंमेलन अध्यक्ष सुप्रसिद्ध कवयित्री स्वाती सुरंगळीकर यांनी काढले.

# नागपूर गुजराती ब्राह्म समाज महिला मंडळाच्यावतीने संस्कार भारती रांगोळी कार्यशाळा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

श्री नागपूर गुजराती ब्राह्म समाज महिला मंडळाच्या वतीने एक सर्जनशील आणि समृद्ध संस्कार भारती रांगोळी कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या पारंपरिक भारतीय कला प्रकाराच्या माध्यमातून सृजनशीलता आणि सांस्कृतिक मूल्यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. या कार्यशाळेत सर्व वयोगटातील सहभागी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

ही कार्यशाळा अध्यक्ष श्रीमती किरण दवे आणि सचिव श्रीमती विभुती दवे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली, तर श्रीमती नूतन झा यांनी समन्वयक म्हणून उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली. प्रसिद्ध प्रशिक्षक दीपाली हरदास आणि राधा कवळे यांनी प्रशिक्षणाचे नेतृत्व केले. त्यांनी संस्कार भारती रांगोळीच्या बारकाव्यांसह तिचे सांस्कृतिक महत्त्व अतिशय प्रभावीपणे सहभागींपर्यंत पोहोचवले.

महिला मंडळाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले, कारण त्यांनी सुट्टीच्या काळात सर्व पिढ्यांना एक सर्जनशील व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

कार्यक्रमाची सांगता आयोजक, प्रशिक्षक आणि सर्व सहभागी यांचे मनःपूर्वक आभार मानून करण्यात आली, ज्यांच्या एकत्रित सहभाग आणि उत्साहामुळे ही कार्यशाळा अतिशय यशस्वी झाली.

# डब्ल्यूसीएलच्या प्रीतीने सायकलने ७०० किमीचा प्रवास केला पुर्ण

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३० :

जिद्द आणि कठोर परिश्रमाचे उदाहरण देत, डब्ल्यूसीएलच्या वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त) प्रीती निमजे यांनी सायकलने ७०० किमीचा प्रवास पूर्ण केला आहे. त्यांनी १५ जून २०२५ रोजी नागपूर ते पंढरपूर हा प्रवास सुरू केला आणि फक्त ६ दिवसांत ७०० किमीचा प्रवास पूर्ण केला. २० जून २०२५ रोजी, पंढरपूरमधील विठ्ठल मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आपला प्रवास संपवला.



हे अद्भुत काम पूर्ण केल्यानंतर, २६ जून २०२५ रोजी, प्रीती यांनी डब्ल्यूसीएलचे संचालक (वित्त) बिक्रम घोष यांची भेट घेतली आणि त्यांना या कामगिरीबद्दल माहिती दिली. घोष यांनी प्रीतीचे अभिनंदन केले आणि भविष्यात आणखी चांगले काम करण्यासाठी तिला प्रेरित केले.

ते म्हणाले की सायकलिंगचे फायदे आपल्या सर्वांना माहित आहेत, परंतु या खेळाला नवीन उंचीवर नेण्याची जिद्द काही मोजक्याच लोकांमध्ये आहे. ते म्हणाले की प्रीतीने असे यश मिळवले आहे. हे निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.

प्रीती म्हणाल्या की, नागपूर ते पंढरपूर हा ७०० किमीचा प्रवास कठीण पण प्रेरणादायी होता. सायकलिंगमध्ये शारीरिक ताकदीसोबतच दृढनिश्चय देखील आवश्यक आहे. जेव्हा एखादी व्यक्ती थकते तेव्हा फक्त मनोबल कामी येते. तिच्या यशात डब्लू सि एल ने दिलेल्या सहकार्याबद्दल तिने त्यांचे आभार मानले.

## राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

परिवर्तन मंच रामटेक, कल्याण मित्र बौद्ध विहार समिती व समता सैनिक दल शितलवाडी यांचे संयुक्त विद्यमाने आरक्षणाचे जनक तथा सामाजिक क्रांतीचे प्रणेते लोकराजे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती "सामाजिक न्याय दिन " म्हणून कल्याण मित्र बौद्ध विहार शितलवाडी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रवीण बेले, भाऊराव भिलावे, कृपासागर भोवते, सतीश नौकरकर व सुनील पानतावणे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जोहरे यांनी केले तर रूस्तम मोटघरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला माधवराव गजभिये, रूस्तम रामटेके, धम्मरक्षि भोवते व परिसरातील महिला उपस्थित होते.

# विद्यापीठात हेक्सावेअर कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात हेक्सावेअर कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. महाराज बाग चौक स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृह येथे ३० जून २०२५ रोजी हा प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. प्रभारी प्र-कुलगुरु डॉ.सुभाष कोंडावार यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.निळकंठ लंजे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ, विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, तुळशीराम गायकवाड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एल. नागतोडे, वायसीईईचे दिलीप संगोत्रा यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

कला, वाणिज्य, विज्ञान आदी कोणत्याही शाखेतून पदवीधर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी या ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. हेक्सावेअर कंपनीचे सीनियर एक्झिक्यूटिव्ह (एचआर) म्रिगांक अंबुलकर व ईशानी कोटकर यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

## राष्ट्रीय वयोश्री योजना अंतर्गत नागरिकांसाठी कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राष्ट्रीय वयोश्री योजना अंतर्गत दिव्यांग, वयोवृद्ध महिला, नागरिकांना, तसेच बेरोजगार तरुणांना, तरूणींना कर्ज काढून व्यावसायिक उपयोग करण्यासाठी माजी नगरसेवक भास्कर पराते यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

ह्या कार्यक्रमात जागृत आमदार प्रवीण दटके व भाजपा नगराध्यक्ष दयाशंकर तिवारी तसेच डॉ सुभाष राऊत, रामभाऊ आंबूलकर, डॉ. जायसवाल, किशोर पलांदुरकर, हेमंत बरडे, शेखर डोरलीकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समाज भूषण पुरस्कार्थी भूषण दडवे आदि मान्यवर तसेच महिला, पुरुष, दिव्यांग, वयोवृद्ध, बेरोजगार तरूण, तरूणी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी कार्यक्रमाचे कौतुक केले करणी व कथणीत फरक आहे असे प्रतिपादन केले.

# देवपूजा वंदन सोहळ्याला श्री क्षेत्र देवबर्डीतुन होणार प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. ३० :

आषाढ महिना लागताच भाविकांच्या भक्तीला उधाण आलेले आपणास पाहावयाला मिळते. आषाढ, श्रावण तर सण उत्सवाचा महिना. सध्या आपण पंढरपूरच्या दिशेने अनेक वारकरी दिंडी पताका खांद्यावर घेऊन हरिनामाचा गजर करत मार्गक्रमण करत असलेले दृश्य पाहत आहोत. तर इकडे महानुभाव भक्त मंडळी परमेश्वराच्या श्रीचरण स्पर्शाने पुनीत श्रीमूर्ती, वस्त्र प्रसाद, विलोभनीय अशी परंपरा देवपूजा वंदन करण्यासाठी एकादशी ते आषाढी पौर्णिमेपर्यंत गावोगावी मठ मंदिर आश्रमात भेटी देतात, अशी माहिती आचार्य प्रवर महंत श्री वाकिकर बाबा (श्रीक्षेत्र देवबर्डी) यांनी दिली.

महाराष्ट्रामध्ये महानुभाव पंथी अनुयायी मंडळी मोठ्या प्रमाणात आहेत. मुंबईपासून गोंदिया, लातूर पासून नंदुरबार, चंद्रपूर पासून नाशिक सर्व दूर अनेक मोठे मंदिर आश्रम उपलब्ध आहेत. हजारो वर्षापासून संत महंतांनी त्यागी तपस्वी साधकांनी परमेश्वर अवतारांच्या स्पर्श सबंधित व सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी, श्री गोविंद प्रभू यांनी भक्तांना प्रसन्न होऊन दिलेल्या वस्तू अत्यंत श्रद्धेने व प्रयत्नाने सांभाळून ठेवलेल्या आहेत. ही सर्व देवपूजा सुरक्षित रहावे या उद्देशाने पेटीमध्ये बंद असते. परंतु अशा उत्सव प्रसंगी




सिंहासन रचुन त्यावर रेशमी वस्त्रे अंथरुन तिची योग्य पद्धतीने मांडणी करतात व येणाऱ्या भाविक भक्तांना वंदन करण्यासाठी उपलब्ध करून देतात. सर्व भारतातून अनेक राज्यातून आलेली मंडळी याचा लाभ घेतात.

नागपूर जिल्ह्यातील सर्व मठ मंदिर आश्रमात या कालावधीत हा सोहळा संपन्न होत आहे. याचा एक भाग म्हणून दिनांक ६ जुलै अर्थात आषाढी एकादशीच्या दिवशी श्रीक्षेत्र देवबर्डी (मोहपा) येथे सकाळी सात वाजता या विधीला प्रारंभ होईल. अनेक भक्तांचा समूह वानाडोंगरी, चीचभुवन, नागपूर शहर, श्रीक्षेत्र मौदा, श्रीक्षेत्र मनसर येथील दर्शन करून श्री दत्त टेकडी पारशिवनी येथे सायंकाळी सात वाजता पोहोचेल.

तेथील देवपूजा महाआरतीनंतर आचार्य श्री वाकिकर बाबा यांचे उपस्थितीत संत महंताची मोलाचे मार्गदर्शन होईल तर या सोहळ्याची सांगता श्री दत्त सेवाभावी संस्था पारशिवनी कडून करण्यात येणार आहे.या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री दत्त सेवाभावी संस्थेचे सुधाकर मेंघर, श्रीक्षेत्र देवबर्डीचे कल्याणदादा वाकीकर यांनी केले आहे.

# साहस क्रिकेट क्लब सेमीफायनलमध्ये अथर्व पिल्लईची धडाकेबाज कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३० :

जेसीसीए अंडर- १२ क्रिकेट स्पर्धेच्या झालेल्या क्वार्टर फायनल सामन्यात साहस क्रिकेट क्लबने एनसीएसी संघावर विजय मिळवत सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. या सामन्यात अथर्व पिल्लईने वेगवान आणि अचूक गोलंदाजी करत सामन्याची बाजुच बदलून टाकली. एनसीएसी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, अथर्व पिल्लईच्या शानदार गोलंदाजीसमोर त्यांच्या डावाची सुरुवातच कोसळली. त्याने दोन्ही सलामीवीरांना शून्यावर बाद करत विरोधकांवर दबाव टाकला. त्यानंतर फील्डिंगमध्ये देखील त्याने सटीक थ्रोने रन आऊट करत संघाला महत्त्वाची झळ दिली. एनसीएसी संघ अवघ्या ६८ धावांत गारद झाला. प्रत्युत्तरादाखल, साहस क्रिकेट क्लबने १३.३ षटकांत ५ गडी गमावत विजय मिळवला आणि ६९ / ५ असा स्कोर करत सेमीफायनल गाठली. या सामन्यातील अष्टपैलू कामगिरीसाठी अथर्व पिल्लईला मॅन ऑफ द मॅच म्हणून गौरविण्यात आले. पिपळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नरेश भोयर यांनी अथर्वच्या कामगिरीचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.



# वेळेवर पोलिस आले नसते तर त्याने अखेर आत्महत्याच केली असती....



■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. ३० :

भंडारा जिल्ह्यातील एक इसम हा मौदा जवळील माथनी येथील कन्हान नदीच्या पात्राजवळ आत्महत्या करीत असल्याचे मौदा पोलिसांच्या लक्षात येताच आज नुकताच 30.05.2025 पोलीस स्टेशन मौदा येथील पोलिस हवालदार देवेंद्र भुरे, पोशि अतुल निंबार्ते यांनी लगेच यांनी डायल 112 वर कॉल आला की, पंकज राजेंद्र खोब्रागडे हा भंडारा रोड वरील माथणी पुल येथे आत्महत्या करीत आहे.

अशी माहीती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे यांना देवुन दुर्गे यांनी क्षणाचाही विलंब न करता डायल 112 वाहनाने पोस्टेला हजर असलेले कर्म पोशि शुभम ईश्वरकर व चापोशि ललीतकुमार ठाकुर यांचेसह माथणी अस्तविसर्जन घाट येथे पोहचुन स्थानीक गोथाखोर यांना सदर ईसमाचा फोटो दाखवुन नदीच्या काठावर शोधमोहीम सुरु केली असता माथणी मोठा पुलीया खाली नदिच्या मधोमध मोठ्या दगडावर पंकज खोब्रागडे बसलेला तेव्हा त्यास चारही बाजुने घेरुन त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत असता पंकज खोब्रागडे यांनी नदिच्या वाहत्या प्रवाहात अचानकपणे उडी घेतली असता पोलीस स्टॉप यांनी जिवाची पर्वा न करता नदिच्या वाहत्या प्रवाहात उडी घेवुन सदर इसमास सुखरुप बाहेर काढले व त्यास पोलीस स्टेशनला घेवुन येवुन सदर माहीती ही त्यांचे नातेवाईकांना देवुन त्याचे नातेलाईक वडील नामे राजेंद्र खोब्रागडेहे वाडी पोलीस स्टेशन नागपुर येथील स्टाप सदर पोलीस स्टेशन ला हजर आल्याने त्याचे कार ७४५ 500 क्र टल्न 43 अट 9002, व मोबाईल व ईतर साहीत्या सह त्यांचे ताब्यात देण्यात आले. सदरची कार्यवाही ही वरिष्ठ पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे पोलीस ठाणे मौदा यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा देवेंद्र भुरे. पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर, ललीतकुमार ठाकुर यांनी केली.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६१ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता.30) सोमवार रोजी शोध पथकाने 61 प्रकरणांची नोंद करून 54,900/- रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी थुंकणे (रु. 200/- दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 200/- रुपयांची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 38




प्रकरणांची नोंद करून 15,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 200/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 08 प्रकरणांची नोंद करून 3,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डीग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 20,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 33 प्रकरणांची नोंद करून 6,600/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 05 प्रकरणांची नोंद करून रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. बाटा शोरूम व मे.अभिनव इन्टरप्रायजेस यांनी नाल्यात कचरा टाकल्याबद्दल प्रत्येकी रु.5,000/- प्रमाणे असे एकूण रू.10,000/-चे दंड वसूल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत प्रशांत यांनी यांनी नाल्यात कचरा टाकल्याबद्दल रु.5,000/- चे दंड वसूल करण्यात आले.

गांधीबाग झोन अंतर्गत मे. गायत्री किराणा स्टोअर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/-चे दंड वसूल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. राहुल किराणा स्टोर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.

## दिव्यांग व वयोवृद्ध व्यक्तींना साहित्याचे वितरण



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

स्नेहसदन दिव्यांग मुलांची शाळा शितलवाडी येथे वयोश्री व एडीप योजनेअंतर्गत एकूण १२१ दिव्यांग व वयोवृद्ध लाभार्थींना राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते १० लक्ष ३५ हजार रुपयाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्य शासन लवकरच जिल्हा नियोजन विकास समितीचा दिव्यांगांकरिता राखीव केलेला १ टक्के निधी वितरणाची कार्यपध्दती दिव्यांग कल्याण विभागामार्फत जाहीर करणार असून दिव्यांगांना त्यातून आपले जीवनमान उचंविण्यासाठी मोलाची मदत मिळेल. तसेच माझा दिव्यांग सहाय्यता कक्षामार्फत लवकरच एक आगळा वेगळा उपक्रम म्हणजे दिव्यांग करिता आवश्यक साधन साहित्य लवकर प्राप्त होण्यासाठी दिव्यांग साहित्य बँक चे उपक्रम राबविण्यात येणार असे सांगितले.

या कार्यक्रमाला शीतलवाडीचे माजी सरपंच धर्मराज रहाटे, सदस्य संजय येनूरकर, विकास झाडें, संकेत काठीकार, डॉ. आकाश यादव, रुद्र धनराज चोपडे, निखिल कसारे, स्नेहसदन शाळेचे मुख्याध्यापक पंकज पांडे, व शाळेतील विशेष शिक्षक प्रदीप बागडे, प्रीतम मानकर, सविता अतकर, प्रिया दुबे, किश्वर शेख, प्रविण महल्ले,प्रवीण,अशोक पातोडे कर्मचारी सचिन झाडें, अमन दीक्षित,मोहन बांगडे, नितीन खेवले, अतुल घोडाकाडे, विशाल भाजीपाले, सुनीता मसराम, मनीषा नरुले, मिनाक्षी वाघधरे, अश्विनी गोरे व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम,कानपुर व सी.आर.सी.नागपूर यांचे विशेष सहकार्य लाभले.

## सीरम इन्स्टिट्यूटची एचपीव्ही कर्करोग जनजागृती मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया च्या नेतृत्वाखालील देशव्यापी सार्वजनिक आरोग्य उपक्रमाचा भाग म्हणून नागपूर मध्ये कॉन्क्युअर एचपीव्ही ॲंड कर्करोग कॉन्क्लेव्ह २०२५ लॉच करण्यात आले.

भारताला अजूनही एच पी व्ही-संबंधित आजारांचा, विशेषतः गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत आहे, जो देशातील महिलांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात सामान्य कर्करोग झाला आहे.

एचपी व्ही आणि कर्करोगावरील आय सी ओ/ आय ए आर सी माहिती केंद्र (२०२३) नुसार, भारतात दरवर्षी १.२३ लाखांहून अधिक नवीन गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे रुग्ण आणि ७७,००० हून अधिक जणांचा संबंधित रोगाने मृत्यू झाल्याची नोंद केली जात आहे. याशिवाय ९०% पर्यंत गुदद्वाराशी संबंधित कर्करोग आणि ६३% पर्यंत पेनिल कॅन्सर एच पी व्हीशी संबंधित आहेत.




नागपूर मध्ये झालेल्या एका कार्यक्रमामध्ये, वैद्यकीय तज्ञांच्या एका पॅनेलने एचपीव्हीचा सार्वजनिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत सखोल चर्चा केली. त्यावेळी डॉ. विनोद गांधी, संचालक, कलर्स मदर ॲंड चाइल्ड केअर हॉस्पिटल, नागपूर, इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स, नागपूर शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. मिलिंद मंडलिक, संचालक, कलर्स मदर ॲंड चाइल्ड केअर हॉस्पिटल, नागपूर, संस्थापक अध्यक्ष निओनॅटोलॉजी फोरम, नागपूर चॅप्टर डॉ. चारू बाहेती, संचालक सुअरलाइफ हॉस्पिटल आणि टेस्ट ट्यूब बेबी सेंटर, नागपूर, आयव्हीएफ-आयसीएसआय सल्लागार प्रसूती आणि स्त्रीरोग डॉ. संगीता ताजपुरिया, संचालक वेदांश हॉस्पिटल आणि टेस्ट ट्यूब बेबी सेंटर, नागपूर. उपाध्यक्ष एनओजीएस (२०२४-२५), सल्लागार मंडळ सदस्य आयव्हीएफ युनिट, एम्स नागपूर डॉ. मौमिता बाग, सल्लागार स्त्रीरोगतज्ज्ञ ऑन्कोलॉजिस्ट, एचआयपीईसी तज्ञ, लॅप्रोस्कोपिक आणि रोबोटिक सर्जन, एचसीजी कर्करोग केंद्र, नागपूर .

या सत्राचे सूत्रसंचालन नागपूर येथील कलर्स मदर ॲंड चाइल्ड केअर हॉस्पिटलचे संचालक आणि एसीव्हीआयपी वेस्ट झोन सदस्य (२०२०-२२) डॉ. संजय मराठे यांनी केले.

डॉ. संजय लालवानी यांनी तातडीने जागरूकता करण्याची गरज असल्याचे अधोरेखित केलं तसेच किशोरवयीन मुले आणि पालक या दोघांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्व आणि त्याविषयी मार्गदर्शन करण्यात आरोग्य सेवा प्रदात्यांची असलेली महत्त्वाची भूमिका यावर प्रकाश टाकला आहे.

वक्त्यांनी यावर भर दिला की एच पी व्ही हा केवळ गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापुरता मर्यादित नाही. हे व्हल्व्हर, योनी, गुदद्वारा, पेनिल, ऑरोफॅरिंजियलच्या कर्करोगाशी देखील संबंधित आहे, जे पुरुष आणि महिला दोघांनाही प्रभावित करते.

१५ ते २५ वयोगटातील मुला मुलींमध्ये एचपी बीपी संसगार्ची शक्यता सर्वाधिक असल्याने लवकरात लवकर याविषयी जागृक्ताने यावर वेळेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक आहे अशी माहिती देण्यात आली आता उपलब्ध असलेल्या आणि परवडणाऱ्या एचपीव्हीलसीमुळे एचपीसी संबंधित कर्करोगापासून प्रत्येक व्यक्तीचे संरक्षण करणे आणखी सोपे झाली आहे.

त्यावेळी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक पराग देशमुख म्हणाले की वैद्यकीय तज्ञ आरोग्य सेवा कर्मचारी आणि समाजातील सदस्यांना एकत्रित आणून ही व्यासपीठ रोगाचे निदान आणि त्यावर प्रतिबंध चर्चा करण्यासाठी धोरणात्मक प्रोत्साहन देते, अशी माहीती कार्यक्रमा दरम्यान देण्यात आली. यावेळी मोठी उपस्थिती होती.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी आजपासून धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, महिला सशक्तीकरण संघ आणि ऑल इंडिया बुद्धिष्ट फोरमच्या वतीने महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, तसेच दीक्षाभूमीचे सौंदर्यीकरण करण्यात यावे या मागण्यांसाठी उद्या 1 जुलैपासून संविधान चौकात धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

तथागत बुद्ध धम्म भारताच्या पावन भूमीतून जगातील सर्व देशात प्रसारित झाला. सम्राट अशोक यांनी 8400 चैत्य व स्तूपांची निर्मिती केली होती. परंतु, भारतातील काही लोकांनी बुद्ध धम्म नष्ट करण्याचा खटाटोप करीत आहेत. भारतात अनेक हिंदू मठ, मंदिर आणि बुद्ध विहार आहेत. बौद्ध गया येथे जागतिक किर्तीचे महाबोधी महाविहार आहे.

याच ठिकाणी सिद्धार्थ गौतम बुद्धाला सम्यक ज्ञान प्राप्त झाले होते. भारतिय संविधान अंमलात येण्यापूर्वी बिहार सरकारने बीटी ॲक्ट 1949 लागू करून महाबोधी महाविहार हिंदूंच्या ताब्यात दिले. महाबोधी महाविहार मुक्त करण्यासाठी 12 फेब्रुवारीपासून शांतीप्रिय आंदोलन सुरू आहे. आंदोलनाला बसलेल्या भंतेना तेथून हटविण्यात आले. 13 मे रोजी आंदोलक भंतेवर विविध कलमान्वये गुन्हे नोंदवून त्यांना अटक केली. त्याचप्रमाणे दीक्षाभूमी येथील सौंदर्यीकरण आणि बाजूलाच असलेली माता कचेरी व कॉटन रिचर्स सेंटरची जागा दीक्षाभूमीला देण्यात यावी या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

एक महिना हे आंदोलन सुरू राहणार आहे. आंदोलन यशस्वी करण्यासाठी बौद्ध आंबेडकरी अनुयायांनी सहकार्य करावे असे आवाहन भंते चंद्रकिर्ती, शंकरराव ढेंगरे, पद्माकर गणवीर, प्रकाश दार्शनिक, विजय मेश्राम, सरोज राजवर्धन, विनय ढोक, लक्ष्मीकांत मेश्राम, गंगाधर कांबळे, उषा बौद्ध, निर्भय बागडे यांनी केले आहे.

## नागपूर रेल्वे स्थानकावर 'रेल लायब्ररी'चे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

प्रत्येक पानामध्ये एक प्रवास

प्रवाशांचा अनुभव समृद्ध करणाऱ्या आणि वाचन संस्कृतीला चालना देणाऱ्या आगळ्या-वेगळ्या उपक्रमांतर्गत, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागामार्फत रेल लायब्ररीचे उद्घाटन नागपूर रेल्वे स्थानकावर करण्यात आले. प्रत्येक पानामध्ये एक प्रवास ही या उपक्रमाची प्रेरणादायी टॅगलाईन आहे, ज्याचा उद्देश प्रवाशांना त्यांचा वेळ ज्ञान आणि आनंदाने व्यतीत करण्याची संधी देणे आहे.

ही लायब्ररी एक पुस्तक घ्या, एक पुस्तक द्या या तत्वावर कार्य करते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहीद स्मारकाची दुर्दशा

● प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. ३०

प्रभाग क्र. ७ इंदोरा दहा नंबर पूल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहीद स्मारकाची दुर्दशा झाली असून या दुदर्शेला प्रशासन जबाबदार असल्याचा संताप या परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य प्रेरणादायी आहे. हे स्मारक नामांतर आंदोलनाचे साक्षीदार आहे. या स्मारकासोबत आंबेडकरी जनतेच्या भावना जुळल्या आहेत. स्मारकाचे दर्शन आणि शहीद भीम सैनिकांना मानवंदना देण्यासाठी आंबेडकरी पर्यटक या जागी येत असतात. स्मारकाच्या दर्शनिय भागात पाण्याचे कारंजे तयार करण्यात आले.

काही दिवस हे कारंजे चांगल्याप्रकारे चालले. त्यानंतर बंद झाले ते आजपायेतो त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. कारंज्याच्या टाक्यात पाणी तर नाहीच त्यात शेवाळ झाली आहेत. कारंज्याच्या लोखंडी पाईपला जंग चढला आहे. ओट्यावरील फरश्या निघाल्या आहेत. विजेचे दिवे बंद आहेत. पावसाच्या पाण्यामुळे भिंती देखील



डॉ. आंबेडकर शहीद स्मारकातील बंद अवस्थेतील कारंजे

काळ्या पडल्या आहेत. मागील बाजूला असलेल्या ग्रिन जिममध्ये गवत आणि झाडेझुडुपे वाढली आहेत. सध्या पावसाळा असल्याने सापाची भिती आहे.

या संदर्भात मनपा आयुक्तांना अूनेकदा निवेदने दिली. त्यांनी कारवाई करण्याचे आश्वासन देखील दिले. परंतु, आश्वासन पूर्ण केले नाही असे या स्मारकाच्या जवळच राहणारे निषाद इंदूरकर यांनी सांगितले. हे स्मारक वास्तू नसून सामाजिक जागृतीचे प्रतिक आहे. अशा स्मारकाची उपेक्षा करणे म्हणजे लोकशाही आणि समतेच्या मूल्यांची थट्टा करणे आहे असे सरोज मेश्राम यांनी सांगितले.

प्रशासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देऊन स्मारकाची दुरुस्ती करावी अशी मागणी किशोर डोंगरे, सिद्धार्थ राऊत, कृषभ मेश्राम, गौरव डोंगरे आणि कल्पेश गजभिये यांनी केली आहे.

## धम्मदीपनगरात नाल्याची भिंत कोसळली

● प्रदीप पौनीकर
नागपूर, दि. ३०:

सतरंजीपुरा झोनच्या दुर्लक्षपणामुळे प्रभाग क्र. ५ धम्मदीपनगर येथील नाल्याची भिंत कोसळल्याने पावसाळ्यात नाल्याचे पाणी घरात घुसणार असल्याने स्थानिक रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही वर्षांपूर्वी धम्मदीपनगर येथून वाहणाऱ्या नाल्याच्या दोन्ही बाजूला संरक्षित भिंती तयार करण्यात आल्या होत्या. परंतु, नित्कृष्ट दर्जाचे काम झाल्याने काही दिवसातच तीन ठिकाणी जमिनीपासून नाल्याची भिंती जमीनदोस्त झाली. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. जोरदार पाऊस झाला की, नाल्यातील पाणी लोकांच्या घरात शिरल्याशिवाय राहणार नाही. नाल्याच्या भिंतीचे काम करण्यात यावे यासाठी मागील एक वर्षांपासून सतरंजीपुरा झोनमधील संबंधित अधिकाऱ्यांना अनेकदा निवेदने दिली. परंतु, त्यांनी काहीच लक्ष दिले नाही. त्यानंतर मनपा आयुक्त अभिजित चौधरी यांनाही निवेदन दिले. त्यांनीही लक्ष न दिल्याने ही समस्या जशीच्या तशी आहे असे या परिसरातील नागरिकांनी सांगितले.

याच प्रभागातील कुंदनलाल गुप्तानगर येथे मागील अूनेक वर्षांपासून सिव्हर लाईन खराब झाल्याने दूषित पाणी लोकांच्या घरातून वाहते.



धम्मदीपनगरातील तुटलेल्या नाल्याची भिंत

त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्यांकडे प्रशासनाने लक्ष न दिल्यास मनपा कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रभाग ५ मधील आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## ''सविता गायत्री बहुद्देशिय शिक्षण संस्थेद्वारे '' जगनाथ यात्रेचे '' स्वागत करण्यात आले

● प्रभू गजभिये
नागपूर, दि. ३०:


संस्थेच्या संस्थापिका ''सविता पाटणे ''यांनी व संस्थेच्या सर्व टीम नी सुशोभित रांगोळी व फुलांनी या यात्रेच स्वागत केल . प्रसाद वाटप करण्यात आला सर्व भाविकान मधे प्रचंड उत्साह होता.''हरे कृष्णा हरे कृष्णा'' करीत नृत्या मधे सर्व भाविकगण तल्लीन झाले होते . एकून सर्व वातावरण प्रसन्न आनंदी झाले .





# महासागर प्रभाग वार्ता

## श्रावस्तीनगरात रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे



● प्रभू गजभिये
नागपूर, दि. ३०:

प्रभाग क्र. २ येथील श्रावस्तीनगर आणि रिपब्लिकननगर येथे नियमितपणे साफसफाई होत नसल्याने रस्त्यावरच कचऱ्याचे ढिगारे जमा झाले असून त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मागील अूनेक वर्षापासून महापालिकेची निवडणूक झाली नसल्याने नक्षरसेवकांचा अभाव आहे. शहराचा कारभार सध्या मनपाच्या प्रशासनाकडे आहे. त्यामुळे सफाई कामगारांवर कुणाचा वचक नाही. या परिसराची नियमित साफसफाई होत नसल्याने रस्त्यावरच कचऱ्याचे ढिग जमा झाले आहेत. महासागरच्या प्रभाग प्रतिनिूीने या परिसराचा फेरफटका मारला असता अूनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे दिसून आले. सफाई कर्मचारी नियमितपणे साफसफाई करीत नसल्याचे त्या परिसरातील नागरिकांनी सांगितले. रस्त्यावर कचरा जमा होत असल्याने त्या परिसरातील जनावरे खाद्य मिळेल या आमिषाने येतात. जूनावरे देखील घाण करतात. त्यामुळे त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. कचऱ्याच्या माध्यमातून मच्छर आणि डासांची निर्मिती होते. त्याचप्रमाणे माश्यांचा उपद्रव वाढला आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने नागरिकांना श्वास घेणे कठीण झाले आहे. या परिसरातील कचऱ्याचे ढिगारे त्वरित हटवावे अशी मागणी कमल मुंघाटे, सुरेंद्र साखरे, सतीश जांभुळकर आदींनी केली असून नियमितपणे सफाईची मागणी केली आहे.

## नाल्याची संरक्षित भिंत बांधा



नाल्याची तुटलेली संरक्षित भिंत

● महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि.३०:

प्रभाग क्र. २ रिपब्लिकननगर, इंदोरा येथील नाल्यावर संरक्षित भिंत बांधण्याची मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

पूर्वी या परिसरात छोटी नाली होती. जसजशी या परिसरातील लोकसंख्या वाढू लागली तसतशी नालीचे रुपांतर नाल्यात झाले. काही लोकांनी आपल्या घरातील गटारीचे पाणी नाल्यात सोडल्याने, त्याचप्रमाणे नाल्यातील पाण्याला मोठ्या प्रमाणात प्रवाह असल्याने नाल्याला संरक्षण भिंत बांधण्यात आली होती. काही दिवसांपूर्वी नाल्याची भिंत कोसळली. संरक्षण भिंत नसल्याने त्या परिसरातील जूनावरे नाल्यात पडतात. त्याचप्रमाणे परिसरातील कचरा आणि माती नाल्यात जमा होते. काही दिवसांपूर्वी नाल्याच्या एका बाजूची भिंत बांधण्यात आली. मात्र, दुसरी बाजू तशीच ठेवण्यात आली. नाल्याच्या बाजूनेच लोकांना ये जा करण्यासाठी रस्ता आहे. रस्त्याने जाताना बराच त्रास सहन करावा लागतो. यासंदर्भात आसीनगर झोनच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. परंतु, अधिकाऱ्यांनी काहीच लक्ष दिले नाही असे बंटी साखरे, गौतम जनबंधू, धीरज धमगाये, भाऊराव सहारे, सचिन अंबादे, गौतम बोरकर यांनी सांगितले.

## ईतवारी मालधक्का येथे वृक्षारोपण

● महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. ३०:

सहयोग फाऊंडेशनच्या वतीने ईतवारी मालधक्का येथे वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्ष लावा, वृक्ष जगवा हा उद्देश नजरेसमोर ठेवून वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. दिवसेंदिवस शहरातील वृक्ष कमी होत आहेत. त्यामुळे अूनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वृक्ष नसल्याने त्याचा परिणाम पर्यावरणावर झाला आहे. त्यामुळे रविवारी मालधक्का येथे पिंपळ आणि निंबाची झाडे लावण्यात आली. सध्या पावसाचे दिवस असल्याने जास्तीत जास्त लोकांनी झाडे लावावीत असे आवाहन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी संजय सफेलकर, नानक धूवानी, अनिल संभे, दिलीप टाले, जानकीराम साहू आदी उपस्थित होते.